## **पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८**

## **मा.महापालिका सभा**

## **कार्यपत्रिका क्रमांक - ५५**

## **सभावृत्तांत**

दिनांक - २०.०२.२०१६ वेळ - दुपारी २.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची माहे फेब्रूवारी-२०१६ ची मासिक मा. महापालिका सभा शनिवार दि.२०.०२.२०१६ रोजी दुपारी २.०० वा.महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा.धराडे शकुंतला भाऊसाहेब - महापौर
२. मा.वाघेरे प्रभाकर नामदेव - उपमहापौर
३. मा.पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे
४. मा.भालेकर शांताराम कोंडिबा ऊर्फ एस.के. बापू
५. मा.म्हेत्रे सुरेश रंगनाथ
६. मा.भालेकर अरुणा दिलीप
७. मा.साने दत्तात्रय बाबुराव (काका)
८. मा.थोरात वनिता एकनाथ
९. मा.सायकर अजय शंकरराव
१०. मा.जाधव साधना रामदास
११. मा.जाधव राहुल गुलाब
१२. मा.आल्हाट मंदा उत्तम
१३. मा.आल्हाट धनंजय मुरलीधर
१४. मा.विनया प्रदिप (आबा) तापकीर
१५. मा.बाबर शारदा प्रकाश
१६. मा.बहिरवाडे नारायण सदाशिव
१७. मा.सौ.मंगलाताई अशोक कदम
१८. मा.उल्हास शेट्टी
१९. मा.ठोंबरे सुभद्रा ईश्वर
२०. मा.पवार संगीता शाम

२१. मा.उबाळे सुलभा रामभाऊ

२२. मा.तानाजी विठ्ठल खाडे

२३. मा.बो-हाडे शुभांगी संजय

२४. मा.मंगेश श्रीकृष्ण खांडेकर

२५. मा.(चिखले) मराठे अश्विनी अजित

२६. मा.भारती फरांदे

२७. मा.आर.एस.कुमार

२८. मा.जावेद रमजान शेख

२९. मा.चारुशीला प्रभाकर कुटे

३०. मा.भालेराव प्रतिभा ज्ञानेश्वर

३१. मा.पांढरकर निलेश शंकरराव

३२. मा.राजू मिसाळ

३३. मा.नंदा विकास ताकवणे

३४. मा.नेटके सुमन राजेंद्र

३५. मा.तरस बाळासाहेब जयवंत

३६. मा.भोंडवे संगिता राजेंद्र

३७. मा.मोरेश्वर महादू भोंडवे

३८. मा.भोईर भाऊसाहेब सोपानराव

३९. मा.सूर्यवंशी आशा ज्ञानेश्वर

४०. मा.लोंढे गणेश नारायण

४१. मा.शमीम पठाण (पठाणबाई)

४२. मा. ॲड.संदीप गुलाब चिंचवडे

४३. मा.अश्विनी गजानन चिंचवडे-पाटील

४४. मा.अपर्णा निलेश डोके

४५. मा.अनंत सुभाष को-हाळे

४६. मा.जयश्री वसंत गावडे

४७. मा.पवार मनीषा काळूराम

४८. मा.प्रसाद शेट्टी

४९. मा.श्रीमती टेकवडे सुजाता अविनाश

५०. मा.काळभोर वैशाली जालिंदर

५१. मा.सौ.साळुंके सविता सुरेश

५२. मा.शेख अस्लम शैकत

५३. मा.सौ.ठाकरे मंदाकिनी अर्जुन

५४. मा.मासुळकर समीर मोरेश्वर

५५. मा.वाबळे संजय मल्हारराव

५६. मा.वसंत (नाना) आनंदराव लोंढे

५७. मा.सौ.गवळी सुनिता (माई) पांडुरंग

५८. मा.सुपे आशा रविंद्र

५९. मा.चंद्रकांत (भाऊ) साहेबराव वाळके

६०. मा.मोहिनीताई विलास लांडे

६१. मा.अजित दामोदर गव्हाणे

६२. मा.गोफणे अनुराधा देविदास

६३. मा.जालिंदर (बाप्पु) शिंदे

६४. मा.श्रध्दा बाजीराव लांडे

६५. मा. ॲड.नितीन ज्ञानेश्वर लांडगे

६६. मा.लोंढे शुभांगी संतोष

६७. मा.विश्वनाथ विठोबा लांडे

६८. मा.ननवरे जितेंद्र बाबा

६९. मा.सौ.बनसोडे शकुंतला काशिनाथ

७०. मा.भोसले राहूल हनुमंतराव

७१. मा.पालांडे सुजाता सुनिल

७२. मा.बहल योगेश मंगलसेन

७३. मा.सौ.पानसरे अमिना महंम्मद

७४. मा.कदम सदगुरु महादेव

७५. मा.गिता सुशील मंचरकर

७६. मा.कैलास महादेव कदम

७७. मा.छाया जगन्नाथ साबळे

७८. मा.पहलानी गुरुबक्ष किशनदास

७९. मा.टाक अरुण मदन

८०. मा.आसवाणी सविता धनराज

८१. मा.वाघेरे सुनिता राजेश

८२. मा.आसवानी हिरानंद उर्फ डब्बू किमतराम

८३. मा.उषा संजोग वाघेरे (पाटील)

८४. मा.ताम्हणकर प्रमोद रघुनाथ

८५. मा.काळे विमल रमेश

८६. मा.पाडाळे निता विलास

८७. मा.विनोद जयवंत नढे

८८. मा.तापकीर अनिता मच्छिंद्र

८९. मा.कैलासभाऊ गबाजी थोपटे

९०. मा.विमलताई सुरेश जगताप

९१. मा.अप्पा उर्फ संपत ज्ञानोबा पवार

९२. मा.बारणे निलेश हिरामण

९३. मा.बारणे झामाबाई बाळासाहेब

९४. मा.आप्पा उर्फ श्रीरंग चंदू बारणे

९५. मा.बारणे माया संतोष

९६. मा.ओव्हाळ शेखर अशोक

९७. मा.यमुनाताई रमणनाना पवार

९८. मा.विनय उर्फ विनायक रमेश गायकवाड

९९. मा.कलाटे स्वाती मयुर

१००. मा.चौंधे आरती सुरेश

१०१. मा.बापू उर्फ शत्रुघ्न सिताराम काटे

१०२. मा.शितल विठ्ठल ऊर्फ नाना काटे

१०३. मा.बोकड रामदास गेणभाऊ

१०४. मा.जवळकर वैशाली राहुल

१०५. मा.जगताप राजेंद्र गणपत

१०६. मा.शितोळे शैलजा बाबुराव

१०७. मा.जगताप नवनाथ दत्तु

१०८. मा.सौ.तनपुरे सुषमा राजेंद्र

१०९. मा.अतुल अरविंद ऊर्फ नानासाहेब शितोळे

११०. मा.जम सोनाली पोपट

१११. मा.प्रशांत शितोळे

११२. मा.ओव्हाळ रमा नितीन उर्फ सन्नी

११३. मा.काटे रोहितअप्पा सुदाम

११४. मा.गायकवाड संध्या सुरदास

११५. मा.काटे राजेंद्र भिकनशेठ

११६. मा.शेंडगे आशा सुखदेव

११७. मा.संजय केशवराव काटे

११८. मा.धुमाळ बाबासाहेब निवृत्ती

११९. मा.बो-हाडे अरुण तुकाराम

१२०. मा.लोखंडे गोरक्ष जाकाराम

याशिवाय मा.राजीव जाधव - आयुक्त, मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.तळदेकर -मुख्यलेखापरिक्षक, मा.डॉ.अनिल रॉय- आरोग्य वैदयकीय अधिकारी, मा.ठाकुर-उपसंचालक नगररचना, मा.भोसले - मुख्यलेखापाल, मा.गावडे-सह आयुक्त, मा.पाटील, मा.चव्हाण - सह शहर अभियंता, मा.सुरगुडे-विकास अभियंता, मा.डोईफोडे, मा.गायकवाड, मा.माने, मा.आष्टीकर, मा.फुंदे, मा.खोसे, मा.दंडवते, मा.कडूसकर, मा.दुरगुडे, मा.इंदलकर - सहा.आयुक्त, मा.पवार - कायदासल्लागार, मा.साळुंके- मुख्य उदयान अधिक्षक, मा.कारेकर-प्र.शिक्षणाधिकारी (माध्यमिक), मा.पठाण, मा.लडकत, मा.कुलकर्णी, मा.बरशेट्टी, मा.गलबले, मा.कांबळे, मा.गद्रूवार - कार्यकारी अभियंता हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

------

**मा.महापौर -** उपस्थित मा.नगरसेवक व मा.नगरसेविका, मा.आयुक्त, अधिकारी वर्ग, पत्रकार, नागरिक या सर्वांचे स्वागत करुन सभा कामकाजाला सुरुवात करणेत येत आहे.

**मा.प्रशांत शितोळे** - मा.महापौर साहेब, बाळासाहेब मोटे - मा. क प्रभाग अध्यक्ष तथा नगरसदस्य किरण मोटे यांचे वडील, सुनिल विठ्ठल सूर्यवंशी व हनमंतअप्पा कोपड्‌डसियाचिन भागात हिमपातात मृत्यूमुखी पडलेले शहीद जवान, शंकर चंद्रभान शिंदे व सहदेव मारुती मोरे -दहशतवाद्यांविरोधात लढताना शहीद झालेले जवान, करिष्मा भोसले व पुजा कळ्ळोल - रशियातील मेडिकल कॉलेजमध्ये लागलेल्या आगीत निधन, श्रीमती मीना अविनाश कामतेकर - भाजपाचे ज्येष्ठ नेते श्री.सारंग अविनाश कामतेकर यांच्या मातोश्री, अशोक कोतवाल यांचे

दु:खद निधन झाल्याने त्यांना श्रध्दांजली वाहून आजची सभा आज दि.२०/२/२०१६ रोजी दुपारी २.१५ पर्यंत तहकूब करणेत यावी अशी सूचना मी मांडतो.

**मा.उल्हास शेट्टी** - मा.महापौर साहेब, अनुमोदन देतो.

**मा.महापौर**- श्रध्दांजली वाहणेसाठी सर्वांनी दोन मिनीटे स्तब्ध उभे रहावे.

(सर्वांनी दोन मिनीटे स्तब्ध राहून श्रध्दांजली अर्पण केली)

**मा.महापौर-** सन्मा.सदस्यांचे सूचनेप्रमाणे आजची सभा आज दि.२०/२/२०१६ रोजी दुपारी २.१५ पर्यंत तहकूब करणेत येत आहे.

------

(धराडे शकुंतला भाऊसाहेब)
**महापौर**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११०१८

**<u>पिंपरी चिंचवड महानगरपालिका पिंपरी - ४११ ०१८</u>**

**<u>मा.महापालिका सभा</u>**

**<u>कार्यपत्रिका क्रमांक - ७५</u>**

**<u>सभावृत्तांत</u>**

**<u>(दि.२०/०२/२०१६ (दु.२.००) ची तहकूब सभा )</u>**

<u>दिनांक - २०.०२.२०१६</u> <u>वेळ - दुपारी २.१५ वाजता</u>

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची दि.२०.०२.२०१६ (दु.२.००) ची तहकूब मा.महापालिका सभा शनिवार दि.२०.०२.२०१६ रोजी दुपारी २.१५ वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा.धराडे शकुंतला भाऊसाहेब - महापौर
२. मा.वाघेरे प्रभाकर नामदेव - उपमहापौर
३. मा.पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे
४. मा.भालेकर शांताराम कोंडिबा ऊर्फ एस.के. बापू
५. मा.म्हेत्रे सुरेश रंगनाथ
६. मा.भालेकर अरुणा दिलीप
७. मा.साने दत्तात्रय बाबुराव (काका)
८. मा.थोरात वनिता एकनाथ
९. मा.जाधव साधना रामदास
१०. मा.जाधव राहुल गुलाब
११. मा.आल्हाट मंदा उत्तम
१२. मा.आल्हाट धनंजय मुरलीधर
१३. मा.विनया प्रदिप (आबा) तापकीर
१४. मा.बाबर शारदा प्रकाश
१५. मा.बहिरवाडे नारायण सदाशिव
१६. मा.सौ.मंगलाताई अशोक कदम
१७. मा.उल्हास शेट्टी

१८. मा.ठोंबरे सुभद्रा ईश्वर

१९. मा.पवार संगीता शाम

२०. मा.उबाळे सुलभा रामभाऊ

२१. मा.तानाजी विठ्ठल खाडे

२२. मा.बो-हाडे शुभांगी संजय

२३. मा.मंगेश श्रीकृष्ण खांडेकर

२४. मा.(चिखले) मराठे अश्विनी अजित

२५. मा.भारती फरांदे

२६. मा.आर.एस.कुमार

२७. मा.जावेद रमजान शेख

२८. मा.चारुशीला प्रभाकर कुटे

२९. मा.पांढरकर निलेश शंकरराव

३०. मा.राजू मिसाळ

३१. मा.नंदा विकास ताकवणे

३२. मा.नेटके सुमन राजेंद्र

३३. मा.तरस बाळासाहेब जयवंत

३४. मा.भोंडवे संगिता राजेंद्र

३५. मा.मोरेश्वर महादू भोंडवे

३६. मा.भोईर भाऊसाहेब सोपानराव

३७. मा.सूर्यवंशी आशा ज्ञानेश्वर

३८. मा.लोंढे गणेश नारायण

३९. मा.शमीम पठाण (पठाणबाई)

४०. मा. ॲड.संदीप गुलाब चिंचवडे

४१. मा.अश्विनी गजानन चिंचवडे-पाटील

४२. मा.अपर्णा निलेश डोके

४३. मा.अनंत सुभाष को-हाळे

४४. मा.जयश्री वसंत गावडे

४५. मा.प्रसाद शेट्टी

४६. मा.श्रीमती टेकवडे सुजाता अविनाश

४७. मा.काळभोर वैशाली जालिंदर

४८. मा.सौ.साळुंके सविता सुरेश

४९. मा.शेख अस्लम शैकत

५०. मा.सौ.ठाकरे मंदाकिनी अर्जुन

५१. मा.वाबळे संजय मल्हारराव

५२. मा.वसंत (नाना) आनंदराव लोंढे

५३. मा.सौ.गवळी सुनिता (माई) पांडुरंग

५४. मा.सुपे आशा रविंद्र

५५. मा.चंद्रकांत (भाऊ) साहेबराव वाळके

५६. मा.मोहिनीताई विलास लांडे

५७. मा.अजित दामोदर गव्हाणे

५८. मा.जालिंदर (बाप्पु) शिंदे

५९. मा.श्रध्दा बाजीराव लांडे

६०. मा.ॲड.नितीन ज्ञानेश्वर लांडगे

६१. मा.लोंढे शुभांगी संतोष

६२. मा.विश्वनाथ विठोबा लांडे

६३. मा.सौ.बनसोडे शकुंतला काशिनाथ

६४. मा.भोसले राहूल हनुमंतराव

६५. मा.पालांडे सुजाता सुनिल

६६. मा.बहल योगेश मंगलसेन

६७. मा.सौ.पानसरे अमिना महंम्मद

६८. मा.कदम सदगुरु महादेव

६९. मा.गिता सुशील मंचरकर

७०. मा.कैलास महादेव कदम

७१. मा.पहलानी गुरुबक्ष किशनदास

७२. मा.टाक अरुण मदन

७३. मा.आसवाणी सविता धनराज

७४. मा.वाघेरे सुनिता राजेश

७५. मा.आसवानी हिरानंद उर्फ डब्बू किमतराम

७६. मा.उषा संजोग वाघेरे (पाटील)

७७. मा.ताम्हणकर प्रमोद रघुनाथ

७८. मा.काळे विमल रमेश

७९. मा.पाडाळे निता विलास

८०. मा.विनोद जयवंत नढे

८१. मा.तापकीर अनिता मच्छिंद्र

८२. मा.कैलासभाऊ गबाजी थोपटे

८३. मा.विमलताई सुरेश जगताप

८४. मा.अप्पा उर्फ संपत ज्ञानोबा पवार

८५. मा.बारणे निलेश हिरामण

८६. मा.बारणे झामाबाई बाळासाहेब

८७. मा.आप्पा उर्फ श्रीरंग चंदू बारणे

८८. मा.बारणे माया संतोष

८९. मा.ओव्हाळ शेखर अशोक

९०. मा.यमुनाताई रमणनाना पवार

९१. मा.विनय उर्फ विनायक रमेश गायकवाड

९२. मा.कलाटे स्वाती मयुर

९३. मा.नांदगुडे विलास एकनाथ

९४. मा.चौंधे आरती सुरेश

९५. मा.बापू उर्फ शत्रुघ्न सिताराम काटे

९६. मा.शितल विठ्ठल ऊर्फ नाना काटे

९७. मा.बोकड रामदास गेणभाऊ

९८. मा.जवळकर वैशाली राहुल

९९. मा.जगताप राजेंद्र गणपत

१००. मा.शितोळे शैलजा बाबुराव

१०१. मा.जगताप नवनाथ दत्तु

१०२. मा.सौ.तनपुरे सुषमा राजेंद्र

१०३. मा.अतुल अरविंद ऊर्फ नानासाहेब शितोळे

१०४. मा.जम सोनाली पोपट

१०५. मा.प्रशांत शितोळे

१०६. मा.ओव्हाळ रमा नितीन उर्फ सन्नी

१०७. मा.काटे रोहितअप्पा सुदाम

१०८. मा.गायकवाड संध्या सुरदास

१०९. मा.काटे राजेंद्र भिकनशेठ

११०. मा.शेंडगे आशा सुखदेव

१११. मा.संजय केशवराव काटे

११२. मा.धुमाळ बाबासाहेब निवृत्ती

११३. मा.गावडे हनुमंत बाळासाहेब

११४. मा.बो-हाडे अरुण तुकाराम

११५. मा.लोखंडे गोरक्ष जाकाराम

याशिवाय मा.गावडे-सह आयुक्त, मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.तळदेकर - मुख्यलेखापरिक्षक, मा.डॉ.अनिल रॉय- आरोग्य वैदयकीय अधिकारी, मा.ठाकुर-उपसंचालक नगररचना, मा.भोसले - मुख्यलेखापाल, मा.पाटील, मा.चव्हाण - सह शहर अभियंता, मा.सुरगुडे-विकास अभियंता, मा.डोईफोडे, मा.गायकवाड, मा.माने, मा.आष्टीकर, मा.फुंदे, मा.खोसे, मा.दंडवते, मा.कडूसकर, मा.दुरगुडे, मा.इंदलकर - सहा.आयुक्त, मा.पवार - कायदासल्लागार, मा.साळुंके - मुख्य उदयान अधिक्षक, मा.कारेकर-प्र.शिक्षणाधिकारी (माध्यमिक), मा.पठाण, मा.लडकत, मा.कुलकर्णी, मा.बरशेट्टी, मा.गलबले, मा.कांबळे, मा.गद्रूवार - कार्यकारी अभियंता हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

**------**

**मा.महापौर -** उपस्थित मा.नगरसेवक व मा.नगरसेविका, मा.आयुक्त, अधिकारी वर्ग, पत्रकार, नागरिक या सर्वांचे स्वागत करुन सभा कामकाजाला सुरुवात करणेत येत आहे.

मा.महापालिका सभा क्रमांक - ५३ दिनांक २०/१/२०१६ व दि.२५/१/२०१६ चा सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

**<u>नियुक्त्या</u>**

**विषय क्रमांक १)** महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम २० (५) मध्ये तरतूद केल्याप्रमाणे स्थायी समितीवर ८ (आठ) मा.सदस्यांच्या नियुक्त्या कलम ३१अ मध्ये तरतूद केल्याप्रमाणे प्रमाणशीर प्रतिनिधित्व देऊन नामनिर्देशनाव्दारे करणे.

**मा.नगरसचिव -** विषय क्रमांक १ महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम २० (५) मध्ये तरतूद केल्याप्रमाणे मा.स्थायी समितीवर ८ (आठ) मा.सदस्यांच्या नियुक्त्या सन २००७ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक २ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ३१ अ मध्ये तरतूद केल्याप्रमाणे प्रमाणशीर प्रतिनिधित्व देऊन नामनिर्देशनाव्दारे करणे करीता सदर कलमा अन्वये महानगरपालिका अधिनियमान्वये गठीत करण्यात येणा-या समित्यांमध्ये महानगरपालिकेतील मान्यताप्राप्त राजकीय पक्षांना व गटांना खात्रीपुर्वक पुरेसे प्रतिनिधीत्व मिळावे म्हणून समित्यांवर बलाबलानुसार प्रतिनिधीत्व देण्याची तरतूद करण्यात आली. तसेच रिक्त होणा-या जागांवर निवृत्त झालेला मा.सदस्य ज्या मान्यताप्राप्त पक्षाचा, नोंदणीकृत पक्षाचा गटाचा आघाडीचा किंवा फ्रंटचा आहे त्याच मान्यताप्राप्त पक्षाच्या/ नोंदणीकृत पक्षाच्या/गटाच्या/ आघाडीच्या किंवा फ्रंटच्या मा.सदस्यास नामनिर्देशित करावयाचे असून विद्यमान मा.स्थायी समितीचे दिनांक १ मार्च २०१६ रोजी दुपारी निवृत्त होणारे सदस्यांची नांवे पुढीलप्रमाणे-

१) मा. ओव्हाळ रमा नितीन उर्फ सनी - पिंपरी चिंचवड महानगरपालिका राष्ट्रवादी कॉंग्रेस आघाडी २) मा. मा.गायकवाड संध्या सुरदास - पिंपरी चिंचवड महानगरपालिका राष्ट्रवादी कॉंग्रेस आघाडी ३) मा.भालेकर शांताराम कोंडीबा उर्फ एस.के.बापू - पिंपरी चिंचवड महानगरपालिका राष्ट्रवादी कॉंग्रेस आघाडी ४) मा.सौ.गवळी सुनिता (माई) पांडुरंग - पिंपरी चिंचवड महानगरपालिका राष्ट्रवादी कॉंग्रेस आघाडी ५) मा. तरस बाळासाहेब जयवंत - पिंपरी चिंचवड महानगरपालिका राष्ट्रवादी कॉंग्रेस आघाडी ६) मा.विनय उर्फ विनायक रमेश गायकवाड - पिंपरी चिंचवड महानगरपालिका राष्ट्रवादी कॉंग्रेस आघाडी ७) मा.अतुल अरविंद उर्फ नानासाहेब शितोळे - पिंपरी चिंचवड महानगरपालिका राष्ट्रवादी कॉंग्रेस आघाडी ८) मा.प्रसाद शेट्टी - भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस व राष्ट्रवादी कॉंग्रेस प्रणित (अपक्ष) आघाडी याप्रमाणे पिंपरी चिंचवड महानगरपालिका राष्ट्रवादी कॉग्रेस आघाडी - ७, भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस व राष्ट्रवादी कॉंग्रेस प्रणित अपक्ष (आघाडी) - १ या पक्षियबलाप्रमाणे नियुक्त्या करणे करीता.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका राष्ट्रवादी कॉंग्रेस आघाडीचे गटनेते मा.मंगलाताई अशोक कदम यांनी त्यांच्या पक्षाचे ७ सदस्यांची नांवे बंद लखोटयामध्ये स्वाक्षरीनीशी मा.महापौरांकडे द्यावीत. (बंद लखोटा देणेत आला.)

भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस व राष्ट्रवादी कॉंग्रेस प्रणित अपक्ष (आघाडी) गटनेते मा.भोसले राहूल हनुमंतराव यांनी त्यांच्या पक्षाच्या १ सदस्यांचे नाव बंद लखोटयामध्ये स्वाक्षरीनीशी महापौरांकडे द्यावीत. (बंद लखोटा देणेत आला.)

त्यानंतर -

मा.महापौर यांनी बंद लखोटे सर्वांसमक्ष उघडले आणि त्यामध्ये असणारी नांवे श्री.रमेश भोसले लिपीक, जनसंपर्क विभाग यांनी सभागृहात वाचून दाखविली ती पुढीलप्रमाणे

१) मा.बहिरवाडे नारायण सदाशिव - पिंपरी चिंचवड महानगरपालिका राष्ट्रवादी काँग्रेस आघाडी २) मा.सौ.पानसरे अमिना महंम्मद - पिंपरी चिंचवड महानगरपालिका राष्ट्रवादी काँग्रेस आघाडी ३) मा.काटे राहितअप्पा सुदाम - पिंपरी चिंचवड महानगरपालिका राष्ट्रवादी काँग्रेस आघाडी ४) मा. ॲड. संदीप गुलाब चिंचवडे - पिंपरी चिंचवड महानगरपालिका राष्ट्रवादी काँग्रेस आघाडी ५) मा.नेटके सुमन राजेंद्र- पिंपरी चिंचवड महानगरपालिका राष्ट्रवादी काँग्रेस आघाडी ६) मा.लोंढे शुभांगी संतोष- पिंपरी चिंचवड महानगरपालिका राष्ट्रवादी काँग्रेस आघाडी ७) मा.वाबळे संजय मल्हारराव- पिंपरी चिंचवड महानगरपालिका राष्ट्रवादी काँग्रेस आघाडी ८) मा.वैशाली जवळकर- भारतीय राष्ट्रीय काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेस प्रणित (अपक्ष) आघाडी.

ठराव क्रमांक - ८१६ विषय क्रमांक - १
दिनांक - २०/२/२०१६ विभाग - नगरसचिव

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम २० (५) मध्ये तरतूद केल्याप्रमाणे मा.स्थायी समितीवर ८ (आठ) मा.सदस्यांच्या नियुक्त्या सन २००७ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक २ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ३१ अ मध्ये तरतूद केल्याप्रमाणे प्रमाणशीर प्रतिनिधित्व देवून नामनिर्देशनाव्दारे करणेकामी मान्यताप्राप्त पक्षांचे/नोंदणीकृत पक्षांचे/गटांचे तौलनिक संख्याबळ विचारात घेवून आणि सभागृह नेता/पक्षनेता/गटनेता यांच्याशी विचारविनिमय करुन महानगरपालिकेतील पक्षांच्या/गटांच्या संख्याबळांच्या प्रमाणात १) मा.बहिरवाडे नारायण सदाशिव - पिंपरी चिंचवड महानगरपालिका राष्ट्रवादी काँग्रेस आघाडी २) मा.सौ.पानसरे अमिना महंम्मद - पिंपरी चिंचवड महानगरपालिका राष्ट्रवादी काँग्रेस आघाडी ३) मा.काटे राहितअप्पा सुदाम - पिंपरी चिंचवड महानगरपालिका राष्ट्रवादी काँग्रेस आघाडी ४) मा. ॲड. संदीप गुलाब चिंचवडे - पिंपरी चिंचवड महानगरपालिका राष्ट्रवादी काँग्रेस आघाडी ५) मा.नेटके सुमन राजेंद्र- पिंपरी चिंचवड महानगरपालिका राष्ट्रवादी काँग्रेस आघाडी ६) मा.लोंढे शुभांगी संतोष- पिंपरी चिंचवड महानगरपालिका राष्ट्रवादी काँग्रेस आघाडी ७) मा.वाबळे संजय मल्हारराव- पिंपरी चिंचवड महानगरपालिका राष्ट्रवादी काँग्रेस आघाडी ८) मा.वैशाली जवळकर- भारतीय राष्ट्रीय काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेस प्रणित (अपक्ष) आघाडी या पालिका सदस्यांच्या पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मास्थायी समितीचे मा.सदस्य म्हणून नामनिर्देशनाव्दारे नियुक्त्या करण्यात आल्या असल्याचे जाहिर करणेत येत आहे.

**महापौर**
**पिंपरी चिंचवड महानगसालिका**

**------**

(नियुक्त मा.स्थायी समिती सदस्यांचा पुष्पगुच्छ देवून सन्मान करणेत आला)

**मा.नगरसचिव -** मा.भाऊसाहेब भोईर यांना विचारावयाचे प्रश्न.

**मा.भाऊसाहेब भोईर -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा. सभागृह. महानगरपालिकेचे चार वर्षे उलटलेले आहेत. शेवटच्या वर्षाचे कामकाज सुरु झालेले आहे. खरतर प्रश्न विचारण्या मागचे मुळ कारण म्हणजे केवळ सभागृहाचा वेळ घेवून काहीतरी मनोगत व्यक्त करायचे म्हणून नव्हतेतर चार वर्षे आम्ही या महानगरपालिकेचे विश्वस्त असताना महानगरपालिकेच्या वॉर्डामध्ये निवडून आल्यानंतर निश्चितपणे प्रामाणीकपणाने काम करण्याची जी तयारी असते तो आपला प्रथम वॉर्ड आहे. वॉर्डामध्ये चांगल्या पध्दतीने काम केल्यानंतर चार वर्षानंतर समजते की आपण किती काम केलं. त्यानंतर आपली बाजू भक्कम आहे का नाही यावर आत्मचिंतन करण्याची संधी मिळते. परंतु ख-या अर्थाने आपण विश्वस्त म्हणून चार वर्ष काम केल्यानंतर या शहराचा जो सर्वांगीन विकास आहे तो या शहराच्या अर्थकारणावर अवलंबुन आहे आणि भविष्याचा वेध घेवून नेमकी कोणती उपाययोजना करणे गरजेचे आहे किंबहुना झालेल्या चुकांची पुनरावृत्ती भविष्यामध्ये होवून वर्तमान घोषीत होऊ नये यासाठी आपण काहीतरी केले का याचे देखील आत्मभान आपल्याला असणं आवश्यक आहे. सभागृहातील माझ्या सर्व सहकार्याना मी सांगू इच्छितो की पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे केवळ हे दोन अतीशय असामान्य प्रश्न विचारल्यानंतर किती विदारक माहिती आपल्यासमोर येते याचे जीवंत दृष्य देखील आपल्या सर्वांच्या समोर आहे. आयुक्त साहेब, एक वेळ अशी आली होती की, आशिष शर्मा आयुक्त होते, योगेश भाई महापौर होते आम्ही सर्वजण त्याठिकाणी बसलो त्यांनी सांगीतले की १०० ते १२५ कोटी रुपये कर्ज आपल्याला घेणे गरजेच आहे आणि आपण कर्ज घेतल्यानंतर कुठतरी आपण सुरळीत वाटचाल करु शकतो, तरी तुम्ही मला मदत कराल का. त्यावेळेस आम्ही सर्वांनी मदत केली. बजेटवर प्रथमच महानगरपालिकेच्या इतिहासामध्ये सभागृहात भाषण होऊ दिली नाहीत, आहे तसच बजेट मंजूर केले. मी आल्यानंतर काय केलय, या केवळ मला काहीतरी करायच आहे आणि मी काहीतरी करुन दाखवतोय या हव्यासापोटी आज संपुर्ण महाराष्ट्र राज्य हे कर्जाच्या खाईत आहे. व्याजावर व्याज, व्याजावर व्याज. आयुक्त साहेब, मला असं वाटतं ज्या पध्दतीने हा कारभार चाललेला आहे या सभागृहामध्ये मी एकमेव कार्यकर्ता असेल किंबहुना त्यावेळेला सर्व सभागृहाने साथ दिली. बंद नळ योजना ज्यावेळेस आणली ती आणल्यानंतर मी सांगीतले ही योजना ही अतीशय उपयुक्त आहे पण त्याचे नियोजन चुकीच आहे, ही योजना आताच ताबडतोब बंद करा नाहीतर आठ वर्षानंतर या शहराला ७०० ते ८०० कोटीला सामोर जाव लागेल आणि तीच परिस्थिती आज तुमच्या समोर आलेली आहे. काही ठेकेदाराच्या अजगराच्या विळख्यात आपली महानगरपालिका सापडलेली आहे. आयुक्त साहेब, तुम्ही संपुर्ण महानगरपालिकेचा अभ्यास केलेला आहे. पाच-पाच कोटी रुपये नगरपरिषदेचे बजेट येते. काही ग्रामपंचायतीचे उत्पन्न ३५ हजार रुपये आहे आणि आपण

१०० कोटी ते ५०० कोटी अशा पध्दतीचे टेंडर काढतो की त्याच भविष्य काय, त्याच नियोजन काय आहे ते त्या कालखंडामध्ये पुर्ण होईल का. त्याची उपाययोजना व्यवस्थीतरीत्या आखली का यावर कोणाचही नियंत्रण नाही आणि म्हणून भविष्यात जर महापालिका कर्जाच्या खाईत गेलीतर त्याचे संपुर्ण प्रायश्चित आम्हांला करावे लागेल. एखादया भुमीकेच समर्थन करत असताना ते भुमीकेचे समर्थन चुकीच असेलतर त्याचे प्रायश्चित याच ठिकाणी करावे लागते हा इतिहास देखील आपल्याला नाकारता येणार नाही. प्रशासनाने याठिकाणी आकडे दिलेले आहेत या आकडयावर माझा विश्वास नाही. मिळकतकराची थकबाकी २८४.१२ कोटीची आहे. एलबीटीच्या माध्यमातून अडचणीच्या कालखंडामध्ये आपण टप्प्या मध्ये आलो आहोत ३०० ते ४०० कोटीने आपले उत्पन्न कमी झालेले आहे आणि अशा परिस्थितीमध्ये आपण बीनधास्त सांगीतल की, हे फक्त अधिकृत आकडे आहेत, मिळकती ज्या दिलेल्या आहेत त्या हस्यास्पद आहेत. कर आकारणी न झालेल्या मिळकती संख्या १७१२८ नमुद केलेले आहे. माझ्या बरोबर चला मी ४० हजार मिळकती नोंद न झालेल्या दाखवितो. या महानगरपालिकेचे विश्वस्त म्हणून आपण आहोत आणि या महापालिकेच्या सर्वांगीन विकासासाठी कोणीतरी भविष्याची चिंता राखून करणार आहोत का नाही. प्रशासनाच्या माध्यमातून दिलेले काम, मला माझ्या वॉर्डातील काम झाल, आयुक्त चांगले आहेत मी सांगीतले ज्या पध्दतीने वाट दाखवली त्या दिशेने वाटचाल झाली. पण या महानगरपालिकेची दिशा, आपण कुठे चाललो आहोत याच किमान प्रशासनाची एक नैतीक जबाबदारी आहे कारण नेहमी आम्ही आम्हांला स्वत:ला टेम्परररी समजतो, पण तुम्हीतर परमनन्ट आहात. तुम्ही त्या खुर्चीची बांधीलकी ठेवून आपण किती प्रामाणिक आहोत याचे तुम्हांला स्वत:ला देखील आत्मचिंतन करतोत की नाही करत याच देखील या सभेच्या निमीत्तान आणि या प्रश्नांच्या निमीत्तान आपल्याला आवाहन करतो. याला आपण समाधानी आहात का. पाणीपुरवठयाची ४०.४९ कोटी इतकी थकबाकी आहे. मुळात पाणी योजनेवर पाण्याच्या वाटपा पासून कर रुपातून ४० ते ५० कोटी आपण लॉस आहोत आणि वसुलीमध्ये सुध्दा ४० ते ५० कोटी लॉस आहोत म्हणजे हा आकडा १०० ते १२५ कोटी पर्यंत जातो. शंभर, सव्वासे, पाचशे कोटी फक्त पिंपरी चिंचवड शहरामध्ये ऐकायला मिळतं. आपण दौरे बाहेर करतो ना ते संबंधीत पदाधिका-यांचे दौरे हे अमरावती महानगरपालिका, सांगली-मीरज-कुपवड अशा महापालिकेचे दौरे करावेत. यांची देवाणघेवाण ज्यावेळेस आपल्यामध्ये होईल, ज्या दिवशी हा समन्वय आपल्यामध्ये साधला जाईल त्यावेळेस आपण कुठ आहोत आणि किती पाप करतो हे समजेल. मी याठिकाणी अधिक वेळ भाषण करण्यासाठी हा प्रश्न विचारलाच नाही. सर्व सभासदाला देखील कळू दयात, या शहरातील जनतेला देखील कळू दयात. किमान ४०० ते ५०० कोटी रुपयचे प्रकल्प आपण एसी मध्ये बसून करतो. हे प्रकल्पच एवढे आहेत की आपली वजन उचलण्याची क्षमता ५० किलो आहे आणि ५०० किलो वजन तुम्ही उचलता. पाया भक्कम करण्याचे काम हळूहळू चाललेले आहे.

आणि या सर्व परिस्थितीच आपण जर वेळेतच भान ठेवल नाही तर प्रत्येकाला उत्तर दयायच आहे. वॉर्डाच्या माध्यमातून आपण बरोबरच आहोत वॉर्डामध्ये "सर सलामत तर पगडी पचास" ते बरोबर आहे परंतु शहर म्हणून, या शहराच्या सर्वागींन विकासासाठी अस्थापनाचा खर्च काय आहे, आपण कोणत्या मार्गाने मागणी पुर्ण करतो, मागणी सर्वागीन प्रसिध्दीसाठी किंबहूना माझ नेतृत्व या ठिकाणी शहरात उंचाव म्हणून काहीतरी मागण्या आपण मान्य करतोय का हे पाहण्याची सुध्दा कुठंतरी वेळ आलेली आहे. प्रत्येकानी स्वत:च्या राजकारणाच्या माध्यमातून आर्थीक कारण आणि आत्मिक नुकसान करुन ही महापालिका खड्डयात जाईल अशी परिस्थिती निर्माण झाल्या शिवाय राहणार नाही. १९८२ साली पुणे शहराला मेट्रोपोलीटन सिटी म्हणून जाहीर केले आणि त्यानंतरच्या कालखंडामध्ये तेथील उदयोगधंदे बाजूच्या पिंपरी चिंचवड शहर मध्ये आले. पिंपरी चिंचवड तीन ते साडेतीन लाखाच शहर १८ लाखावर गेलं ती मेट्रोपोलीटन सिटी झाली नंतर ती चाकणला पुढे गेली. आज नियमच आहे जसं मुंबईच्या बाहेर वसई, विरार, ठाणे, नवी मुंबई वाढल तसं या परिसरातून औदयोगीकरण शहराच्या बाहेर जातं आपल्या उत्पन्नाला पुर्ण बाधा बसली आणि फक्त भौतीक उत्पन्न राहत, भौतीक उत्पन्न म्हणजे मिळकतकराच्या माध्यमातून जे उत्पन्न येते ते. आणि ते सुध्दा अतीशय विदारक चित्र आहे ते तुम्हांला भविष्यात कुठेही माफ करणार नाही. आयुक्त साहेब, प्रश्न विचारण्या पाठीमागची एकच खंत मी याठिकाणी व्यक्त करतो. साहेब, तुम्ही ग्रामीण भागात देखील काम केलेल आहे, तेथील अवस्था, तेथे अर्थकारणावरुन एका नगरसेवकाला ५ लाखाचा रस्ता करायचातर घरातून तो सकाळी ७ लाच जातो. कारण की ते पाच लाखाच टेंडर काढायला दोन-दोन, तीन-तीन वर्षे लागतात. आपण साफसफाई आणि किरकोळ खर्च यासाठी १४ कोटीच हेडच करतो हा किरकोळ खर्च कुठं करतो हे आजपर्यंत मला समजल नाही. तो ठेकेदार किरकोळ असतो पण खर्च फार मोठा करतो. तो किरकोळ मधुन गडगंज होतो पण आपली महापालिका मात्र आर्थीकदृष्टया हाळूहाळू अतीशय पध्दतशीरपणे कर्जाच्या खाईत चाललेली आहे आणि भविष्यामध्ये या सर्व गोष्टीला सामोर जायच असं गृहित धरुन किमान आयुक्त साहेब हे जे तुम्ही वाचवलेनां आणि मेट्रोसाठी ४०० ते ५००, १००० कोटी ठेवले असे जर आपण म्हणत असूनातर कोणतेही कर्ज घेण्याची वेळ यायची नाही एवढा पैसा आहे या पैशाकडे दुर्लक्ष करु नका. मोठे प्रकल्प तुम्ही या वर्षामध्ये किमान निवडणूका आहेत, निवडणूकाच्या अगोदर चार महिने आचारसंहिताच चालू राहणार आहे माझी एक नम्रं विनंती तुम्हांला आहे हे काम करण्याची तुमच्यासाठी अतीशय चांगली संधी आहे आणि तुम्हांला देखील समाधान मिळेल. या पाच सहा महिन्यामध्ये मोठया प्रकल्पाचे उद्घाटन बंद करा. काही होणार नाही, फार मोठी क्रांती होणार नाही. पण ही महापालिका उध्दवस्त होऊ नये याच प्रायश्चित आम्हांला करायला लागू नये यासाठी भान ठेवून आपण काम कराव अशा पध्दतीने मी मागणी करतो.

**मा.राजेंद्र जगताप -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. आताच भाऊसाहेब भोईर यांनी पाणीपुरवठया संदर्भात प्रश्न विचारलेले आहेत. खरोखरच महापालिकेमध्ये नोंदणीकृत मिळकतकर आहेत जवळ जवळ १५ हजार प्रभाग क्र. ५७ मधलेच मी काढलेले आहेत आणि नवीन नोंदणी २९०० आहे व प्रलंबीत मिळकती १७५ आहेत. सन २०१२ नंतर मिळकतधारकांना पाणीपुरवठा दयायचा नाही असा नियम आहे त्यामुळे नळकनेक्शन आपण देत नाहीत, असं असताना नोंदी होत नाहीत. असे असताना ३ हजार मिळकतीना नळकनेक्शन अनधिकृत आहेत का अधिकृत आहेत याचा सर्व्हे केला का. पाणीपुरवठयासाठी आम्ही सातत्याने आपल्याला भेटत असतो इतर अधिका-यांनाही सांगत असतो की आपण पाण्याची काटकसर केली पाहिजे. आम्हीतर आमच्या प्रभागामध्ये लोकसभा असेल, विधानसभा असेल त्यावेळेला प्रत्येक गल्लीमध्ये, प्रत्येक सोसायटीमध्ये मिटींगा घेतल्या, त्याठिकाणी आम्ही पाण्याच्या बाबतीत महत्व सांगीतले, पाण्याचा रेट काय आहे, आपण पाणी किती वापरतो, किती वापरले पाहिजे असे असताना जे आपल्याला पाणीपुरवठयाच्या पाणीबीलामध्ये प्रती लीटर एक हजार लीटर पाणी २.५० पै. नंतर ५.५० पै. नंतर १०/-, नंतर १५/-, विनापरवाना बिगर निवासीसाठी पाण्याचे दर ३५/- एक हजार लीटरला असा आहे. तीन हजार मिळकती आहेत याला २.५० पै. आहे, कोणीही बघत नाहीत की याच्यामध्ये नोंदी किती आहेत. आपलेच अधिकारी सांगतात की या या प्रमाणे तु पाणी घे आणि असे असे बसव, अशा पध्दतीने आपला कारभार चाललेला आहे. पाणीपुरवठा विभागात आता जर पाहिलतर सुरवातीला २०१२ ला ज्यावेळेस आम्ही निवडून आल्यानंतर शर्मा साहेब आयुक्त होते त्यांनी पाहिले आमच्या परिसरात, पिंपळेगुरव प्रभागामध्ये जवळ जवळ १ लाख ८० हजार ली. पाणी रोजच्या रोज बाहेर जात असत. मी आल्यानंतर प्रत्येक वेळेस सांगायच, दोनशे दोनशे महिला येवून उभे रहायच्या म्हणायच्या आमच्याकडे पाणी नाही. अशी परिस्थिती असेलतर आपल्या पुण्याच्या परिसरामध्ये हिंजवडी परिसरामध्ये पाणी टॅंकरने भरुन जात होते. कारण टॅंकर आता कमी झाले आमच्याकडे आता वॉल बंद केलेला आहे. कारण १२०० ली. चे टॅंकर, २२ हजार ली.चे टॅंकर सिजन हॉटेलला औंधमध्ये विकले जात होते मी स्वत: फोन केला त्याच्या मागे एक माणुस सोडला. त्या माणसाला मी सांगीतल की हा टॅंकर कुठे कुठे जातो ते बघ. हिंजवडीला आपला काही संबंध नव्हता पण हिंजवडीला सुध्दा टॅंकर जात होते. पिंपळेगुरवला एक-दोन टॅंकर दिल्यानंतर बाकीचे टॅंकर तीकडे जात होते. आम्ही सांगीतल्यानंतर तीथला वॉल बंद केला आणि ते थांबलं. अशी पाण्याची परिस्थिती असताना परवा दोन वर्षे झाले आमच्या परिसरा मध्ये आम्ही एक टाईम पाणी घेतो. कारण दोन दोन टाईम काही ठिकाणी पाणी असते व काही ठिकाणी २४ तास पाणी असते. सगळया लोकांना पाणी मिळाव म्हणून पाणी एकच टाईम ठेवा असा आम्ही आपल्याला आग्रह केलेला होता. मी मागच्या जीबीमध्येही बोललो आहे की आपण आता स्विमींग टॅंक बंद करावेत असे सांगीतलेले होते. आमच्या येथील

स्विमींग टँकला रोज १२ हजार लीटर आणि आठ दिवसाला ५० ते ६० हजार लीटर पाणी लागते. कारण बोअरवेल असलेतरी त्याला पाणी जास्त दिवस चालत नाही. १० टँकर आहेत ६० हजार लीटर पाणी एका एका स्विमींगटँकला लागते. याठिकाणी सगळया स्विमींग टँकला येणारे कधी बाहेर परदेशात गेलेत का, कधी स्विमींग स्पर्धेमध्ये भाग घेतला का. कारण आताच्या परिस्थितीमध्ये पाणी बंद करणे महत्वाच होतं. पाणी शुध्दीकरण करण्यासाठी जी प्रक्रिया करतो त्याला ८५ हजार रुपये इतका एका स्विमींग टँकचा खर्च आहे. दहा स्विमींग टँकचा किती खर्च होतो याचा कधी हिशोब केला का हे सुध्दा आपण पाहिल पाहिजे. ८५ हजार एका स्विमींग टँकचा खर्च आहे. आपण सांगीतले धरणामध्ये ४८ टक्के पाणी आहे. पाच ते सहा महिने राहीलेले आहेत. जुलै एण्ड पर्यंत पाऊस पडेल असं कोणी सांगतय का. या परिस्थितीमध्ये आपण हे स्विमींगटँक कधीच बंद करायला पाहिजे होते. पिंपरी चिंचवड मधील स्थानिक लोक स्विमींग करण्यासाठी फार कमी येतात. कारण आमच्याकड भोसरीमधले येतात, औंध मधले असतील, रेल्वे मधले आहेत, खडकी मधले आहेत इकडचेच लोक स्विमींग टँकला येतात त्याचे कारण असे की आपल्याकडे स्विमींगसाठी रेट १०/- रुपये आहे म्हणून आपल्याकडे लोक येतात तीकडे ५०/- रेट आहे. प्रत्येक नगरसेवक सांगत असतो पाण्याची बचत करावी, पाणी वाचवा आपल्या अधिका-यांची सुध्दा तेवढीच जबाबदारी आहे. प्लंबर मिळण्यासाठी दोन वर्षे झाले मी पाठपुरावा करतो, आता सहा महिन्यापुर्वी मिळालेला आहे. ठेकेदाराचे प्लंबर काय करतात, कुठे कनेक्शन घेतात हे त्यांना कुणालाच माहिती नसते. बेकायदेशिर कनेक्शन घ्यायच आणि पुढ निघायचं असं ते करतात मी आपल्या अधिका-यांना कितीतरी वेळा सांगीतल की प्रायव्हेट प्लंबर असे करतात त्यांच्यावर कारवाई करावी ते बेकायदेशीर कनेक्शन देतात. सातत्याने सगळे नगरसेवक सांगत असतात. आपले अधिकारी सांगणार नगरसेवकांचा फोन आला, पण एखादा कोणाचा तरी फोन येत असतो व त्या फोनवर दुसराच कोणीतरी बोलत असतो. परत सांगणार की नगरसेवकांचा फोन आला म्हणून आम्ही जप्त केलेली मोटर परत देवून टाकली. असे कुठल्याही नगरसेवकांच काही नसतं. आपल्या अधिका-यांना काम करण्यास उल्हासच नाही म्हणून अशी परिस्थिती येते. तरी आपण हे पुढचे पाच ते सहा महिने सर्वानी पाणी जपुन वापरले पाहिजे याच्यासाठी आपण त्याचा निश्चितपणे विचार केला पाहिजे.

**मा.सुरेश म्हेत्रे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. मिळकती बद्दल माहिती दिली आहे. ४,२६,२४१ मिळकती आहेत त्या अनुषंगाने आपले अधिकृत नळकनेक्शन किती आहेत याची माहिती दयावी.

**मा.लडकत (कार्यकारी अभियंता) -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. घरगूती अधिकृत नळकनेक्शनची संख्या १,२८,७२५ आहे व कमर्शीअलची संख्या ३९४२ इतकी आहे. याच्यामध्ये कनेक्शनची जी संख्या आहे त्याच्यामध्ये सोसायटी विचारात घेतलीतर एका

सोसायटीला आपण एक कनेक्शन देतो. जर एखादी १०० फ्लॅटसची सोसायटी असेल आणि एक कनेक्शन असेलतर एकच कनेक्शन धरतो.

**मा.सुरेश म्हेत्रे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह अशा किती सोसायटया निघतील.

**मा.लडकत (कार्यकारी अभियंता) -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. अशा मीटर असलेल्या सोसायटीची संख्या जी आहे ती १०,३४२ व सिंगल घर धरलतर ते १,२१,११६ आहेत.

**मा.सुरेश म्हेत्रे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. आपल्या मिळकती ४,२६,२४१ व सोसायटयाची संख्या १०,३४२ वजा केलेतर ४,१५,८९९ राहतात. विषय असा आहे की मिळकती ४,२६,२४१ असताना अधिकृत नळकनेक्शन एवढे कमी कसे काय. प्रत्येक मिळकतीना अधिकृत नळकनेक्शन का नाही.

**मा.लडकत (कार्यकारी अभियंता) -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. यामध्ये सोसायटीचे एकच कनेक्शन धरतो.

**मा.सुरेश म्हेत्रे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. आपल्या जेवढया मिळकती रजिष्टर आहेत त्याप्रमाणे सेप्रेट कनेक्शन पध्दत करावी. १६ कोटी कॅनबेरीला पाच वर्षाचा करारनामा करुन दिला ते पैसे वाचतील. मिळकतीच्या संपुर्ण नोंदी करणे गरजेचे आहे. मिळकत बीलामध्ये पाणीबील इअरली दयावे अशी विनंती आहे. बील पेन्डींग पडलेले आहेत, मीटर जादा पळतो म्हणून वादामध्ये कितीतरी बील पडलेले आहेत. जे अधिकारी काम करतात त्यांचा सुध्दा वेळ जातो. प्रत्येक मिळकतीनुसार मिळकतकरालाच पाणीपट्टी बील दिलेतर चांगल होईल. ग्रामीण भागात एक मालक असतो व वीस खोल्या असतात त्याचे मिळकतकराबरोबर पाण्याचे बील आलेतर तेवढे कनेक्शन वाढतील. एका खोलीमध्ये चार माणसतरी असतात. त्याच्या खोल्या मिळकतकरात आल्यातर आपली पाणीपट्टी वाढेल व मिळकतकरही वाढेल. तसेच फ्लॅटसच्या बाबतीत एक कनेक्शन असते. झोपडपट्टी भागात किती नळ आहेत याचा हिशोब नाही. अधिकृत भागाला पाणी कमी पडते याच कारण आहे की अनधिकृत कनेक्शन. यामध्ये बदल केला पाहिजे व राहीलेल्या मिळकती रजिष्टर केल्या पाहिजेत. मी माहिती मागीतली होती ती आपल्या अधिका-यांनी दिलेली नाही. किती नोंदणी राहिलेल्या आहेत परंतु त्याची माहिती मला मिळाली नाही. नव्याने किती नोंदणी झाल्या त्याचे उत्तर अदयाप मिळालेल नाही. सर्व्हेनुसार मिळकती आलेल्या असताना नोंदणी अजून झालेली नाही. महापालिकेच्या उत्पन्नाचा मार्ग एकच आहे. ज्यांच्या नोंदी राहिलेल्या आहेत त्यांच्या नोंदी घेतल्या पाहिजेत. त्यांना प्रत्येकाला कनेक्शन आहे असा अभिप्राय पाणीपुरवठा विभागाने देणे गरजेचे आहे. पावसाळयामध्ये माझ्या तेथील तो चेंबर उघडा ठेवला त्यामध्ये पावसाच पाणी पडलं त्यात मच्छर झाले. महिला येतात चेंबरचे झाकण काढल्या नंतर त्यांना ते ठेवता आले

नाही की तसेच ठेवतात. ज्यावेळेस मच्छर व्हायला लागले हे बघीतलेतर त्यामध्ये पाणी साठलेल होतं. कॅनबेरी संस्था काम करते का नाही त्यांचा डेटा याची माहिती मी घेणार आहे. परंतु आपले जर पैसे वाचवायचे असतीलतर आणि आपले उत्पन्न वाढवायचे असेलतर मिळकतकर आणि पाणीपट्टी यांनी संलग्न काम केल पाहिजे आणि हे दोन्ही अधिकृत कनेक्शन झाले पाहिजे एवढेच मी आपल्याला सांगतो आणि थांबतो, धन्यवाद.

**मा.अनंत को-हाळे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा. सभागृह, सर्व अधिकारी वर्ग व पत्रकार मित्र. आज भाऊसाहेब भोईर यांनी चांगल्या विषयी प्रश्न विचारलेले आहेत. महापालिकेच्या उत्पन्नाचा जो पाया आहे तो करसंकलन. गायकवाड साहेब जेव्हा पासून काम करतात तेव्हापासून त्यांनी चांगल्या पध्दतीने कामकाज बांधलेले आहे तरी सुध्दा काही अडचणी आहेत त्यातील एक छोटस उदाहरण सांगतो काल माझ्या भागामध्ये पाचव्या मजल्यावरुन एक मुलगा पडला श्रीहरी देशमाने त्याचे नाव आहे. महापौर साहेबाना मी म्हणालो आपण श्रध्दांजली वाहू परंतु महापौर म्हणाल्या श्रध्दांजलीचा कार्यक्रम झाला आहे. काही हरकत नव्हती परत आपण श्रध्दांजली घेऊ शकलो असतो. तो मुलगा पडला याच जेवढ गांभीर्य आहे त्याच्या पुढची गांभीर्याची गोष्ट एक म्हणजे महानगरपालिकेचे जे बांधकाम परवानगी विभागाचे नॉर्म्स आहेत ते कधी कधी धोकादायक आहेत. त्यात बदल करायचा असेलतर काय केले पाहिजे. काल मी एका ठिकाणी पुजाला गेलो, मी सहाव्या मजल्यावर पुजासाठी गेलो तेथे मी गॅलरीमध्ये गेलो तेथून खाली बघीतलेतर त्याला तीन फुटाचे रेलींग होते. मी निकम साहेबांशीही यावर चर्चा केली हे तीन फुटाच रेलींग तुम्हांला वाढविता येणार नाही का असे विचारले. याच्या अगोदर पण असे भरपुर अपघात आपल्या भागात झालेले आहेत. आयुक्त साहेब, या विषयी तुम्ही बांधकाम परवानगी विभागाला निर्देश दयावेत. आपण बांधकाम परवानगी देतो परंतु कम्प्लेशनसाठी कोणी येत नाहीत त्यामुळे उत्पन्न आपले बुडते आणि कम्प्लेशन घेत नाहीत म्हणून हे असे ॲक्सीडेंट होतात. पठाण साहेबांना मी पत्र दिलेले होते त्याचे आठ महिन्यापासून मला उत्तर मिळालेले नाही. तुम्ही खुप बीझी असल्यामुळे मी तुम्हांला नंतर मागीतले पण नाही. मी विचारले होते १९९५ पासून २०१५ पर्यंत आपण किती जणांना बांधकाम परवानगी दिलेली आहे आणि किती लोकांनी आपल्याकडून कम्प्लेशन घेवून गेलेले आहेत. हा नागरीकांच्या जीवनाचा विषय आहे त्याच्याकडे आपण गांभीर्याने बघीतले पाहिजे. हा तर विषय आहेच परंतु त्याच बरोबर महापालिकेच्या उत्पन्नाचा देखील विषय आहे. आपल्याला उत्पन्नाचे आता वेगळे स्त्रोत येणार नाहीत. ज्या लोकांनी आपल्याकडून बांधकाम परवानगी घेतली ते लोक आपल्याकडे कम्पलेशनसाठी येत नाहीत. चुकीच्या पध्दतीने बांधकाम करतात त्याच्यामुळे हे ॲक्सीडेंट होतात. आपण दंडात्मक कारवाई करावी. ज्यांनी ज्यांनी कम्प्लेशन घेतलेले नाही त्या सगळया बिल्डर्सना महापालिकेनी पत्र पाठविले पाहिजे तुम्ही कम्प्लेशन का घेतल नाही म्हणून, त्यांनी कम्प्लेशन घेतले नसेलतर पुढची बांधकाम परवानगी

आपण थांबविली पाहिजे. कितीतरी बिल्डींग बांधलेल्या आहेत परंतु मोठमोठे बिल्डर कोणीही कम्प्लेशन घेत नाहीत. महापालिकेनी ईडब्ल्यूएस बांधलेले आहे त्याठिकाणी सुध्दा एक मुलगी पाचव्या मजल्यावरुन पडलेली आहे. मा.महापौर साहेब आपण या सगळया गोष्टीकडे गांभीर्याने बघीतले पाहिजे आणि अधिका-यांना आदेश दयावेत. लहान निष्पाप मुलाचा जीव, छोटयाशा चुकीमुळे, चुक आपली प्रशासनाची असेलतर ती गांभीर्यांन घेणं गरजेच आहे व निश्चितपणे तुम्ही त्याप्रमाणे आदेश दयावेत. ज्यांनी ज्यांनी कम्प्लेशन घेतलेले नाही त्यांना कम्प्लेशन घेण्यासाठी प्रवृत्त कराव म्हणजे आपले पण उत्पन्न वाढेल, धन्यवाद.

**मा.प्रशांत शितोळे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. भाऊसाहेब भोईर यांनी विचारलेले प्रश्न अतीशय विचार करण्यासारखे आहेत. सुरवातीला मिळकतकराच्या बाबतीत काही प्रश्न विचारलेले आहेत त्याच्यानंतर पाणीपुरवठयाचे प्रश्न विचारलेले आहेत. याच विषयाला अनुसरुन माझ्या दोन-तीन शंका आहेत. मा.महापौर साहेब, या प्रश्नाला अनुसरुन त्यांनी जी उत्तर दिलेली आहेत त्यामध्ये थोडी शंका जाणवते. थकबाकी असलेल्या मिळकतकराच्या आकडयामध्ये तुम्ही अवैद्य बांधकाम शास्ती दिली, तुम्ही वसुलपात्र मागणी दिलेली आहे ते दंडासहीत आहेत का नाहीत हे कसे कळणार. मा.महापौर साहेब, शहरातल्या प्रत्येक मिळकतधारकांना आपण जप्तीच्या नोटीसा दिलेल्या आहेत, पेपरला दिलेल आहे. जप्तीची कारवाई करु असे सांगीतलेले आहे, जप्तीची कारवाई तुम्ही नाही करु शकत. आपण एक फुटभरही जप्त करु शकत नाहीत. मी गायकवाड साहेबांना फोन करुन सांगीतले होतं आपण नोटीसा देवू नका. सर्वपक्ष नेत्यांची बैठक बोलवा हा प्रश्न गांभीर्याचा आहे. तुम्ही शहरातील प्रत्येक मिळकतीला ही नोटीस पाठवता दंडाचा उल्लेख केलेला आहे का. उदया अंदाजपत्रक सादर होईल त्या अंदाजपत्रकामधे याचा समावेश केला आहे का जी वसुली होणार आहे. एखादा प्रश्न त्याला अनुसरुन असेलतर सभागृहाला हे उत्तर दयायचे. शास्तीची रक्कम काही संबंध नाही आपल्या येथे कॅलक्यूलेशन करायची, शास्तीची रक्कम ही शासनाला पाठवावी लागते. आज रोजी शास्तीची रक्कम एवढी मोठी जरी असलीतरी ती तुमच्याकडे नागरीक भरत नाहीत. आम्ही सुध्दा नागरीकांना सांगतो जोपर्यंत सरकार अनधिकृत बांधकामाच्या बाबतीत निर्णय घेत नाही तोपर्यंत तुम्ही शास्ती भरु नका. शास्ती याचा अर्थ काय शास्ती जर भरलीतर नागरीकांना वाटते माझे घर सुरक्षीत झाले जर कुठलही शासन जर त्या घराला अशी सुरक्षीतता देत नसेलतर ती शास्ती का भरावी. म्हणजे उदयाच्या काळात जर मला शास्तीची नोटीस आली किंवा शास्तीकर माझ्यावर लागू झालेला आहे, माझ मत काय आहे की मी याबाबत शासनाला शास्ती भरली असेलतर शासन माझे घर हे अधिकृत करेल, परंतु ते राहील बाजूला. शासन शास्तीच्या बाबतीत कुठलाच निर्णय घेत नाही. सगळयांना माहिती आहे अनधिकृत बांधकाम हा वेगळा विषय आहे आणि २००९ नंतर लागू केलेली शास्ती हा वेगळा विषय आहे पण सर्वसामान्य नागरीकांच्या ते लक्षात येत नाही. त्यामुळे आपण स्वतःहून ती

दखल घेतली पाहिजे. आज रोजी आपल्या करसंकलन मध्ये काय परिस्थिती आहे सांगावे. आपण नुसता टॅक्स घेत नाहीततर शास्तीसह भरा म्हणतात. कशासाठी तुम्ही हे आमच्या माग लावल. आमच्या प्रत्येक घराला जर तुम्ही तिथं शिक्का मारुन देणार असालतर, विनापरवाना बांधकाम त्याच्या वरती परत शास्ती लावून त्याची वसुली करणार असालतर हे शंभर टक्के चुकीच आहे. तुम्ही शास्ती करा शासनान तुम्हांला बंधनकारक केल आहे. गेल्या काही वर्षापासून शास्ती ही सर्वच महानगरपालिकाना लागू आहे पण ती शास्ती लागू होत असताना आमच्या काही मागण्या आहेत की आपल्या शहरात इथल्या प्रत्येक नागरीकांना जर शास्ती नको पाहिजे असेलतर, ज्यांना लागू झालेली आहे त्यांचा तरी प्रशासनाने योग्य तो प्रस्ताव योग्य ती कारवाई करण्यासाठी शासनाकडे पाठविला पाहिजे. आज तुम्ही शास्ती वसुलीच्या नोटीस देताय त्याच्यावर दंडही लावताय, दंड वेळेत भरला नाहीतर चक्रवाढ लावताय. बरं काहीच झाल नाहीतर आम्हांला गाजर पण दाखवतो ७५ टक्के दंडात तुम्हांला सुट. कशासाठी शंभर टक्के सुट दया जर एखादा वेळेत भरत असेलतर. ही सुट दंडामध्ये दिलेली आहे दंड कमी केला नाही किंवा माफ केलेला नाही. ही संपुर्णपणे आयुक्तांच्या अधिकारामध्ये असलेली ही गोष्टी आहे, त्यामुळे आपण याच्यावर योग्य तो निर्णय घेवून आमच्यासमोर ठेवले पाहिजेत. आज जवळपास आपल्याकडे चार ते पाच लाख मिळकती आहेत त्यातल्या एक ते दिड लाख या अनधिकृत आहेत. याठिकाणी आकडे दिलेले आहेत. आमची थकबाकी आहे ११३४ कोटी. हे ११३४ कोटी म्हणजे आपल आख्ख बजेट झाले. खरच तुमच्याकडून हे होणार आहे का, शंभर टक्के होणार नाही. यामध्ये कोर्ट केस, लिक्वीडेशन, एफआयआर इ. मध्ये गुंतलेली मागणी ही २७६ कोटी आहे. आपण कॉम्प्रमाईज करुन वसुल करु शकत नाहीत का. आणि तसे काही ऑप्शन नसतीलतर त्याचा आपण अवलंब केला पाहिजे. तुम्हांला उदयाच्या काळात उत्पन्न कमी होईल याचा अर्थ तुम्ही प्रत्येक नागरीकांकडे वेगवेगळया मागण्या घालीत बसायचं. या व्यावसायीक स्वरुपाच्या कोर्ट केसेस आहेत किंवा निवासी स्वरुपाच्या केसेस असतील, त्या कोर्ट केसेस जर कॉम्प्रमाईज होण्यासारख्या असतीलतर त्यांना जर पाच ते दहा टक्के सवलत देवून ते लोक भरायला तयार असतीलतर आज शंभर टक्के या २७६ कोटीमध्ये दहा ते वीस टक्के सवलत धरा २२५ कोटीतरी जमा झालेतर तसा प्रयत्न करायला काही हरकत आहे का. २८४ कोटीची थकबाकी आहे आणि ११३४ कुठे म्हणजे जवळपास ९२५ कोटीचा फरक आहे. मुद्दाम सभागृहाला जाणीव करुन दयायची आहे की हे आकडे ज्यांनी पाहिले ज्याला दिसतात ते आम्हांला कळत नाही म्हणूनच आमच्या समोर ठेवले असच माझ मत आहे. पण याच्या मागे एक गुपीत दडलेल नक्की आहे की नागरीकांकडून काहीही करुन तुम्हांला ती वसुली करायची आहे. तुम्ही न भरणा-या नागरीकांकडून शंभर टक्के वसुल करा पण प्रामाणीकपणे वर्षानुवर्ष जर एखादा नागरीक कर भरत असेलतर त्यांला सुध्दा तुम्ही ॲप्रेशिएशन दिले पाहिजे. तुम्ही जी माहिती दिलेली आहे ती जरी फॅक्ट असलीतरी ती आपण

वसुल करु शकत नाहीत. या नागरीकांना आज आपण अनेक सुविधा देतो. दुसरा प्रश्न पाणीपुरवठयाचा यालाच लागून आहे. एका बाजुला अनधिकृत बांधकाम करु दयायचे, त्याला नोटीस दयायची. त्याच बांधकाम पाडण्याच्या यादीत घ्यायच आणि दुसरीकडे म्हणायच २०१२ पासून अनधिकृत बांधकामाला नळ जोडणी. कुठल्या कायदयात लिहील आहे. आपल्या शहरात जो माणुस येईल त्यांला पाणी देणे हे आपल पहिल कर्तव्य आहे तुम्ही म्हणूच शकत नाहीत त्याला पाणी नाही देणार. आता राजेंद्र जगताप यांनी त्यांच्या वॉर्डातील प्रश्न सांगीतला. तीन हजार लोकांनी तीन हजार मिळकतीना नळ जोडले मग ते कुठून पाणी पितात. आपलेच पाणी पितांत. आपल्या महापालिकेचच पाणी येतं. याना अधिकृत नळकनेक्शन दिलेतर आपल्या उत्पन्नामध्ये नखा एवढी तरी वाढ होणार नाही का. अभय योजना देवून नुसतच गाजर दाखविल्यासारखे नागरीकांना समाधानी ठेवण्याचा प्रयत्न करतो. आज आपल्या शहरामध्ये कमीत कमी ५० हजार जोड अनधिकृत असतील. आपले शहर औदयोगीक नगरी आहे. या औदयोगीक नगरीला अर्धी इन्डस्ट्रीअल आहे तुम्ही इन्डस्ट्रीअलचा रेट वाचा. बिगर निवासीसाठी ३५ रुपये एक हजार ली.साठी आहे. त्यांना एमआयडीसीचे पाणी असेल पण ते आपल्याकडून खरच घेतात का त्यांना आवश्यकता आहे का. आताच सुरेश म्हेत्रेनी सांगीतल की मिळकतकर बीलामध्ये पाणीपट्टीबील देवून टाका. मला या निमीत्तान एक गोष्ट सांगायची आहे. २४ X ७ च १४२ कोटीचे टेंडर निघाले. तीन ते सहा महिने टेंडरची प्रोसेस असते का. आज तुम्ही २४ X ७ पाणीपुरवठा उदयाच्या काळात शहराला करणार आहोत. त्याची फेर निवीदा करावी. प्रशासनाला ज्या ज्या नियम, अटी/शर्ती घालून दिलेल्या होत्या. या शहरातील प्रत्येक घराला तुम्ही २४ X ७ चे स्वप्न दाखविले होते आज तुमची ती निवीदा प्रक्रिया सहा महिने चालू आहे. १४२ कोटीच काम आहे. मा.महापौर साहेब, एकच टेंडर आलेले आहे, एकच निवीदा तीन वेळा त्याला एक्सटेन्शन दिलेले आहे आता अजून एकदा एक्स्टेन्शन दयायचा विचार आहे. पण अत्यावश्यक काम असेलतर एकतर आपण शॉर्ट टेंडर नोटीस काढतो. एवढ मोठ आणि चांगल काम असेलतर याला कोणीतरी ठरावीक नियम अटि/शर्ती जाचक टाकून एकच माणूस तिथ कॉम्पेटेशनला येणार असेलतर याचा अर्थ हे प्रि-प्लॅन आहे. मी भाऊसाहेबांच्या मुद्दाम बंद नळपाईपलाईन योजनेची आठवण करतो त्यांनी सांगीतल आहे की याला विरोध करताना तो एक मवाळ विरोध होतो. बंद पाईपलाईन योजना चांगली आहे पण ती व्यवस्थीत राबवली गेली पाहिजे पण आज रोजी ती व्यवस्थीत राबवली गेली नाही, त्यामध्ये बरचस राजकारण झाल. पण आज ती एक हजार कोटीच्यावर जाऊन पोहचलेली आहे. १४२ कोटी २४ तास शहराला पाणी जर दयायच असेलतर उदयाच्या काळात या निवीदे प्रक्रीयेमध्ये जर काही गौडबंगाल दिसलतर आपले शहर हे २४ X ७ ला मुकणार आहे. आज जी परिस्थिती बंद नळाची झाली तीच अवस्था या १५० कोटी रुपयाच्या या पाण्याच्या निवीदा प्रक्रीयेमध्ये होऊ शकते. गावडे साहेब तुम्ही आयुक्तांना हे पोहच करायच आहे. लडकत साहेब आहेत तुमच्या अंडरच हे सगळ

चाललेल आहे. आपल्या शहराला जर २४ X ७ पाण्याचे नियोजन, सहा महिने तुमची निवीदा प्रक्रिया चालू असेल तर तुम्हांला हे दयायला सहा वर्षे लागतील निवडणूकीला वर्षे आहे, आम्हांला कुठलही चुकीचे काम प्रशासनाकडून करुन घ्यायचे नाही. जर आम्हांला चांगले काम करुन घेत असताना जर काही त्रुटी असतीलतर  त्या त्रुटी १०० टक्के प्रशासनाने नीट केल्या पाहिजेत. पाणीपुरवठा आणि मिळकतकर या प्रत्यक्ष नागरीकांशी संबंधीत असणा-या गोष्टी आहेत अतीशय गांभीर्याने याकड पाहिल पाहिजे. तुम्ही  दरवर्षी पाणीपट्टी, मिळकतकर भरतात, दर तीन महिन्याला बीलींग भरता हे शंभर टक्के चांगले आहे पण जर आपल्या नागरीकांना त्या सुविधा जर मिळत नसतीलतर महापालिका सुध्दा हे कर घेण्यासाठी अपात्र आहे. यासाठी आपण आपल्या सुविधा चांगल्या पध्दतीने पुरवा, पाणीपुरवठा असेल, मिळकतकर असेल, प्रशासनाने जबाबदारीने हे काम करावेत. लडकत साहेब, गावडे साहेब आपल्याला आठवण करुन देतो की २४ X ७ ची फेर निवीदा करावी. मिळकत कराच्या बाबतीत जी काही दंडाची रक्कम आपण लागू केलेली आहे तो दंड शंभर टक्के माफ करावा आणि शहरातील अनेक मिळकतीना ज्या नोटीसा दिलेल्या आहेत त्याची मुदत ही पुर्णपणे रद्द करावी एवढच मी या प्रश्नाच्या निमीत्ताने सांगतो आणि थांबतो.

**मा.सुलभा उबाळे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. याठिकाणी दोन नंबरचा जो प्रश्न आहे त्याच्यामध्ये मिळकतकराची एकूण थकबाकी किती आहे हे विचारले आहे. त्याच्यामध्ये सन २०१५-१६ ची एकूण मागणी ६९६.०२ आणि एकूण ११३४.३८ असे म्हणलेले आहे. मला गायकवाड साहेबांना विचारायचे आहे की, हा फुगवटा, जो आकडयाचा खेळ आपण याठिकाणी दिलेला आहे तो सर्व सन्मा.सदस्यांना कळाला पाहिजे की यामधील २५२.९० आणि टोटल २७६.३५ याच्यामध्ये कोर्टकेस, लिक्विडेशन, बीआयएफआर इत्यादीमध्ये गुंतलेली मागणी असे म्हणलेले आहे. त्याचा खुलासा करावा. याची काही खात्री आहे का की ही रक्कम गोळा होणार आहे. कारण जर तुम्ही यामध्ये ती टाकलेली आहे, आपल्या बजेटमध्ये फुगवटा दिसणार आहे की एवढी रक्कम आपल्याला येणे आहे. पण ती वर्षानुवर्षे बजेटमध्ये दिसते किंवा ती लिक्विडेशन मध्ये आपल्याला त्याठिकाणी दिसते. त्याचबरोबर अवैद्द बांधकाम, शास्ती याची २५२ कोटी थकबाकी दाखवलेली आहे. एकूण ११३४.३८ म्हणलेले आहे त्याच्यातून एकूण वसुलपात्र मागणी ६०६.०२ म्हणलेले आहे. म्हणजे याठिकाणी स्पष्टपणे असे दिसून येते की आपण फक्त ६०६ कोटी रुपये हे वसुल करु शकतो त्यावरती जी रक्कम आहे ती तुमच्या हातामध्ये वसुल करणे नाही म्हणजे सरळ सरळ आहे की ४२८ कोटी रुपये आपण वसुल करु शकत नाहीत. कारण यामध्ये वसुलपात्र मागणी म्हणलेले आहे त्यामध्ये प्राधिकरण, एमआयडीसी, एसआरए, रोड वाईडींगमध्ये गेलेल्या अधिकृत इमारती आहेत त्यांच्याकडून पैसे मिळणार नाहीत. तरी तुम्ही या ज्या मोठमोठया रक्कमा दाखवतात ते आम्हांला दाखवलेले गंगाजळ आहे. हे कागदावर दिसतय. माझी विनंती आहे की अधिका-यांनी याचा खुलासा

करावा. २७७ आणि २५२ चा खुलासा करावा. प्रशांत शितोळे यांनी सांगीतले २५२ ही शास्तीकराची आहे. ११३४ कोटीचा खुलासा व्हायला पाहिजे व ही रक्कम आपण वसुल करु शकतो का. ६०६ कोटी वसुली करु शकतो का याचा सुध्दा खुलासा करावा. मा.महापौर साहेब मी एका गोष्टीकडे आपल लक्ष वेधू इच्छिते की, सर्व सभागृहाने सुध्दा या गोष्टीकडे गांभीर्याने बघाव. आपल्याकडे महानगरपालिकेमध्ये अ/ब/क/ड असे विभाग केलेले आहेत आणि ते अ/ब/क/ड विभाग करुन त्याच्यावरती वेगवेगळया स्वरुपाचे टॅक्स आपण घेतो. अ-मध्ये निगडी प्राधिकरण, आकुर्डी, चिंचवड, पिंपरी वाघेरे, पिंपरीनगर, मनपाभवन विभागीय कार्यालय असं म्हणल आहे. फुगेवाडी, दापोडी, भोसरी विभागीय कार्यालय असं म्हणल आहे. सन २०११ चा त्याचा दर आहे २४ रु. ८४ पै. त्यानंतर आपण यापुर्वीच मा. तत्कालीन आयुक्तांना अधिकार प्रदान केलेले आहेत, आपण म्हणतो की दरवर्षी आम्ही मिळकतकर वाढवत नाहीत हे अत्यंत चुकीच व ठामपणे खोट आहे. दरवर्षी ५ टक्के मा.आयुक्त स्वतःच्या अधिकारामध्ये ही रक्कम वाढवितात. सन २०११ ला अ- वर्गाचे दर २४.८४ होते तेच दर सन २०१२ ला २५.१२ झाले आहे त्याच्यानंतर २८.५१ झाले आहे व त्यानंतर २९.७४ झाले आणि आता येणा-या काळात ते ३० च्या वरती जाणार आहेत. म्हणजे आपण अंदाजपत्रक मंजूर करताना म्हणणार की आम्ही कुठलाही कर वाढविलेला नाही परंतु जे आपण त्यांना अधिकार ऑलरेडी प्रदान केलेले आहेत त्याच्या माध्यमातून ही दरवाढ होणारच आहे हे नवीन सभासद निवडून आलेले आहेत त्यांना माहित नाही की ऑलरेडी आपण अधिकार प्रदान केलेले आहेत. त्यामुळे ती रक्कम सुध्दा वाढणार आहे. अ/ब/क/ड या चारही प्रभागामध्ये ड- जो विभाग आहे त्याच्यामध्ये थेरगाव, ताथवडे असा भाग आहे. क-मध्ये च-होली, मोशी आणि भोसरीचा काही भाग आहे. परंतु त्यांच्या कॅटेगरी नुसार सगळयात जास्त दर अ-विभागाला लागलेला आहे. अ-विभागाला जिथे २४.८४ आहे तिथे ड-विभागाला फक्त ७.५६ आहे. आता सगळयात जास्त इमारतीचे किंवा फ्लॅटचे दर हे रस्त्याच्या पलीकडच्या भागाला जास्त आहेत रस्त्याच्या आलीकडच्या भागाला कमी आहेत. म्हणजे भोसरी परिसर असेल, च-होली परिसर असेल याठिकाणी आता बांधकाम व्यावसायीकाचे पण दर कमी आहेत किंवा घरांना भाड सुध्दा कमी मिळतय. त्याच प्रमाणामध्ये रस्त्याच्या पलीकडे ही संख्या जास्त आहे असे असताना अ- विभागात मोडला जाणारा प्राधिकरण हा भाग भोसरी हा भाग याला जो दर लागलेला आहे तो अन्यायकारक आहे. त्यामुळ अ/ब/क/ड यांचे जे दर वेगवेगळे दिसतात कुठ २४.८४ आणि कुठ ७.५६ म्हणजे ज्या नागरीकांना आपण समान सुविधा देतो त्यांना काही वेगळया सुविधा देत नाहीत. आपण आता नवीन गावाना मोठया प्रमाणात निधी उपलब्ध करुन देतोय त्यांना वगळुन नवीन गावाना वगळून जे जे काही शहरीकरण झालेले आहे त्याठिकाणी सगळे करांचे दर हे समान असले पाहिजे अशा प्रकारची मा.महापौर साहेब आपण सूचना करा. त्यामुळे सुध्दा आपल्याला कितीतरी मोठयाप्रमाणात तोटा होतो. चौपट दर आपण अ-मधुन घेतोय आणि त्यापेक्षा कमी

दर ब आणि क मधुन घेतोय. तरी ते नागरीकरण आहे झपाटयाने वाढलेल आहे हे कोणी ठरवलय, का कुठला शासकीय जी.आर. आहे, तुम्ही अ/ब/क/ड चे दर कसे ठरविले आहेत याचा खुलासा करावा. याचा खुलासा गायकवाड साहेबांनी करावा हे अ/ब/क/ड चे दर आपण कुठल्या पध्दतीने ठरवलेले आहेत. दरवर्षी ५ टक्के वाढ करतो त्याचा खुलासा करावा. आतातर आम्ही म्हणतोय स्थायी समितीने करवाढ फेटाळलेली आहे जी.बी. सुध्दा येणा-या बजेटमध्ये ती वाढ फेटाळणार आहे तरी आपण सांगावे की हे ५ टक्क्यानी दर वाढणार आहेत की नाही याचा सुध्दा खुलासा मा.सहा.आयुक्त यांनी करावा. हा विषय महत्वाचा आहे कृपा करुन याचा खुलासा करावा हा विषय सगळयासाठीच महत्वाचा आहे.

**मा.भानुदास गायकवाड (सहा.आयुक्त) -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. मिळकतकराचे दर निश्चित करताना जे करयोग्यमुल्य निश्चित होते ते माआयुक्तांच्या अधिकारामध्ये करयोग्य मुल्य निश्चित होते आणि करयोग्य मुल्य नश्चित करताना जी काही नवीन गाव ॲड झालेली आहेत त्यासाठी ड- विभागात वर्गीकरण केलेले आहे आणि जो शहराचा कोअर ऐरीया आहे तो अ/ब/क असे बायफरकेशन केलेले आहे. आणि अ/ब/क मध्ये जर विचार केलातर सुरवातीला जी काही घर याठिकाणी बांधली गेली त्यावेळी महानगरपालिका अस्तित्वात आली त्यावेळेसच्या ज्या काही मिळकती होत्या त्यांचाच मेजर भाग हा अ/ब/क मध्ये आहे. नवीन जो भाग आहे तो ड-मध्ये जातो. अ/ब/क/ चे करयोग्य मुल्य सुरवातीला जे निश्चित झालेले आहे ते अतीशय कमी आहे. ज्यावेळेस महानगरपालिका अस्तित्वात आल्यापासून करयोग्य मुल्याचे दर प्रत्येक वर्षी अशा पध्दतीन निश्चित करण्यात आलेले आहेत त्यामुळे अ/ब/क/ड हे जे काही निश्चित केलेले आहे तो २००६ पुर्वीचाच आहे. ज्यावर्षी करयोग्य मुल्य निश्चित होईल त्याच वर्षाचा दर अपलोड करणार. अ- विभागात समाविष्ट केलेली जी गावे आहेत ती निगडी-प्राधिकरण, आकुर्डी, चिचवड, पिंपरी वाघेरे, पिंपरीनगर, मनपाभवन हे जे विभागीय कार्यालय आहेत त्याच्यामध्ये समाविष्ट असलेला भाग आहे. त्यानंतर फुगेवाडी, दापोडी, भोसरी या विभागीय कार्यालयातील सर्व गट, नवीन गट जे तयार होतील ग्रामीण भाग वगळून हे अ-मध्ये समाविष्ट आहेत. ब-मध्ये सांगवी, थेरगाव या विभागीय कार्यालयातील सर्व गट आणि नवीन समाविष्ट असलेला ग्रामीण भाग वगळून ब-मध्ये आहे. क- मध्ये च-होली, मोशी, चिखली, तळवडे, किवळे या विभागीय कार्यालयातील सर्व समाविष्ट गट. त्याच्यानंतर क-मध्ये अजूनही आहे सांगवीमध्ये गट क्र. ९ रक्षक सोसायटी, थेरगांव मध्ये गट क्र. ७ भुजबळ वस्ती, गट क्र. ८ वाकडकर वस्ती, भूमकरवस्ती व गट क्र. ९ मध्ये पुनावळे गावठाण, फुगेवाडी दापोडीमध्ये गट क्र. ७ बोपखेल, भोसरी गट क्र.१५ साईपार्क, आदर्शनगर, गट क्र. १६ दिघी गावठाण आणि गट क्र. १७ गजानन महाराज मंदीर. अ/ब/क विभागातून आपण झोपडपट्टया वगळलेल्या आहेत आणि ड- विभागामध्ये थेरगाव विभागीय कार्यालयातील गट क्र.१० जीवननगर, गट क्र. ११ निंबाळकरनगर, गट क्र. १२ ताथवडे गावठाण ही नवीन

समाविष्ट झालेली गाव. आरसीसी बांधकामाचा अ- चा दर आहे २९.९४ पै. यावर्षाचा. हा दर निश्चित केला जातो तो रेडीरेकनरचे दर ज्या पध्दतीने वाढतात त्या पध्दतीने हा दर वाढतो आणि तो चालू मिळकतीला वाढणार आहे. २०१६ मध्ये ज्यांच रजिस्ट्रेशन होईल त्याचे करयोग्यमुल्य निश्चित करण्यासाठी हा दर आहे. आता ज्यांचे दर २९.९४ पै. आहेत. ऐरीया समजा एक हजार स्क्वे.फुट बांधकाम असेलतर त्याला २९.९४ पै.ने गुणविल जाईल प्रति स्क्वे.फुट आणि त्याचा जो दर येईल तो करयोग्य मुल्य निश्चित होईल. एकदा त्या इमारतीच करयोग्य मुल्य निश्चित झाल की ते त्याच परमनन्ट करयोग्य मुल्य असेल. सुरवातीपासून महापालिका अस्तित्वात आल्यापासून जे दर निश्चित झाले त्याच्यानंतर थोडया थोडया प्रमाणात याच्यामध्ये वाढ करुन ते दर निश्चित केलेले आहेत. हे रेडीरेकनरच्या प्रमाणाशी रिलेटेड आहेत.

**मा.सुलभा उबाळे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. याच्यामध्ये समानतेने करता येत असेलतर तसे करा, आणि अ/ब/क/ड राहू दया.

**मा.भानुदास गायकवाड (सहा.आयुक्त) -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. २००६ पासून यामध्ये बदल करण्यात आलेले आहेत त्याचा दर निश्चित करताना अ/ब/क/ड मध्ये या प्रमाणात केलेले आहे.

**मा.सुलभा उबाळे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. २००६ ला वर्गवारी तुम्ही केलेली आहे अ/ब/क/ड ची अस तुमच म्हणणं आहे. नवीन गावात अजून सुविधा पुर्णपणे दिलेल्या नाहीत त्यांना जर आम्ही ड मध्येच ठेवल आहे. आणि अ/ब/क/ जे आहे त्यात अ-ला हायेस्ट आहे आणि क- ला कमी आहे तर तुम्हांला यामध्ये अ/ब/क ची समानता करता येईल का. क ज्याप्रमाणे आहे त्याप्रमाणे अ आणि ब-ला खाली आणून करता येईल का.

**मा.भानुदास गायकवाड (सहा.आयुक्त) -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. याच्यामध्ये समानता करता येईल.

**मा.सुलभा उबाळे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. मा.महापौरांनी, मा.पक्षनेत्यांनी, मा.आयुक्तांनी यांना सूचना देवून अशाप्रकारचा ठराव घ्यावा. कारण हे अन्यायकारक आहे, लोकांना हे कळत नाही. आणि आपण स्वत: मुखसम्मती याला देतोय. प्रशासनाने अत्यंत चानाक्ष बुध्दीने अशाप्रकारच करुन नागरीकांच्या खीशातून पैसे डायरेक्ट काढून घेतलेले आहेत. त्यामुळे पुढच्यावेळेस मा.महापौर आपण आयुक्तांना सांगावे की हे करयोग्यमुल्य अ/ब/क/ ला आम्हांला हे सारखे पाहिजे व यातून नवीन गावाना वगळण्यात यावे. याच्यात कुठेही रेडिरेकनरचा संबंध नाही, याठिकाणी रेडिरेकनर सांगीतल ते अत्यंत चुकीच्या पध्दतीन सांगीतल आहे. हे लिक्विडेशनमध्ये जे प्रकरण आहेत ते २५२ कोटीचे दाखवलेले आहेत ते आपल्याला मिळणार की नाही मिळणार याची माहिती नाही शास्तीकराच काय होणार आहे हेही आपल्याला माहिती नाही. तरी हे आकडे आहेत ते फसवे आकडे आहेत.

ख-या अर्थाने करयोग्य वसुली रक्कम ६०६ कोटी आहे की जी आपल्याला वसुल करनं आहे. त्यामुळे पेन्डीग दिसत ते असं दिसत की मा.गायकवाड साहेबांनी काही काम केल नाही कारण की ही रक्कम जी आहे ती डेड होऊ पाहत आहे. ६०६ कोटीवरतीच आपल्याला चर्चा करता येईल कारण की ती रक्कम आपल्याला वसुल करनं शंभर टक्के गरजेच आहे आणि ज्या काही कोर्ट केसेस आहेत त्याबाबत आपल्या वकीलांनी काय केलेले आहे. किती परत मिळालेले आहे. जकातीच्या सुध्दा जुन्या केसेस आहेत, ते सुध्दा उत्पन्न आपलच आहे. कंपन्याच्या बाबतीत आपल सेटलमेन्ट झालय का, काय केल, किती आपल्याला पैसे मिळालेले आहेत याचा सुध्दा खुलासा करावा. करसंकलन बाबत सर्व पक्षीय नेत्यांची, पदाधिका-यांची बैठक घेऊन लवकरात लवकर सगळयांना समान कर होईल अशा संदर्भात आपण प्रशासनाला सांगावे अशी मी आपल्याला विनंती करते.

**मा.बाबासाहेब धुमाळ -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, पत्रकार. ख-या अर्थाने हा विषय संपुर्ण नागरीकांच्या जीवनाचा प्रश्न आहे. ही औदयोगीक नगरी आहे याठिकाणी संपुर्ण कामगार रहिवासी म्हणून राहत आहेत. अ/ब/क/ड ची रेडीरेकनरप्रमाणे कर आकारणी करतो, चुकीचीच प्रणाली याठिकाणी आपण आकारतो. आपण ५ टक्के वाढ करतो. महाराष्ट्रात संपुर्ण महापालिकेमध्ये मुंबई महापालिका सर्वोच्च महापालिका आहे त्यांनी अशी प्रणाली वापरली का त्याचे उत्तर पाहिजे. पुणे महापालिका असेल, मुंबई महानगरपालिका असेल यांच्यामध्ये अशाप्रकारची कर आकारणी केली गेली का. अ-विभाग हा प्राधिकरणाचा आहे, प्राधिकरण हा उच्चभ्रू रहिवाशी भाग आहे त्याठिकाणच्या जागेचा रेट बघीतलातर जवळ जवळ ५० लाख गुंठयाचा जमीनीचा भाव आहे. भोसरीचा संपुर्ण भाग हा ग्रामीण भाग आहे, आकुर्डी, निगडी ग्रामीण भाग आहे त्याठिकाणी मोठ डेव्हलपमेंट झालेल नाही. त्याठिकाणी सगळे कामगार आहेत. एक-दोन खोल्याची रुम घेवून ते राहतात. परंतु अ- विभागात असल्यामुळे टॅक्स सुध्दा त्या प्रमाणातच त्यांना येतो व ते भरतात. आपल्याला महापालिकेच्या हद्दीतील प्राधिकरणाचे, एमआयडीसीमधील उत्पन्न आहे याच्याशिवाय आपल्याला चौथ उत्पन्न नाही. आपण जुनी वसुली करत नाहीत. एकुण मिळकती ४२६२४१ आपण दर्शविलेल्या आहेत. याठिकाणी पहिल्यापासून येणारे अधिकारी पहिल्यासारखच काम करतात. नवीन काहीतरी प्रणाली असणे काळाजी गरज आहे. बांधकामाला व्हिजिलन्स स्कॉड आपण ठेवलेला आहे. एक साधा प्रश्न मी त्याठिकाणी विचारल्यानंतर मला अ प्रभागातून आले की ती फाईल परत आली का तर त्याठिकाणी व्हिजिलन्सने ऑब्जेक्शन घेतलेले आहे. तरी अशाप्रकारे कोणाचातरी वचक पाहिजे. याठिकाणी सुध्दा अशाप्रकारची ज्यावेळेला करप्रणाली आकारली जाते त्यामध्ये सुध्दा सावळा गोंधळ होतो. गायकवाड साहेबांना मी सुरवातीला बोललो आहे की प्रत्येक ठिकाणी अशी भावना झालेली आहे, प्रत्येकानी घर घेतलेल आहे. पार्कींगमध्ये रुम आहे त्यामध्ये सर्रास त्यांनी बिझनेस चालू केलेला आहे. त्याठिकाणी कुठेही आपल्या अधिका-यांची देखरेख नसते. ही

काळाची गरज आहे. डॉक्टरांसाठी आपण सवलत दिलेली आहे. बंगल्यात हॉस्पिटल उघडले आहे. त्याची करआकारणी केलेली नाही. परंतु बाकीच्या सर्व ठिकाणी असे चालू झालेले आहे त्याठिकाणाहून करोडो रुपये आपल्याला मिळू शकतात ज्या साठी आपण जागा घेतली त्यासाठी आपण त्याचा युज करतो का. गायकवाड साहेबांना दोन पत्र दिलेले आहेत ज्या परपजसाठी जागा घेतली त्या परपजसाठी ती जागा वापरली जात नाही. रेसिडेन्शीअल जागा व्यापारी म्हणून बांधली जाते आणि टॅक्स तोच आहे त्याची चौकशी करावी. रेसिडेन्शीअल जागा आहे आणि त्याठिकाणी दुकान आहेत, शॉपींगसेंटर निघालेले आहेत. मी पत्र दिलेले आहे याची चौकशी करावी. प्रत्येक ठिकाणी अशा प्रकारचा गुन्हा झालेला आहे हे बघीतलेतर आपल्याला करोडो रुपये मिळू शकतात. ५० ते ६० लाख रुपये आपल्याला महिन्याला टॅक्स मिळू शकतो. प्रत्येक परिसरामध्ये, जेवढे सेक्टर नंबर आहेत त्या सेक्टरमध्ये प्रत्येक ठिकाणी असे चाललेले आहे त्याठिकाणी जाणीवुपर्वक दुर्लक्ष केले जाते आणि म्हणून त्याठिकाणी टॅक्स वसुल होत नाही. एमआयडीसी ३१४९ औदयोगीक म्हणून नोद केलेली आहे. आपल्याकडे कमीत कमी ७ ते ८ हजार छोटेमोठे उदयोग आहेत. एमआयडीसीने आता नवीन नियम काढलेला आहे, शॉपींगला परमीशन दिल जात. असे सुध्दा घेतलेले आहेत पण टॅक्स जुन्या पध्दतीनेच चालू आहे. त्याठिकाणी व्यापारी संकुलन झालेले आहे. आकुर्डीगावामध्ये, प्राधिकरण ऐरीयामध्ये सुध्दा असे टॅक्स लावले गेलेले आहेत त्याठिकाणी बिल्डींगा उभ्या राहीलेल्या आहेत. अन्सारी वजन काटयाच्या पाठिमागे सात ते दहा मजली बिल्डींग झालेल्या आहेत. त्याठिकाणी टॅक्स कुठला घेतला जातो. पहिली औदयोगीकची बिल्डींग पाडली आणि त्याच्यावर मोठमोठया बिल्डींग तयार झालेल्या आहेत. त्याठिकाणी जुनाच टॅक्स भरला जातो. बिल्डरला काय जुना टॅक्स भरला, बुकींग घेतल, परमीशन मिळाल, बिल्डींग बांधली. अशाप्रकारे सगळीकडे बघीतलतर करोडो रुपये आपल्याला टॅक्स मिळू शकतो. त्यासाठी व्हिजिलन्स स्कॉड नेमावा. सोर्स ऑफ इन्कम असणे गरजेच आहे म्हणून ही प्रणाली आपण करावी अशी माझी विनंती आहे, धन्यवाद.

**मा.अजीत गव्हाणे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. याठिकाणी भाऊसाहेब भोईर यांनी जे प्रश्न विचारले होते त्याच्या अनुषंगाने आपआपली मते सर्वांनी मांडलेली आहेत. सुलभाताईनी विषय मांडला होता अ/ब/क/ड चा. आताच गायकवाड साहेबांनी खुलाशामध्ये सांगीतलेले आहे ते नक्कीच समाधानकारक नाही कारण रेडीरेकनरशी रिलेक्ट ते केलं गेलेल नाही. आज भोसरीमध्ये एखादया मिळकतीची किमंत त्याच्यामध्ये सांगवी पिंपळेगुरव किंवा पिंपळेनिलख, थेरगाव या परिसरामध्ये प्रॉपर्टीचे व्हॅल्यु जर पाहिलीतर याच्यामध्ये प्रचंड तफावत आहे त्याच्यामुळे हे जे करयोग्यमुल्य काढले जाते याच्यातच मुळात चुक आहे. याच्यामध्ये लक्ष देण्याची गरज आहे. ही सगळी कर आकारणी केली जाते ती चुकीच्या पध्दतीने केली जाते. याच्यामध्ये काही लोकांवर अन्याय होतो. येथून पुढच्या

काळामध्ये तो अन्याय दुर करण्यासाठी आपल्याला एकत्रीतपणे या सगळया गोष्टीचा विचार करावा लागेल आणि सभागृहामध्ये ते मांडावे लागेल. दुसरी बाजू अशी आहे की नव्याने पार्कींगवरती टॅक्स लावण्याची भुमिका करसंकलन आणि प्रशासनाने घेतलेली आहे. येथून मागे पार्कींगवर कधी टॅक्स आकरला जात नव्हता, एखादया मिळकतीमध्ये टेरेस असेलतर त्या टेरेसवर सुध्दा टॅक्स आकारला जातो. नवीन ही पध्दत या विभागाने सुरु केलेली आहे. ती कुठेतरी अन्यायकारक आहे कारण आपण जो टॅक्स आकारतो त्यावर कुठल्याप्रकारच छत आहे, मग ते आरसीसीच आहे का पऱ्याच आहे त्याच्यावरती तुम्ही टॅक्स आकारता. मग तेथे टेरेस असत कुठल्याहीप्रकारचा छत नसतो मग तिथं तुम्ही नेमका कशा पध्दतीने टॅक्स आकारणार आहात याचा सुध्दा खुलासा सभागृहापुढे झाला पाहिजे नागरीक आमच्याकडे येतात की आम्हांला नव्याने अशा पध्दतीचा टॅक्स आकारलेला आहे. टॅक्स आकारताना वेगळी कॅटेगरी करावी लागेल. पर्किंग ऑफीसीएली कुठल्याही फ्लॅटधारकांना नसते परंतु तुमच्या विभागाकडून असं सांगीतल जात की प्रत्येकाला जो काही पार्कींगचा ऐरीया उपलब्ध आहे तो त्या फ्लॅटधारका वरती विभागून दिला जाईल परंतु प्रत्यक्षात त्याची मालकीच नसते जेव्हा तो रिसेल करायला जाईल, रिसेल करायला जाताना कॉर्पोरेशनच्या रेकॉर्डला त्याच्या मालकीच दिसत परंतु प्रत्यक्षात त्याची मालकी नसते ती सोसायटीची मालकी असते. मुळात तो लावलाच नाही पाहिजे. जर लावायचा असेलतर सोसायटीच्या नावाने तो वेगळा टॅक्स घेतला पाहिजे. नंतर सोसायटीकडून रिव्हाईज करुन तुम्ही तो टॅक्स त्यांच्याकडून वसुल केला पाहिजे. तुम्ही जेव्हा टॅक्स लावता त्याला टप्पे ठरलेले आहेत. जेव्हा पुढच्या टप्प्याला तो माणूस जातो त्यावेळेला त्याला जास्त टॅक्स भरावा लागतो. आणि त्याच्यामध्ये पार्कींग आणि टेरेस ॲड केल तर तो जास्तीचा टॅक्स त्याला भरावा लागतो. आमचे समाधान काय होते यावर्षी टॅक्स वाढविला नाही म्हणून नागरीकांना आम्ही अभिमानाने सांगतो. आम्ही टॅक्स वाढविलेला नाही परंतु प्रत्यक्षात बील जातात त्याला त्यावेळेला टॅक्स वाढवून आलेला असतो त्यामुळे याच्यामध्ये सुधारणा करावी. खरे म्हणजे सभागृहाला विश्वासात न घेता मला माहित नाही तुम्ही आयुक्तांना असे अधिकार दिलेले आहेत परंतु हे कुठतरी सभागृहाला कळलं पाहिजे जोपर्यंत आम्हांला कळत नाही तोपर्यंत आम्ही नागरीकांना समजावुन सांगणार नाहीत. आम्हांलाही कळतं की आपल्या महापालिकेचे उत्पन्न कमी झालेल आहे. आपली जकात बंद झालेली आहे, एलबीटी सुध्दा आता रद्द होतो. त्याच्यामुळे आपल्या महापालिकेचे उत्पन्न कमी होत चाललेल आहे. भविष्यकाळात महापालिकेची विकासाची कामे करायची असतीलतर टॅक्स स्वरुपात जे उत्पन्न तुम्ही घेतल ते मिळाले पाहिजे. परंतु ते मिळवत असताना नागरीकांवर अन्याय होऊ नये अशी भावना आमची आहे. नागरीकांमध्ये टॅक्स भरायला मुळीच कोणाचा विरोध नसतो परंतु या सगळया तुमच्या प्रोसीजरमुळे लोकांवर अन्याय होतो मा.महापौर साहेब आपण आदेश दयावेत याच्याकडे खुप गांभीर्याने लक्ष देण्याची गरज आहे. या ज्या काही गोष्टी घडतात त्या

नागरीकांच्या हीताच्या नाहीत. मा. महापौर साहेब, याच्यामध्ये आपण लक्ष घालाव आणि लवकरात लवकर याच्यावर निर्णय घेतला जावा अशी माझी आपल्याला विनंती आहे. लवकरात लवकर सर्व पक्षाच्या प्रमुखाना बोलवा ज्या नगरसेवकांना याच्यामध्ये इन्ट्रेस्ट आहे त्यांना बोलवा आणि सर्वाच्या समक्ष  करसंकलन विभाग, आयुक्त आणि सर्व पदाधिकारी त्यांच्या समोर या गोष्टीचा खुलासा झाला पाहिजे. म्हणजे त्या पध्दतीने येथून पुढच्या काळामध्ये नागरीकांना बील जातील. तुम्ही आता टॅक्सची स्किम जाहीर केली आहे, प्रशांत शितोळे यांनी या गोष्टीचा उल्लेख केलेला आहे. शास्तीकर नागरीक भरत नाहीत आम्ही सुध्दा त्यांना सांगतो शास्तीकर भरु नका त्याच्यामुळे ही जी स्किम तुम्ही राबवली ती सक्सेसफुल होणारी नव्हतीच. त्याच्यामुळे अशाप्रकारच्या स्किम घेण्यापेक्षा लोकांना फायदा होईल अशा स्किम आपण लोकांपुढे आणल्या पाहिजे आणि त्याच्यातून महापालिकेला पैसे लवकर मिळतील यादृष्टिने प्रयत्न करावा. वेगवेगळया ऐरीयामध्ये करसंकलन विभागात लोक चांगले काम करतात. काही त्रुटी आहेत नाही असं नाही परंतु भोसरी, च-होली, मोशीमध्ये चांगल्या पध्दतीने करसंकलन विभाग काम करतय. चांगल्या पध्दतीने टॅक्समध्ये वाढ पण झालेली आहे. परंतु आणखीन लक्ष देण्याची गरज आहे. उदयाच्या काळात उत्पन्न वाढविण्याच्या दृष्टिने प्रयत्न करायचे आहेत. काही ठिकाणी तुम्हांला चांगले लोक घ्यावे लागतील. तुम्ही खोलात जावे, ज्या ज्या ठिकाणी अडचणी आहेत त्या दुर कराव्यात. महापालिकेच्या उत्पन्नाच्या दृष्टिने हे महत्वाचे स्त्रोत आहे यात आपण लक्ष घालावे. येत्या काळात सगळया चुका दुरुस्त करुन आपण नव्याने चांगले काम करावीत. पुढच्या वर्षाच्या बजेटमध्ये जास्तीत जास्त निधी उपलब्ध व्हावा अशी अपेक्षा व्यक्त करतो आणि थांबतो.

**मा.धनंजय आल्हाट -**  मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. उत्पन्नाचे स्त्रोत संदर्भात भाऊसाहेबांनी प्रश्न विचारला होता. पाणीपुरवठा नळ जोडणी म्हणजे अधिकृत नळजोडणी आणि आपण जर एक विचार केलातर आपल्या डोळयासमोर एक येत की अनधिकृत नळजोडणी. म्हणजे अनधिकृत नळजोडणी, पाणी गळती, पाणी टंचाई याचा कसा संबंध आहे हे जर पाणीपुरवठा विभागाने लक्ष घातलेतर दोन गोष्टी याच्यामधुन साध्य होणार आहेत. आता काही गोष्टी निदर्शनास आणून दिल्या की पाणीपुरवठा विभागामध्ये किती  सुक्ष्म पध्दतीने बदल करण्यची गरज आहे.  तक्रारी येण्याची कारणे असे आहेत की आमचा नव्याने भाग विकसीत होतो आहे. पिंपरी चिंचवड शहरामध्ये अनधिकृत नळकनेक्शनची संख्या एवढी मोठी आहे त्याची तपासणी आजपर्यंत कधीही झालेली नाही. सन्मा.आयुक्त परदेशी साहेबांच्या काळात अशी तपासणी झालेली होती.  त्याच्यामध्ये काही आकडे पुढे आले त्याचे पुढे काही झालेले नाही. पुन्हा एकदा अशी तपासणी केलीतर बरे होईल. हे लोक काय करतात की रात्रीचे असे प्लंबर असतात की ज्यांना कुठल्याही प्रकारचा अनुभव नसतो अशाकडून ते कनेक्शन घेतात आणि ते कनेक्शन घेत असताना ब-याच वेळेला त्यामधुन पाण्याची मोठया प्रमाणावर

गळती होते. म्हणजे आपल पाणीपुरवठा विभाग आपली लोकसंख्या आणि मिळणार पाणी याच गणीत करतील म्हणजे परहेड किती पाणी दयायला पाहिजे. त्यांचे गणीत बरोबर बसत परंतु पाण्याच्या माध्यमातून एवढ पाणी बेकायदेशिरपणे फुकट देतो त्यामुळे पाणीटंचाई मोठयाप्रमाणावर होते. पाणी गळतीमुळे पाणी टंचाईची भीषण परिस्थिती निर्माण होते. त्याच्यामुळे उत्पन्न आणि सुरळीत पाणीपुरवठा याच्यासाठी जर काही करायच ठरलंतर आपल्याला गांभीर्यपणे विचार करावा लागेल. याची संपुर्ण मोहीम, आकडेवारी, त्याचा शोध हा आपण घेतला पाहिजे. आपण स्काडाप्रणाली आणली त्या स्काडाप्रणालीचा पुरेशा फायदा शहराला झाला नाही. स्काडामुळ काही लोकांनी आपल कस भागवून घ्यायच याच्याकड पाहिल म्हणून याठिकाणी महापालिकेचा स्काडा प्रणालीमुळे सुरळीत पाणीपुरवठा एकदम अपेक्षाभंग झाला. आमचा विकसीत १८ गावाचा भाग आहे त्याठिकाणी बिल्डींग परमीशन दिले जाते. ठिक आहे, महापालिकेला उत्पन्न मिळाले पाहिजे, आपण एकच बाजू पाहतो. पण त्याच्या पाठीमागे अनेक बाजू असतात त्याचे दुष्परिणाम आपल्याला त्याठिकाणी भोगावे लागतात, नागरीकांना भोगावे लागतात. ज्यावेळी बिल्डींग परमीशनला प्रकरण दिले जातात त्यावेळेला सगळया प्रकारच्या एनओसी जोडल्या जातात. ड्रेनेज असेल, पाणीपुरवठा असेल सगळया खोटया एनओसी दिल्या जातात. याठिकाणी पाणी लाईन आहे यांना आपण पाणी देवू शकतो अशा प्रकारची एनओसी त्यांना दिली जाते. परंतु त्याठिकाणी पाण्याची लाईन टाकलेली नसते, पाणी देण्याची क्षमता महापालिकेची नसते. त्याच्यानंतर ज्यावेळेस असा विरोध व्हायला लागला त्यावेळेस या विभागाने अशी एक शक्कल लढवली आहे. त्यांनी काय ठरवल आपल्याला पाणी दयायला नाही, त्याठिकाणी लाईन टाकलेल्या नाहीत, त्यानी अशा पध्दतीचा स्वत:चाच तोडगा काढला त्याला कुठल्याप्रकारचे महापालिकेचे धोरण नाही, शासनाचा आदेश नाही, महापौरांचा आदेश नाही मग त्यांनी अशी शक्कल लढवली विकसन जो आहे तो बांधकाम परमीशनला टाकतो त्याच्याकडून स्टॅम्पपेपरवर लिहून घेतले की या बिल्डींगमध्ये, सोसायटीमध्ये येणारे लोक त्यांना पाणीपुरवठा देण्याची संपुर्णपणे जबाबदारी शेवटपर्यंत विकसकाची राहील. म्हणजे अगदी बेकायदेशिर पध्दतीने बिल्डींग परमीशन घेण्यासाठी म्हणजे जसं कायदयाला बगल दिली जाते त्यातून एक फार मोठा धोका निर्माण झाला की तो विकसन करणारा माणुस तो सर्व फ्लॅट विकून गेला त्याचा आणि त्या संबंधीत लोकांचा काही संबंध राहीला नाही पर्यायाने ते लोक नगरसेवकांकडे येऊ लागले आम्हांला पाणीपुरवठा नाही, आम्हांला पाणी मिळत नाही. त्यावेळेस संबंधीत लोकप्रतिनिधी अधिका-याकडे गेले त्यावेळेस त्यांनी असं सांगीतल की आम्ही त्यांच्याकडून लिहून घेतलेल आहे की आम्ही बिल्डींग परमीशन देतो परंतु काही अटिवर देतो. अंडरटेकींग घेतलेल आहे की या सगळया लोकांना पाणीपुरवठा देण्याची जबाबदारी ही महापालिकेची नसुन त्या विकसकाची आहे. म्हणजे इतकं खोट, कायदयाची कशी थट्टा केली जाते हे आपल्याला याठिकाणी मला सुचवायच आहे.

त्यामुळे जे नागरीक आहेत ते नगरसेवकांकडे येतात, नगरसेवक मागणी करतात ते दाखवतात अंडरटेकींग घेतलेले आहे. मग या लोकांना पाणी दयायच कोणी हा अत्यंत महत्वाचा प्रश्न आहे. मग नगरसेवकांना त्याच्यासाठी प्रयत्न करावे लागतात. एकतर त्याठिकाणी बजेट नाही नवीन जर पाईपलाईन टाकायची असेलतर तुमच्याकडे एवढ मोठ बजेट नाही. त्यामुळे त्याला आपण लगेच सहा महिन्यात पाणी लाईन टाकून पाणी देवू अशी परिस्थिती अजीबात नाही. म्हणजे एकतर आपले अधिकारी आपल उखळ भरुन घेतात आणि हात वर करतात. त्याठिकाणचा बिल्डर निघुन जातो आणि सामोरे जावे लागते ते नगरसेवकांना आणि त्या नागरीकांची त्या फ्लॅटधारकांची प्रचंड फसवणूक बिल्डर आणि आपल्या अधिका-यापासून होते आणि त्यांना पाणी मिळत नाही. म्हणजे एवढा पाण्याचा तुटवडा या गावामध्ये आहे. जर आपण वेळीच त्याठिकाणी अशा उपाययोजना केल्या नाहीत, काही मुद्दे त्याठिकाणी उपस्थित केले की कम्प्लेशन पुर्णत्वाचा दाखला दिल्याशिवाय आपण पाणी कनेक्शन देत नाहीत. मुळात या लोकांना कम्प्लेशनमुळे  एनओसी सुध्दा मिळत नाहीत. त्यामुळे कुठल्याप्रकारचा कायदयाचे बंधन आपल्याकड राहीलेल नाही. म्हणजे सगळी बोकाळलेली अशी अवस्था आहे. खरेतर ज्या अटि घालून दिलेल्या आहेत त्याच तो पालन करतो का मला एवढंच सांगायच आहे की हे करत असताना आपण सक्षमपणे पाणीपुरवठयाची योजना कशी राबविली जाईल हे बघावे. पाणी टंचाई होण्याची कारण मी तुम्हांला सांगीतलेली आहेत. लोक का आरडाओरड करतात त्याचा प्रत्यक्ष संबंध बिल्डींग परमीशनशी येतो म्हणून मी हा विषय घेतलेला आहे. माझ्या भावना आपल्यापर्यंत पोहचल्या असतील, हा प्रश्न गंभीर आहे. सर्व गटनेत्यांना सांगतो अशाप्रकारचे धोरण सभागृहामध्ये आणावे चांगले निर्णय आणि चांगला पाणीपुरवठा होईल एवढीच याठिकाणी मी विनंती करतो.

**मा.मंगलाताई कदम -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व सहकारी.  प्रश्नोत्तराचा तास आहे शिवाय आज कराचाही विषय आहे, महापालिकेमध्ये असं असतं की ज्यावेळेला ज्या महीन्यामध्ये विषय असेल त्यादिवशी तो विषय असेल त्यादिवशी तो विषयपत्रीकेवर येतो आयुक्त साहेब, ही पध्दत कधीतरी बंद होणार आहे का. शेवटच्या लाईनमध्ये दोन ओळीत टिप टाकलेली आहे फेब्रूवारी २० च्या आत कराचे दर निश्चित करणेबाबत. मग हा विषय मागच्या महीन्यामध्ये का आलेला नाही. सभागृहातील प्रत्येक नगरसदस्यांना समजण्यासाठी हा विषय मागच्या महीन्यात का दिला नाही. आज जनरल बॉडी आहे आणि आजच दर निश्चित करुन दया म्हणतात, हे कशासाठी.  सर्वसामान्यांचे प्रतिनीधी येथे निवडून आलेले आहेत या लोकांना हा विषय कळू नये असं प्रशासनाला वाटतय का. आता २ नंबरचा विषय तोच आहे म्हणजे आता जे बोललेले आहे ते या दोन नंबरच्या विषयाला लागू आहे आणि शेवटच्या पानावर शेवटच्या ओळीमध्ये लिहीलेले आहे. २० तारखेच्या आत जी.बी.मध्ये दर निश्चित करुन दया. मग दरवर्षी २० फेब्रूवारी ही तारीख आहे की नाही.  मागच्यावेळेस सुध्दा आम्ही

हेच बोलले होते दरवेळेस तुम्ही हे सांगून सुध्दा २० तारखेच्या जी.बी. ला विषय आणायचा. हे असं कशासाठी करायचे. परवाच्या दिवशी ईडब्ल्यूएसचा मोर्चा आला होता अगोदर दोन तीन महिने यासाठीची तयारी प्रशासनाच्या वतीने का होत नाही. व्हायला पाहीजेनां का नगरसेवकांना कळायलाच नाही पाहिजे का. आणि ज्यांना ज्या लोकांनी निवडून दिल त्यांनातर अजीबात कळालच नाही पाहीजे. फक्त टॅक्स बील हातामध्ये गेल्यानंतर दरवर्षी जशी वाढ होते त्या पध्दतीने तुमची बील वाढून येतात लोक म्हणतात भाडयाच्या घरामध्ये राहीलतरी चालेल. पाण्याच्यासाठी अभय योजना, घरटॅक्ससाठी अभय योजना म्हणजे लोकांनी तुमच्या अभय योजनाची वाट बघत बसायची का. त्या लोकांना तुम्ही मिळकतकराच्या नोटीसा पाठविलेल्या आहेत ज्या लोकांनी पैसे भरले नाहीत, त्यांना तुम्ही काय केल. जज्मेंट झाल्यानंतर तुम्ही अभय योजना डिक्लेअर केली. पिंपरी चिंचवडचे नागरीक हुशार आहेत तुम्ही ही योजना डिक्लेअर केली पुढच्या वर्षी आम्ही सांगायचे का टॅक्स भरु नका अभय योजना डिक्लेर होणार आहे असं आम्ही प्रत्येक नागरीकांना सांगायचे का. लाईट बील दोन महीने भरले नाहीतर लगेच दुसऱ्या महीन्यामध्ये लोक लाईट कट करण्यासाठी येतात. २० वर्षे त्या लोकांनी टॅक्स भरलेला नाही त्यांना आता नोटीसा तुम्ही काढलेल्या आहेत. मी नागरीकांच्या भावनेशी किंवा त्यांच्या परिस्थितीशी सहमत आहे. शहरातल्या नागरीकांच्या परिस्थितीशी मी सहमत आहे. त्यातील काही लोक असे असतील की त्यांची खुपच परिस्थिती गंभीर असेल म्हणून त्यांनी टॅक्स भरला नसेल परंतु तुम्ही त्यांच्याकडे वीस वर्षानी गेलेला आहात टॅक्स भरण्याची मुदत संपल्यानंतर दोन महीन्यानी तुम्ही गेलात का, नाही गेलात आणि मग नंतर टॅक्स भरला नाही म्हणून वीस वर्षानी अभय योजना काढणार. सगळे लोकानी जर वीस वर्षे टॅक्स भरला नाहीतर महापालिकेची परिस्थिती काय होईल ते बघा. मागच्या वर्षी सुध्दा पाण्यासाठी अभय योजना काढली. लोकांना हे माहीत झालेल आहे. सरळ लोक टॅप मारतात, माहीती असत की अभय योजन होणार आहे. डिक्लेरेशन झाले की कनेक्शनचे पैसे भरायचे. आज आपण येथे निर्णय घेतला की आम्हांला पाणी पुरणार नाही म्हणून आम्ही हद्दी बाहेर पाणी देवू शकत नाहीत परंतु असे कित्येक लोक आम्हांला व्हीडीओ शुटींग करुन पाठवतात तुम्ही आम्हांला हद्दी बाहेर पाण्याचे टॅप देणार नाहीत परंतु हे घ्या आम्ही टॅप मारलेले आहेत म्हणून लोक आम्हांला व्हीडीओ शुटींग पाठवतात. हद्दी बाहेर पाणी दिल्यानंतर अशी बील भरलेली नाहीत. पाणी बीलाची आकडेवारी दिलेली आहे. २५ कोटी वसूल झाले परंतु ज्या प्रायव्हेट एजन्सी लावलेल्या आहेत त्यांचे बीलींग एक वर्षाचे किती झालेले आहे. म्हणजे मिळालेले पाणी बील किती आणि वसुल झालेले पाणी बील किती आहे आणि प्रायव्हेट एजन्सीला दिलेल्या पाणी बीलाच्या वसुलाचा ताळेबंद आम्हांला पाहिजे. आपला पाणीपुरवठयावर वसूलीसाठी किती कोटी खर्च होतो. म्हणजे बील येतं का, का वसुलीवरच तेवढा आपण खर्च करतो. मग नागरीकांकडून बीलच घ्यायचे नाही. मी आयुक्त साहेबांनाही त्यादिवशी बोलले साहेब, शहरासाठीचे पाणी बील माफ

करा कारण आपण खर्च करतो तेवढे सुध्दा पैसे आपण वसुल करत नाहीत. म्हणून मी त्यादिवशी प्रस्ताव दिला की यंदाच्या वर्षी आम्हांला असं वाटल की नागरीकांकडून पाणी बीलच घेवू नका. कारण तुम्ही एजन्सीला पैसे देता मग तेच पैसे आमच्या नागरीकांना मीळालेतर कुठे बिघडले आहे. मग नागरीकांना फुकट दिलंतर काय होतं अशी परिस्थिती आहे. सुलभाताईनी सांगीतले आज जर तो विषय असेल ओपन टेरेस छत कशाचे आहे, रिकामी जागा किती आहे सर्वांना आपण टॅक्स लावतो. कमर्शिअल टॅक्स लावतो. कमर्शिअलची व्याख्या मला सांगावी. म्हणजे जो माणूस प्रामाणीक आहे त्याला टॅक्स लावायचा. आणि जो माणुस अप्रामाणीक आहे त्याने राजरोष पिंपरी चिंचवड लुटायच कमर्शिअल कशाला म्हणतो आपण. बिल्डींगमध्ये दुकान टाकल त्याला आपण कमर्शिअल म्हणतो आणि त्या दुकानाच्या समोर बाहेर छानपैकी दुकान थाटलय तो कमर्शिअल नाही. त्याला टॅक्स नाही, त्याला पार्कींगचा टॅक्स भरायचा नाही. मग तुम्ही कशासाठी रितसर माणसाकडून कमर्शिअलचे सुध्दा पैसे घेणार. त्याचा तुम्ही निर्णय घेवू शकत नाहीतर हा पण निर्णय घेवू नका येथून पुढे पिंपरी चिंचवड शहराला सगळ फुकट दया. तुमची निर्णय क्षमता गेली कित्येक वर्षे झाले हीच आहे हे मी पाहीलेल आहे सभागृहाने सांगीतले हातगाडीवाल्यांना लायसन्स दया. रोज माझे दिवसातून चार फोन जातात. कुठलाही वॉर्ड असू देत आम्ही म्हणतो आमच्या वॉर्डमध्ये टप-या नसाव्याततर रोज नवीन टप-या आमच्या वॉर्डात येवुन पडतात, आम्ही दुष्मनी घ्यायची आणि तुम्ही लोकांनी खुर्चीवर बसायचे. त्यांना काहीही नाही, त्यांना टॅक्स नाही त्यांना पाणीबील नाही, त्यांना लाईट मिळते, त्यांना लाईट बील नाही. प्रामाणीक माणसालाच का. गायकवाड साहेब तुमची आकडेवारी बघीतली आहे, तुमची आकडेवारी वाढत वाढत कशी गेली ती सांगते. रिकामा प्लॉट, पत्र्याचे शेड, एचडीएफसी कॉलनीमध्ये एक रुपयाचे सुध्दा आपण त्यांना काहीही देत नाहीत. रस्ता देत नाहीत, लाईट देत नाहीत, पाणी देत नाहीत, ड्रेनेज देत नाहीत काहीही देत नाहीत परंतु त्या भागामध्ये एखादया माणसाने गाडीसाठी, त्याच्या फोर व्हीलरसाठी जर एखादी शेड मागीतले असेलतर त्यांचा टॅक्स वाढवून जातो ते कसे तुम्हांला दिसले त्या लोकांनी तुमची एकही सुविधा घेतली नाही. ते लोक तुमचा वृक्षकर भरतात, आरोग्यकर भरतात त्यांना सुविधा देतोत का. त्या लोकांना तुम्ही टॅक्स फ्री करायला पाहीजे. आयुक्त साहेबांना सुध्दा मी सांगीतलेल आहे की २०० ते ५०० फ्लॅटच्या ज्या सोसायटया आहेत ती लोक आपली एकही सुविधा घेत नसतीलतर पिंपरी चिंचवड शहराला कचरा सुध्दा देणार असतीलतर त्यांचा कचरा त्यांच्या सोसायटीतच त्याच विलगीकरण करणार असतीलतर त्या लोकांना टॅक्समध्ये सवलत दयावी. जे लोक प्रामाणीक आहेतना ते म्हणतात कुठे पिंपरी चिंचचवडच्या नादी लागायचं कारण काही अधिकारी असे आहेत, नाव घेवून सांगते तांबे सारखे अधिकारी पाणीपुरवठयाला आहेत, या अधिका-या विषयी काय म्हणायचे. एक काम करायला सांगीतलेतर चौथच लिहून काहीतरी पाठवतात. ते सोप असतं, बिल्डर्सने पैसे भरलेले नाहीत, नागरीक पैसे भरायला तयार आहेततर

ते पैसे घेण्याची जबाबदारी नाही. पण मोठा बिल्डर्स आहे म्हणून त्या बिल्डर्स कडे बघू शकत नाहीत. पण जे नागरीक म्हणतात आम्हांला रेसिडेन्शीअल पाणी बील दया आम्ही पैसे भरतो त्यांना रेसिडेन्शीअल पाणी बील तुम्ही देत नाहीत. गावडे साहेब आजचा तुमचा दिवस आयुक्तांचा आहे तुम्ही ऐकल पाहीजे. रोज मी गावडे साहेब तुम्हांला फोन करते. साहेब, लोकांचे जीव जातील, शहराचा कचरा झालाय, टप-या वाढत चालल्यात. आम्ही स्वच्छता अभियान घ्यायच तुम्ही होतात माझ्या वॉर्डातील स्वच्छता अभियानाला. स्वच्छता अभियानासाठी चांगले लोक घरातून बाहेर पडलेले होते. टपरीवाल्यानी कचरा करायचा, भेळवाल्यानी कचरा करायचा, नाराळाच्या शहळयावाल्यांनी तिथच नारळ टाकायच, वडापाववाल्यांनी तिथच कचरा करायचा, चहा प्यायचा आणि प्लॅस्टीकचे ग्लास तिथंच टाकायचे आणि आम्ही स्वच्छता अभियान घ्यायच आम्ही ते उचलायचे, कशासाठी. आम्ही तुम्हांला सांगतो हे तुम्ही काढा. ज्यांनी त्यांनी हॉटेलमध्ये चांगला बिझनेस करावा. ज्यांनी त्यांनी हॉटेलमध्ये घ्याव चांगली पाणीपुरी करावी पुण्यामध्ये कितीतरी भेळ पाणीपुरीची चांगली स्टॉल्स दुकानामध्ये आहेत. लोकांना चांगल खाऊ दयात की. तुम्ही लोक प्रोत्साहन देता. हॉकर्स झोन होणार आहे तुम्ही अजीबात हालू नका. गायकवाड साहेब तुम्हांला या विषय क्रमांक २ विषयी खुलासा करावा लागेल, आज आम्ही तुम्हांला हा विषय दयायचा का. पाहीजेतर उदया आम्ही मिटींग घेतो. यात तारीख लिहीली आहे तुम्हांला आजच पाहीजे असेलतर रात्री १२ वाजेपर्यंत जीबी चालवायची आमची तयारी आहे. नागरीकांसाठी वाट्टेलते आम्ही करु. पण येथून पुढे असे आलेतर कदापि आम्ही खपवून घेणार नाहीत. मागच्या महीन्यात हा विषय क्रमांक २ का आणला नाही. पाणीपुरवठयाचा खुलासा करावा. किती कोटी वसुल झाले हे सांगावे. आमचे समाधान झाले नाहीतर रात्री १२ पर्यंत बसण्याची आमची तयारी आहे, दोन नंबरचा विषय तोच आहे. नगरसेवकांची, नागरीकांची अजीबात दिशाभूल करु नका. पिंपरी चिंचवडला लोकांनी पसंती दिलेली आहे. पिंपरी चिंचवड चांगल आहे पिंपरी चिंचवडमध्ये पाणी चांगल मिळतं, पिंपरी चिंचवडमध्ये रस्ते आहेत म्हणून लोक येण्याची संख्या वाढलेली आहे परंतु ज्या दिवशी हे लोकांना कळेल त्यादिवशी आम्हांला सुध्दा पश्चाताप करावा लागेल. याचा खुलासा करावा तरच दोन नंबरचा विषय वाचणार नसता आम्ही निषेध करणार.

**मा.भानुदास गायकवाड (सहा.आयुक्त) -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. हा विषय खरेतर अगोदरच आणणे आवश्यक होते असं आपण याठिकाणी नमुद केलं आहे ते बरोबर आहे परंतु काही कारणामुळे हा विषय उशिरा आलेला आहे. यापुढे याबाबतीत पुर्णपणे दक्षता घेणेत येईल. ॲक्टमध्ये तरतूद २० फेब्रूवारी अगोदर नमुद होणे आवश्यक आहे. विशीष्ठ असे कुठलही कारण नाही की हा विषय २० फेब्रूवारीलाच घ्यावा असं कोणतही कारण नाही.

**मा.मंगलाताई कदम -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. साहेब, तुमच्याकड बघीतल्यानंतर तुम्ही इतके वडीलधारे वाटतात की मला तुम्हांला बोलायला सुध्दा चांगल वाटणार नाही. तुमचे कामही चांगले आहे तुम्हांला बोलणे आमच्या दृष्टीने योग्य ठरणार नाही. परंतु असे केल्यानंतर आम्ही काम कसे करायचे, आम्ही जनतेसमोर कसे जायचे, त्याच्यावर उपाय सांगावा. तुम्ही म्हणालात काही कारणास्तव, हा विषय मागच्या माहीन्यात यायला पाहिजे होता चर्चेला वेळ मिळाला पाहिजे. आज काही घडले असते आणि जीबी तहकूब केली असतीतर तुमचा विषय चर्चा न करता करायचा का. जे झाल असत ते झाल असत आणि परत आमच्या माथी शिक्का मारला असता. दोन नंबरचा विषय बाजूला ठेवून जीबी चालू ठेवण्याचा महापौरांना अधिकार आहे. बाकीचा सर्व खुलासा करावा, काय केले त्याचे पोस्टमार्टेम त्या विषयाचे करावे.  दोन नंबरचा विषय महापौर बाजुला तात्पुरता सभेपुरता ठेवू शकतात हा विषय आपण शेवट घेवू शकतो व पाण्याचा विषय आपण घेवू शकतो.

**मा.लडकत (कार्यकारी अभियंता) -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. आता जे प्रश्न विचारले त्याला अनुसरुन उत्तर देतो. आऊट सोर्सीगचे काम ऑक्टोबर-२०१२ मध्ये झाले आणि आमची जी वसुली झाली ती २०१३-१४ ची ३५ कोटी १९ लाख, २०१४-१५ ची ३२ कोटी १० लाख आणि  २०१५-१६ ची २३ कोटी ३२ लाख अशी आतापर्यंत ९० कोटी ६१ लाख वसुली झाली आहे. आता शेवटची जी सायकल आहे म्हणजे यावर्षाची आपली जी डिमांड आहे ती ६५ कोटी पैकी २३.३६ कोटी आपली वसुली झालेली आहे आणि यापुढे १० कोटी वसुली होईल असं धरलतरी आतापर्यंत या तीन वर्षात १००.६१ कोटी आपली वसुली होईल.

**मा.मंगलाताई कदम -** मा.महापौर साहेब, महापालिकेचे कर्मचारी वापरले जात नाहीत का. फक्त कॉन्ट्रॅक्टरच काम करतो का, आपल्या पाणीपुरवठयाचे लोक बीलींमध्ये आहेत का नाहीत, त्यांच्या पगारासगट सांगावे. पाणीपुरवठयात किती लोक आहेत त्यांचे पेमेंट व कॉन्ट्रॅक्टरवर खर्च सांगावा.

**मा.लडकत (कार्यकारी अभियंता) -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. तीन वर्षाचा झालेला खर्च ३.२४ कोटी आहे. आताची शेवटची जी सायकल आहे त्याचा खर्च विचारात घेतलातर ४.९२ कोटी खर्च होईल. महापालिका कर्मचा-याचा खर्च  आता माझ्याकडे नाही.

**मा.मंगलाताई कदम -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. आपण जेवढे पैसे वसुल करतो त्याच्यापेक्षा जास्त पैसे आपण बाकीच्यावर खर्च करतो. ५ कोटी ठेकेदारावर खर्च केला तीन वर्षात. आपण टॅक्सला वसुली करतोत का, नाही ते नागरीक भरतात, मग तुमचे पाणीबील नागरीक येऊन भरणार नाहीत का.

**मा.लडकत (कार्यकारी अभियंता) -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. सुरवातीला २७ रुपये एका बीलाला रेट होता. त्यामध्ये फोटो रिडींग घेणं, बील तयार करनं

आणि बील वाटप करनं. त्याच्यानंतर ५ टक्के दरवर्षाची वाढ धरलीतर हा शेवटचा ३१.२५ रेट आहे. एका वेळेसच्या बीलींगचा हा रेट आहे. रेसिडेन्शीअल चारवेळेला बीलींग घेतो.

**मा.मंगलाताई कदम -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. एका बिलींगला किती खर्च. वर्षातून चार वेळा बील देतो त्याला गुणविले करावे आणि आकडेवारी सांगा. आकडेवारी काढलीतर आम्हांला फुकट पाणी देणे परवडेल. लोक म्हणतीलतरी पिपंरी चिंचवड फुकट पाणी, चांगल पाणी आणि स्वच्छ पाणी देतय. कमर्शीअलचा अर्थ आयुक्त साहेबांनी सांगावा. दुकानाच्या बाहेर दुकान लावलेले कमर्शिअल आहेत की नाहीत उदयापासून पिंपरी चिंचवड महापालिकेच्या दारात सगळया टप-या आणून ठेवणार. कमर्शीअलचा अर्थ काय आहे. बिल्डींगमध्ये असेल तेच कमर्शिअल आहे का. आपल्या शहराचा सर्वे सांगावा. अन्यत: प्रत्येकाच्या वॉर्डात घरटी कार्यकर्ता असेल त्याला फुकट व्यावसाय दिलाना तर तो आमच्याशी प्रामाणीक राहील. त्यांनातरी वाटेल आम्ही त्याच्यासाठी काहीतरी केलय. कमर्शीअलचा अर्थ आयुक्त साहेबांनी सांगावा.

**मा.गावडे (सह आयुक्त) -** मा.महापौर साहेब, सन्मा.सभागृह. कमर्शिअल म्हणजे जे दुकानामध्ये विक्री करतात त्याचा अर्थ कमर्शिअल. परंतु फुटपाथवर जे आहे ते अतिक्रमण आहे त्याला टॅक्स नाही. कारण हॉकर्स झोनमध्ये आपल धोरण निश्चित झालेले आहे त्याच्यामध्ये आपण त्यांच्याकडून रक्कम घेणार आहोत. सध्या बायोमेट्रीकची प्रोसेस सुरु आहे. बायोमेट्रीक त्यांच आपण आता करत आहोत त्याच्यानंतर त्यांच्याकडून आपण रक्कम घेणार आहोत.

**मा.मंगलाताई कदम -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. आज रोज नवीन चार टप-या चौकाचौकामध्ये येतात त्यांची हे बायोमेट्रीक करणार, आणि त्यांना अधिकृत ठरवणार आणि त्यांना या जागेवर देणार. मध्ये असं सुटल होत की पिंपरी चिंचवडमध्ये जा कुठही झोपडी टाका त्यांना घर मिळणार कोणीही हात लावत नाही. आता अशी परिस्थिती झालेली आहे हॉकर्स झोन होणार आहे तिथ तुम्हांला घर मिळणार आहे, त्या ठिकाणी टपरी टाका व आम्हांला पाच हजार रुपये दया तुमची टपरी अनधिकृतची अधिकृत होणार. उल्हास शेट्टीनी मागच्यावेळेस नाव घेतले होते.

**मा.गावडे (सह आयुक्त) -** मा.महापौर साहेब, सन्मा.सभागृह. उल्हास शेट्टी यांनी जे नाव घेतले होते त्यांचा पाच हजार दंड वसुल केलेला आहे. कुठल्याही परिस्थितीमध्ये एक हजार रुपये घेतलेले नाहीत. सवलत सुध्दा दिलेली नाही.

**मा.मंगलाताई कदम -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. तुम्ही सांगतात कमर्शिअल नाही अनधिकृत आहे म्हणजेच तुम्ही अनधिकृतचे अधिकृत करणार.

**मा.गावडे (सह आयुक्त) -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. हॉकर्स झोनचा प्राथमीक सर्व्हे २००८ मध्ये झालेला आहे त्याची यादी वेबसाईटवर प्रसिध्द केलेली आहे

त्याच्या व्यतिरीक्त कोणालाही ओळखपत्र देत नाहीत किंवा कोणाचेही बायोमेट्रीक करुन घेत नाहीत. रोज टप-या पडत असल्यातरी त्या काढण्याचे प्रोसेस सुध्दा केले जाते.

**मा.मंगलाताई कदम -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. अतिक्रमणचे लोक गेल्यानंतर सांगतात या नगरसेवकानी फोन केला होता.

**मा.गावडे (सह आयुक्त) -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. जे काही सर्वेक्षण झालेले आहे त्याच्यामध्ये नवीन भर आपण टाकत नाहीत. सर्वे केलेला आहे त्याचे बायोमेट्रीक नियमीतपणे सुरु आहे.

**मा.मंगलाताई कदम -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. थेरगावमध्ये परिस्थिती बघा किती गाडया लागतात. आपण रस्तारुंदीकरण लोकांची घर पाडून केलेली आहेत. तिथे किती गाडया लागतात बघावे. तेथे अजीबात चांगली परिस्थिती नाही. आपण स्वच्छता अभियानामध्ये महाराष्ट्रामध्ये नाहीतर देशामध्ये नंबर एकला आलो असतो, त्याचे आपण नियम पाळले असतेतर. आपण प्रयत्न केरायला पाहीजेत. स्मार्ट सिटीमध्ये नाहीतर स्वच्छतामध्ये आपला नंबर आला पण हा सगळा प्रकार थांबविलातर देशामध्ये नंबर एकला येऊ.

**मा.शमीम पठाण -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. २००८ ला पथारीची यादी केलेली आहे का केबीनची यादी केलेली आहे आणि त्याची व्याख्या काय आहे. केबीन देणार का. पथारीची यादी आता केलेली आहे. २००८ ची यादी नाही, २००८ ची यादी कोणती आणि आता २०१२ ची यादी कोणती.

**मा.गावडे (सह आयुक्त) -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. २००८ साली प्राथमीक सर्व्हे झाला होता तो रद्द करुन २०१२ ला नव्याने सर्वेक्षण करण्यात आले. त्यात पथारीवाले, हॉकर्सवाले यांचा सर्व्हे पुर्ण झालेला आहे तीच यादी फायनल करतो. २०१२ ला अंतीम कागदपत्र घेवून केलेले आहे.

**मा.शमीम पठाण -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. म्हणजे जे जिथे आहेत तिथेच त्याना कायम करणार का.

**मा.गावडे (सह आयुक्त) -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. त्यांच्या पुनर्वसनासाठी जागा निश्चित केलेली आहे पर्यायी जागा देवून त्यांच पुनर्वसन आपण करणार आहोत.

**मा.शमीम पठाण -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. आम्ही जागा सुध्दा सांगीतलेली नाही. कारण आदिच तुम्ही चर्चा केलेली होती. या महापालिकेवर व मा.आयुक्तांवर सुध्दा खर म्हणजे त्यांनी अतिक्रमण केल्याचा गुन्हा लादला पाहीजे. स.नं. १९५ मधल्या मुलांच्या खेळाचे मैदानावर २००७ ला जे अतिक्रमण केलेले आहे त्याच्यावर तुम्ही प्रशासन करता ते योग्य करता. त्या अतिक्रमणाचे काय करायचे आहे. आपले अतिक्रमण, तो म्हणजे

आपला बाळया, लोकांच कारट. आम्ही केल ते चुकीचं. जनता करते ते चुकीच स्वत:ची जागा, स्वत:च्या विटा, स्वत:ची वाळू, स्वत:चे पैसे, कष्ट स्वत:चे हे सगळ करुन ते अनधिकृत आणि प्रशासन त्या ठेकेदाराना पैसे देवून जे करत ते अतिक्रमण नाही ते कायदयात बसवून करता तुम्ही. तुमच्यामुळे शहरामध्ये अतिक्रमण वाढते आहे. मीटर निरीक्षकांचा विषय व मीटर निरीक्षणाचा विषय या दोन्ही विषयावर मी या आदि ब-याचवेळा चर्चा केलेली आहे. सन्मा.सभागृहाचे त्यावेळेला त्याकड लक्ष गेलेले नाही. आता मात्र लडकत साहेब तुमच्या विषयाबद्दल बराचवेळ चर्चा केलेली आहे. मा.पक्षनेत्यांनी जे सांगीतले ते अत्यंत महत्वाच आहे. तुम्ही हिशोब करुन सांगालच परंतु मिटर निरीक्षणासाठी जी कॅनबेरी कंपनी नेमलेली आहे. अशा किती कंपन्या तुम्ही नेमलेल्या आहेत. किती वर्षे झाले, वर्षाकाठी किती आपण त्यांना देतो हे सांगावे. आपले मीटर निरीक्षक काय करतात त्यांचा पगार आपण देतो. आपल्याकडे असे बरेचसे फिरश्ती आपले आहेत जे आस्थापनेवर काम करतात. मी यादी देणार आहे त्यात शिक्षक असेच आहेत एकतास इकडे तर एक तास तीकडे बाकीचे घरी व काही ठिकाणचे शिक्षक पतसंस्थेत काम करतात, ते कधी माहित पडत, त्यांनी काहीतरी घोटाळा केल्यावर. काही निरीक्षक असेच फिरतात. २०० ते २५० लोक पीसीएमटी मधुन घेतलेले होते ते कुठे आहेत हे बघावे. गावडे साहेब तुम्ही प्रशासन सांभाळलेले आहे. तुमच्या काळात ते लोक इकडे आलेले आहेत ते कुठे आहेत, काय काम करतात. प्रशासनावर पकड किती सैल आहे त्याचे हे उदाहरण आहे. पाणीपुरवठयाचा हिशोब सांगावा नंतर निर्णय घेवू. कराच्या बाबतीत आपण करप्रणालीचा महत्वाचा विषय आहे त्यावर बोलले पाहीजे. पाण्याच्या विषयी लडकत साहेबांनी सांगीतले त्याच्यावर चर्चा करणार परंतु करप्रणालीच्या बाबतीत सांगायचे आहे की मा.गायकवाड साहेब आल्यापासून त्याला शिस्त लागलेली आहे, दरवर्षी असा चढता आलेख मिळकतकराचा आहे परंतु याच मिळकतकरामध्ये अन्याय कोणावरही होऊ नये. मा.भाऊसाहेब भोईर यांनी हे प्रश्न विचारलेले आहे व चर्चा दुस-या विषयावर चाललेली आहे. दोन नंबरच्या विषयावर बोलणार आहेत परंतु करयोग्य मुल्य जे आहे, दुस-या विषयाला सुचना देवून लोकांच्यावरचा जो अधिभार आहे तो कसा कमी करता येईल ते पाहू. स्काडा ही सिस्टीम जी आहे ती एका क्लिकवर तुम्हांला येथे बसून सर्व मिळतं आणि कोटयावधी रुपये जाऊन सुध्दा एवढा वेळ हिशोब करायला लागतो म्हणजे आजब कारभार आहे.

**मा.आर.एस.कुमार -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. हॉकर्स झोन बद्दल मला बोलायचे आहे.

**मा.महापौर -** हॉकर्सचा विषय नाही, तुम्हांला बोलायला परवानगी दिलेली नाही, त्यांनी मध्येच विषय काढलेला आहे.

**मा.लडकत (कार्यकारी अभियंता) -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. आता माझ्या कडे बिलींगचे डिटेल्स नाहीत परंतु आता मी रफ कॅलक्यूलेशन सांगतो १ लाख

२८ हजार ७२५ संख्या आहे. त्याचे वर्षातून चार वेळेला बीलींग केले. २७ रुपये सुरवातीचा रेट घेतलातर त्याची किमंत ४ कोटी १७ लाख ६ हजार ९०० व कमर्शिअल कनेक्शन ३९४२ आहेत त्याची दर महीन्याची सायकल होते म्हणजे ३९४२X१२X३X२७ याचे ३८ लाख ३१ हजार ६२४ असे टोटल ४ कोटी ५५ लाख ३८ हजार ५२४ होते. हे मी ढोबळ सांगीतलेले आहे. आता माझ्याकड बिलींग नाही आणि हा २७ रुपये रेट धरुन आपण काढलेले आहे. यावर्षाचे आतापर्यंतचे बिलींग ३ कोटी २४ लाख झालेले आहे.

**मा.महापौर-** प्रत्येकानी हात वर करुन परवानगी घेवून बोलावे.

**मा.सुरेश म्हेत्रे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. लडकत साहेबांनी आकडेवारी दिलेली आहे. ४ कोटी १७ लाख वर्षाचे काढलेतरी १ कोटी ६२ लाख येते. आता तुम्ही १६ कोटीचे कॅनबेरीला काम दिलेले आहे. ३१ रुपये रेट असेलतर १ कोटी ६२ लाख म्हणजे पाच वर्षाचे किती होतात. ८ कोटी होतात आणि १६ कोटी पेड करतात. याच्या व्यतिरीक्त काय खर्च आहे. बिलींगचा रेट ३१.२५ दिलेला आहे तो त्यांचा नफा, खर्च धरुनच दिलेले आहे का प्रशासनाने ठरवलेले आहे. त्यांनी काही कोटेशन टेंडरमध्ये दिलेले आहेत का. रेट दिलेले आहेत का आपण ठरविलेले आहे.

**मा.लडकत (कार्यकारी अभियंता) -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. २७ रुपये जो रेट आहे त्याच्याकरिता आपण टेंडर काढलेल होते आणि टेंडरमधला तो रेट होता. ई-टेंडरींग ही त्यांची शेवटची सायकलींग आहे. दरवर्षी ५ टक्के वाढ दिलेली आहे. याच्यामध्ये जे काम ॲड केलेले आहे त्यामध्ये आपण थ्रीडी इमेज पुर्ण सिटीची करतो आणि त्याच्यामध्ये प्रत्येक जे मीटर आहे त्याच जीओ कोडींग करतोय म्हणजे एखादया मीटरचे लोकेशन ते आपल्या सिस्टीममध्ये जे की पाच मीटरच्या रेंजमध्ये, त्या मीटरच आपल्याकडे रेकॉर्ड येणार. याच्यामध्ये बिलींगसाठी काही सॉफ्टवेअर ॲड केलेले आहे. या कामामध्ये आपण स्पॉट बिलींग करतो त्यासाठी त्यांना काही इन्स्ट्रूमेंट प्रत्येकांना दयावे लागतील. स्पॉट बिलींग दिल जाईल आणि ऑनलाईन पेमेंट कार्ड स्वाईप करुन त्याठिकाणी केल जाईल असे करणार आहोत. त्यामुळे प्रत्येक इन्स्ट्रूमेंटचा खर्च त्यामध्ये ॲड केला आहे.

**मा.सुरेश म्हेत्रे-** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. हे इन्स्ट्रूमेंट काय प्रकारचे याची मंजूरी घेतली आहे का.

**मा.लडकत (कार्यकारी अभियंता) -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. याच्यामध्ये फायदा असा आहे की स्पॉट बिलींग केल्यानंतर नागरीकांना चेक पेमेंट करायच असेलतर चेक घेतल्या जाईल आणि कार्ड स्वाईप करुन ते पैसे घेतले जातील कॅश घेत नाहीत त्यामुळे थोडी रिस्क वाढेल त्यामुळे आपण कार्ड स्वाईपच मशीन ठेवलेल आहे.

**मा.सुरेश म्हेत्रे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. मिळकतीप्रमाणे बील ॲड करावे तुमचे बिलींग वाढेल. प्रत्येक घरामध्ये चार व्यक्ती याप्रमाणे जर २०० ली.पर परसन

पकडून एका घरात ४ व्यक्ती अशी संख्या आली की तुम्हांला बिल मिळेल. २५ हजारचे २.५० पै. रेटने त्याचे रिडींग किती होणार. २५ युनीट होणार आहे. ७५ रुपये बील त्या घराला येईल. ७५ X १२ म्हणजे १ हजार पर्यंत बील येईल. आणि ज्या ठिकाणी कमर्शिअल आहे त्याठिकाणी मीटर जरुर वापरा. त्याठिकाणी पाणी जास्त वापरत असतात, कामगारांची संख्या जास्त असते. घरामध्ये बदल होणार नाही अशा पध्दतीने हे करावे, हा बदल झाला पाहिजे. तुम्ही कॅलक्यूलेट करुन सांगीतले हे बंद केलेतर नागरीकांचा काय फायदा होईल, पाणीपट्टी कशी वसुल होईल. वॉर्डातील बील रिपेअर कोणी करत नाही, वर्षे झाले आहे. प्रत्येक व्यक्तीला पाणी देण्याचा आपला नियम आहे त्यामुळे समान बिलींग होईल. मिळकतीचा सर्वे झाला की हे येतेच. कॅलक्यूलेशन करा सगळ व्यवस्थीत होईल, हे इन्स्ट्रूमेंट, ते इन्स्ट्रूमेंट काही देवू नका सगळ बाजूला ठेवा. मीटर चोरीला जातो, हवेन मीटर पळतो या तक्रारी बंद होणार. त्यामुळे तुम्ही मिळकतीप्रमाणे बील दयावे. प्रत्येक व्यक्तीस २०० ली.पाणी याप्रमाणे पाण्याचे बिलींग आले पाहीजे याप्रमाणे हिशोब करुन त्याप्रमाणे करावे आणि बील दयावे.

**मा.प्रशांत शितोळे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. हा पाणीपुरवठयाच्या बाबतचा विषय आहे तो अतीशय गांभीर्याचा आहे. जेव्हापासून मीटर पध्दत लागू झाली तेव्हापासून या सभागृहातील बरेचसे सभासद त्याला साक्षीदार आहेत, याला मान्यता देणारे आहेत त्यापैकी मी पण एक आहे. आठ ते दहा वर्षापुर्वी जेव्हा जेएनएनयुआरएमची स्किम आली तेव्हा मीटर पध्दत आपल्या शहरात लागू करण्यात आली त्यानंतर या पध्दतीचे कामकाज चालू झाल्यानंतर त्यामध्ये काय त्रुटी आहेत त्या मीटरचे टेंडरींग पासून काय चांगल आहे काय चांगल नाही आणि नागरीकांना कसा फायदा होईल याबाबतीत ब-याचवेळेस चर्चा या सभागृहात झालेली आहे. मला आठवण करुन दयायची आहे की त्यावेळेला जेव्हा २.५० रु. प्रती हजारी दरास याठिकाणी मंजूरी दिली त्याच्यानंतर त्यापुर्वीही काही वेगळे दर होते. युनिट सुध्दा वेगळे होते पण त्याच्यानंतर आपण ५० हजार ली. पर्यंत ५० युनिटला निवासी दर वेगळा, कमर्शिअलला दर वेगळा अशाप्रकारची मान्यता दिली पण १०० फ्लॅटची जर एखादी सोसायटी असेलतर ५० युनिट लगेच जागेवर होतात. तुम्ही त्या ५० युनिटच कॅलक्यूलेट पर घर करतात, का पर मिळकत करतात, का पर बिल्डींग करतात, का पर कनेक्शन करतात, कसे करतात. पण तुमचे हे ५० युनिट एकाच दिवसात पडतात. लगेच तुमचा दर हा ५ रुपये, ७.५० रुपयाकडे लागू होतो आणि जिथ १०० फ्लॅटची सोसायटी असेलतर केवळ एक दिवसापर्यंतच तुम्हांला त्या २.५० रु. पर्यंतचा दर लागू होतो. किंवा जास्तीत जास्त दोन दिवस उरलेला सगळा दर तुम्हांला ५ रुपये किंवा ७.५० रु. हा लागू होतो. त्यावेळेला ब-याचशा नागरीकांनी ज्यांनी या पाणीपुरवठयाच्या बाबतीत त्यांच्या अतीशय तीव्र स्वरुपात भावना व्यक्त केल्या आणि हा दर जास्त होतोय. त्यावेळेला आम्हांलाही मान्य आहे की मीटर पध्दत लागू केल्यापासून लोकांनी पाणी घेण्याचे प्रमाण कमी केले. म्हणजे त्यांना जेवढ लागत तेवढच घेणार पण सामुहीकरित्या

ज्यांच बिलींग आहे, सोसायटया आहेत, गृहरचना संस्था असतील त्या लोकांना मात्र या प्रकाराचा त्रास होतो. तुम्ही आकडेवारी मोठी दिलेली आहे. वसुली झालेली आकडेवारी वेगळी आणि तुम्हांला प्रत्यक्ष मिळालेल्या रक्कमा वेगळया आहेत. ज्यांची वसूली व्हायची त्यांची संख्या एकूण मागणी जी आहे ती ६४.५६ कोटी त्यापैकी ४०.४९ कोटी वसुली बाकी आहे. याचे कारण असे आहे की प्रशासकीय कारभारातील त्रुटी. नगरसेवकांचे म्हणणे एवढेच असतं की माझ्या माणसाने सांगीतले ते लवकर कनेक्शन करुन दे किमान कागदपत्र घेवून, आम्ही दहा वेळा सांगतो टॅक्स पावती जोडली की कनेक्शन देवून टाका. तुम्हांला प्रतिज्ञापत्र पाहीजे, अमुक पाहीजे तमुक पाहीजे, एनओसी पाहीजे कशाला लागते ते, तो करपात्र माणूस आहेतर तो पाणी घेण्यास शंभर टक्के पात्र आहे त्याला कशासाठी अपात्र ठरविता. त्याला आपण इतर सुविधा देतो, टॅक्स घेतो, आरोग्य कर घेतो, मलप्रवाह कर घेतो, अग्निशामक कर घेतो हे सगळे टॅक्स घेतो मग त्याला पाणी का दयायच नाही. अनधिकृत घर असेलतर आणि त्याची नोंद आपल्याकडे असेलतर त्याचे पाणी तुम्ही थांबवल नाही पाहीजे. पाणी थांबवायचे असेलतर त्याची नोंद पण करु नका. हे करत असताना ज्या संस्थेची नेमणुक आपण थर्डपार्टी म्हणून केली त्या संस्थांना ज्या दराने पैसे दिले त्यानंतर आपली वसुली कितपत वाढलेली आहे. वसुली पण वाढायला पाहीजे. आपण जेव्हा कॅनबेरीची नेमणुक निवीदा प्रक्रीयेव्दारे केली त्याच्यानंतर आपली किती वाढ झालेली आहे. वाढ म्हणजे जेवढया प्रमाणात अपेक्षीत होती तेवढी झालेली नाही. आज आपल्या पाणीपुरवठयाची तुमचाच हा आकडा आहे ४०.४९ कोटी इतकी रक्कम वसुल होणे बाकी आहे. ४० कोटी बाकी असेलतर आपला मुळातच आकडा ६४ कोटीचा आहे. बाकी किती राहीली ७० टक्के बाकी राहीली, ७० टक्के जर वसुली बाकी असेलतर मग हे चार कोटी कशासाठी देता. त्यातील तीन कोटीचे बिलींग झालेले आहे प्रतीवर्षी. एवढे बिलींग असेलतर एका वर्षाला पावणेदोन कोटी रुपये देतो त्या ठेकेदाराला. तुम्ही पाण्याच्या मीटरमध्ये जसे टप्पे केले तसे पाण्याच्या बीलामध्ये सुध्दा टप्पे केले पाहीजेत. समजा सांगवीमध्ये आला, सांगवीमध्ये एवढ एवढ बिलींग आहे एवढ बिलींग पहील्या वर्षी एक रुपया मिळेल, त्या वर्षाच्या दुसऱ्या बिलाला आकडेच मिळतील, तीसऱ्या बीलाला १० पै. मिळतील असे करावे. कशासाठी प्रत्येक बिलाला सेम पैसे. पहील्या बीलाला ठीक आहे कारण त्याला घर शोधाव लागल, ते रेकॉर्ड कराव लागल. त्याच्यानंतर त्याचा सेटअप तयार झालेला असतो म्हणजे त्याचा कॅपेक्स पुर्णपणे कमी झालेला आहे त्याच्या ऑपेक्समध्ये त्याला फार कपात आलेली आहे. त्यामुळे त्याच्या ऑपेक्समध्ये आपोआप त्याने कपात दयायला पाहीजे. कॅपेक्स एकदाच लावावा लागणार आहे एकदा लावल्यानंतर तीन वर्षे काय संबंध आहे कॅपेक्सचे पैसे दयायचा. ही पावणेदोन कोटीची रक्कम किमान ७५ लाखावर यायला पाहीजे. आपल्या शहराचे जीआयएस करा म्हणून मी दहा वेळेस सांगीतलेल आहे पोमण साहेबांना. या देशामध्ये केंद्रशासनाने अमृत योजनेअंतर्गत तुमच्या शहरातील सर्व मिळकतीची माहीती घेण्यासाठी तुम्हांला जीआयएस

करणे बंधनकारक केलेले आहे. कशासाठी केलय. तुमच्या शहरातील घर किती आहेत, तुमच्या शहरात मिळकती किती आहेत, तुमच्या शहरात पाणीपुरवठा किती केला जातो, तुमच्या शहरात पाणीपुरवठा केला जातो त्याच बिलींग आकारणी कशी केली जाते, त्याची आकारणी कशी केली जाते, तुमच्या शहरातील रस्ते किती लांबी रुंदीचे आहेत, तुमच्या शहरातील ड्रेनेज किती लांबी रुंदीचे आहेत याची माहीती इलेक्ट्रॉनिकली सक्षम तुम्ही ही करायला पाहीजे. ही माहीती एकत्रीत संकलीत केली पाहीजे. आपल्या शहराचे जीआयएस झाले पाहीजे. स्काडामुळे प्रॉब्लेम सापडले पण तो प्रॉब्लेम कायमस्वरुपी सॉल्व्ह केला असे सांगावे. स्काडामुळे तुमच्या केंद्रामध्ये माहीती मिळते पण त्याच्यामुळे लिकेजेस थांबले का. लिकेजेस थांबवायची तुम्ही प्रोसेस केली. शहरात एक दोन ठिकाणी तुम्ही प्रायोगीक तत्वावर केल, प्राधिकरणात तुम्ही लिक डिटेक्शन सिस्टीम केली, शहरात करायला नको का. का एकटया प्राधिकरणातच पाणी लिक होत. बाकीच्या शहरात करायला नको का. आपल्या शहरातील व्हॉल्व्ह जूने झालेले आहेत त्यामुळे हजारो लाखो ली. पाणी गळती होते. बजेटमध्ये प्रोव्हीजन करा, त्या व्हॉलच्या बाजूने कॉंक्रीट करा, बाजुने एमएसचे कॉक्स टाका अस किती वेळेस सांगीतल आहे. सभागृहातून काही लोक चांगल्या चांगल्या त्यांच्या अनुभवातून सुचना देत असतात. पाण्याची बचत व्हावी, पाणीपट्टीची वसूली व्हावी. आता पुर्वीचे दिवस गेले, एक काळ असा होता की आमच्यासारख्या राजकारण्यांना असं वाटायच की माझ्या शहरात प्रत्येक नागरीकांना किंवा माझ्या वॉर्डात फुकट पाणी दयावं. आता नागरीकच सांगतात २ रुपये घ्या पण पाणी व्यवस्थीत दया, आम्हांला तुमच फुकट नको. आपण आपली जबाबदारी म्हणून खरंच ती सुविधा देतोत का, नाही देत. ही आकडेवारी दिशाभूल करणारी आहे. एवढे चांगले प्रश्न भाऊसाहेब भोईर साहेबांनी विचारले आहेत. मला एका बाजूने वाईट पण वाटल की त्यांच्यासारखा एक सिनीअर माणूस असे प्रश्न विचारतात. पुणे शहरात मोजणी चालू आहे. स्कॉर्पिओ गाडीवर ते रडार मशीन आहे. त्यांना थांबवून मी विचारल की कसली मशीन आहे, तर त्यांनी सांगीतल जीआयएस चालू आहे पुणे शहराच. यामध्ये काय काय होत असं विचारल, त्यांच्याकडे रडारमधुन लेजर जातात. ज्या रस्त्यावरती गाडी जाईल दहा-पंधराच्या स्पीडमध्ये ती गाडी जाते. एका बाजूचे एक हजार मीटर पर्यंत व दुस-या बाजूचे एक हजार मीटर पर्यंत म्हणजे दोन कि.मी. झाले त्या दरम्यान येणारे घरांचे प्लॅन त्यांचे सॉफ्टवेअरमध्ये आपोआप येतात. आपल्या टॅक्समध्ये किमान २५ टक्के वाढ होईल आपल्या पाणीपट्टीमध्ये किमान २५ टक्के वाढ होईल अशाप्रकारचे नवीन तंत्रज्ञान अवलंब करायला पाहीजे. १ मे ला सुट्टीच्या दिवशी मा.आयुक्त साहेबांनी जीआयएसचे प्रेझेन्टेशन घेतले. त्या दिवशी ते मी पाहील आणि मी सांगीतल साहेब ही चांगली योजना तुम्ही करा. आजपर्यंत त्याचे काहीही केलेले नाही. ज्याच्या त्याच्या वॉर्डामध्ये टाक्या आहेत. स्काडा डिटेलींग तुम्हांलाच का येते आम्हांला नगरसेवकांना का येऊ शकत नाही. आमच्या टाकीच सॉफ्टवेअरमध्ये काही पण करता येत. तुम्हांला संबंधीत वॉर्डची रचना माहीती असते.

त्या वॉर्डच्या टाकीच पाणी कुठ जात ते माहिती असतं. तीथला नगरसेवक किमान पाच वर्षे तरी तोच असतो. त्यावेळी जी माहीती तुम्हांला स्काडाच्या माध्यमातून उपलब्ध होते माझ्या वॉर्ड मधली टाकी किती भरलेली आहे याची माहीती जर मला आली, किती भरलेली नाही याची महिती जर मला आलीतर मी माझ्या परिसरामध्ये पाहीजे तो मॅसेज देवू शकतो. आज पाणी येणार नाही, उदया पाणी येणार नाही. आम्हांला त्याची कारण पण तुम्ही वेळेच्या अगोदर सांगू शकता. आम्हांला मॅसेज कधी येतो, दोन तास अगोदर येतो. साहेब, आज जरा अडचण आहे, रावेत पंपींग खोललय तिथ जरा आडचण आहे. त्याठिकाणी लाईट नसल्यामुळे तिथ प्रॉब्लेम झालेला आहे त्यामुळे आपल्याला पाणी येणार नाही. या तांत्रीक गोष्टी आहेत याचा उपयोग आपल्या प्रशासनान केला आहे का. आपला सर्व शहरात, सर्व देशात गौरव आहे, चांगले शहर आहे पण अजुनही चांगल्या सुविधा देण्यासाठी आपण कुठतरी कमी पडतो. आम्हांला काय वाटत की आमच्या शहरामध्ये या ज्या सुविधा आहेत त्याला आज बाहेर नावाजले जाते या ग्रेड वनच्या आहेत अजून त्या पुढ जाव्यात. अजून त्याच्यामध्ये सुधारणा व्हावी आपण नुसत महाराष्ट्रात नाहीतर देशामध्ये नंबर एकला यावे. कालांतराने आंतरराष्ट्रीय स्तरावर आमच्या शहराने जावे. या शहरात पाणीपुरवठया सारख्या आणि घराच्या टॅक्ससारख्यावर जर दोन-दोन, चार-चार तास सभागृहात चर्चा होणार असेलतर याचा अर्थ असा आहे की आपल प्रशासन हे फेल आहे, आपल्या प्रशासनाने केलेले काम चुकीचे आहे असा त्याचा अर्थ होतो. परंतु केलेल्या कामाची पावती जर तुम्हांला पाहीजे असेलतर अपल्या प्रत्येक विभागाने मिळकत आणि पाणीपुरवठा विभाग यांच्याकडे मिळकतीचे स्त्रोत म्हणून पहावे लागेल. मिळकत आणि पाणीपुरवठा यांच्या कामाचे शंभर टक्के नियोजन केले पाहीजे. तुम्ही लोकांना पाणी देता त्याचा शंभर टक्के लोकांकडून त्या पाण्याच्या बदलाचा मोबदला महापालिकेला मिळवून दिला पाहीजे. जर अशा पध्दतीने काम केल, अशा पध्दतीने ती पाण्याची वसुली शंभर टक्के केलीतर त्यामध्ये तुम्ही ख-या अर्थाने यशस्वी झालात असे म्हणता येईल. भाऊसाहेबांना काय गरज पडली हो की मिळकती किती आहेत, टॅक्स किती लावला, पाणीपुरवठा किती आहे. याचा अर्थ प्रशासन चोरी करणा-यास साथ देते हे उघड आहे. मा.महापौरांच्या वॉर्डामध्ये तीन हजार मिळकती आहेत, तीन हजार मिळकतीना पाणी तर वापरतात. तुम्ही तर फतवा काढला पाणीपुरवठा दयायचा नाही. अनधिकृत पाणीपुरवठा करु नये तुम्हीच सांगता आम्ही काही सांगत नाहीत. शहरात जो माणुस येणार त्याला पाणी देणार. शंभर टक्के देणे आपल काम आहे पण तुम्हीजर पाणी देणार असेलतर ती वसूली पण तुम्ही करा व लिकेजेस कमी करा. ई-टेंडरींग सिस्टीममुळे आयुक्त साहेबांचही अभिनंदन आहे की ६०० कोटी दोन वर्षात वाचविणे शक्य झाल. त्यामुळे तुम्ही आम्हांला दोन हजार कोटीच्या पुढच बजेट देवू शकले नसता आम्हांलाही कोणी विचारल असतं, आमच्या परिसरात काम झाली नसती. यासाठी मा.महापौर साहेब मी तुम्हांला विनंती करतो की पाणीपुरवठयाच्या बाबतीत, कराचा अभ्यास करण्यासाठी

विशेष सभा बोलावली पाहीजे. १० तारखेच्या आत विशेष बैठक झालीच पाहीजे. करांच्या बाबतीत एक-दोन दिवस चर्चा झालीच पाहीजे. आपल्या नागरीकांन कर समजावून सांगावयाचा असेलतर, वाढवायचा असेलतर त्यानी पध्दत सांगायला नको का. आता पेपरला बातमी येते निवडणूकीच वर्ष असल्यामुळ करात वाढ नाही पण याच्यात जर वाढ करायची असेलतर, काही प्रमाणात आपली सुध्दा इच्छा असेल आता पुणे शहराने बारा ते साडेबारा टक्के पाणीपट्टीत वाढ केली, बरेचसे नाराज आहेत पण प्रॅक्टीकलीजर प्रशासनाला वाटले योग्य आहे तर त्यांनी वाढ दिली, आम्हांला तुम्ही संधीच देत नाहीत. डायरेक्ट अजेन्डयावर विषय येतो. कुठल्या नेत्यांना बोलवल, कुठल्या पक्षनेत्यांना बोलावल का, की या वर्षाचा फेब्रूवारीचा हा विषय आहे, आपल्याला कराच्या बाबतीतला निर्णय घेणं क्रमप्राप्त आहे याबद्दल तुम्ही चर्चा करा. मंगलताईनी ज्याप्रमाणे सांगीतले की आपल्याला वेळ लागलातरी चालेल परंतु नागरीकांच्या हिताचा निर्णय या सभागृहाला घ्यायचा असेलतर तुमच्याकडून अपेक्षीत गोष्टी आम्हांला पाहीजे त्या येथे सादर झाल्या पाहीजे. सगळयाच बाबतीत अशाप्रकारच्या ज्या संस्था आहेत त्यांना काम दिले पाहीजे. योग्य प्रमाणात, योग्य पैशात, योग्य वेळेत त्यांनी पुर्ण करुन दिले पाहीजे तरच या कामास अर्थ आहे, काम देवूच नका अशातला भाग नाही पण ते देवून आपल्याला फायदा पण झाला पाहीजे. लडकत साहेबांनी आकडेवारी सांगीतली ती खरच योग्य आहे का. आम्हांला वाटते या शहराच्या विकासामध्ये माझे योगदान मोलाचे असावे, महत्वपुर्ण असावे. कदाचित ते फार मोठ नसेल पण महत्वपुर्ण नक्कीच असेल. त्यामुळे प्रत्येकाना वाटते आपले शंभर टक्के सहकार्य शहराच्या विकासात असावे. त्यामुळे तुम्ही माहीती दिलेली किंवा देता ती योग्य पध्दतीत आहे का नाही याची शहनिशा करुन उपसूचना दिली जाईल. शहरात चांगला पाणीपुरवठा, चांगली मिळकतकर प्रणाली जीआयएसच्या माध्यमातून तुम्हांला राबविता येईल अशी अपेक्षा करुन थांबतो.

**मा.शुभांगी लोंढे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक २ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक - २

दिनांक - २०/०२/२०१६ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ :- १) मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.कर/मुख्य/५/कावि/१५/१६ दि.११/१/२०१६

२) मा.स्थायी समिती सभा ठ.क्र.१४८०१ दि.२९/०१/२०१६

सन २०१६-२०१७ या सरकारी वर्षाकरिता महानगरपालिका करांचे दर आणि करेत्तर बाबींची फी/शुल्क सोबतचे प्रपत्र अ व ब प्रमाणे निश्चित करण्यास मान्यता देणेची मा.आयुक्त यांची मागणी असली तरी कर व करेत्तर बाबींचे दर सन २०१५-१६ प्रमाणे पुढील २०१६-२०१७ या आर्थिक वर्षाकरीता कायम ठेवण्यास मान्यता देणेत येत आहे.

**मा.सुजाता पालांडे -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

**मा.भानुदास गायकवाड (सहा.आयुक्त) -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. सन २०१६-१७ चे दर निश्चित करण्यासाठी हा विषय आपल्या समोर ठेवलेला आहे. मा.स्थायी समिती समोर आपण सामान्य करामध्ये दोन टक्के वाढ, निवासी आणि बिगर निवासीमध्ये चार टक्के वाढ सुचविलेली होती आणि मलप्रवाह सुविधा कर, पाणीपुरवठा लाभ कर आणि रस्ता कर एक एक टक्का वाढ सुचविलेली आहे. ही जी वाढ सुचविलेली आहे ती वाढ २०१५ पुर्वी ज्यांचे करयोगय मुल्य निश्चित झालेले आहे त्याच्यासाठी ही वाढ सुचविलेली होती. मगाचा जो विषय होता तो अ,ब,क,ड चा तो त्या आर्थीक वर्षामध्ये कर योग्यमुल्य नवीन मिळकती साठीचा निश्चित करण्याचा विषय आहे. अ,ब,क,ड च्या दरामध्ये आपल्याला काही समानता आणायची असेलतर १ एप्रिल २०१६ पासून आपल्याला ते दर निश्चित करावे लागतील. त्यासाठी आपल्या ज्या काही सुचना आहेत सभागृहात जी चर्चा झालेली आहे त्याच्या अनुषंगाने आपल्याला त्यामध्ये योग्य ते बदल करता येतील व त्याप्रमाणे जे बदल आपण सुचवाल ते बदल करणे उचित राहील. हे जे दर आहेत ते आपण २०१५ पुर्वीच्या ज्या मिळकती आहेत ज्याचे करयोग्य मुल्यावर ऑलरेडी निश्चीत झालेले आहे त्याच्यासाठी एकूण करामध्ये सामान्य करामध्ये २ टक्के आणि निवासी आणि बिगर निवासीसाठी ४ टक्के आणि बाकीचे जे मलप्रवाह सुविधा कर आहेत आणि पाणीपुरवठा लाभ कर आहे आणि रस्ता कर याच्यातही एक-एक टक्का सुचवण्यात आलेले होते.

**मा.अजीत गव्हाणे -** मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो- करयोग्यमुल्य निर्धारणासाठी जे अ,ब,क,ड असे विभाग करुन वेगवेगळे दर निश्चित करणेत आलेले आहेत त्याची पुर्नरचना करुन शहराकरिता नव्याने दर निश्चिती करुन सन २०१६-१७ मध्ये करयोग्यमुल्य निर्धारणाचे प्रति स्क्वेअर फूट दरामध्ये वाढ करणेत येऊ नयेत यास मान्यता देणेत यावी.

**मा.प्रभाकर वाघेरे -** मा.महापौर साहेब, उपसूचनेस मी अनुमोदन देतो.

**मा.शुभांगी लोंढे -** मा.महापौर साहेब, उपसूचना स्विकारली आहे.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा दुरुस्त ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक - ८१७ विषय क्रमांक - २

दिनांक - २०/०२/२०१६ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ :- १) मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.कर/मुख्य/५/कावि/१५/१६

दि.११/१/२०१६

२) मा.स्थायी समिती सभा ठ.क्र.१४८०१ दि.२९/०१/२०१६

सन २०१६-२०१७ या सरकारी वर्षाकरिता महानगरपालिका करांचे दर आणि करेत्तर बाबींची फी/शुल्क सोबतचे प्रपत्र अ व ब प्रमाणे निश्चित करण्यास मान्यता देणेची मा.आयुक्त यांची मागणी असली तरी कर व करेत्तर बाबींचे दर सन २०१५-१६ प्रमाणे पुढील २०१६-२०१७ या आर्थिक वर्षाकरीता कायम ठेवण्यास मान्यता देणेत येत आहे. तसेच करयोग्यमुल्य निर्धारणासाठी जे अ,ब,क,ड असे विभाग करुन वेगवेगळे दर निश्चित करणेत आलेले आहेत त्याची पुर्नरचना करुन शहराकरिता नव्याने दर निश्चिती करुन सन २०१६-१७ मध्ये करयोग्यमुल्य निर्धारणाचे प्रति स्क्वेअर फूट दरामध्ये वाढ करणेत येऊ नयेत यास मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

---------

**मा.शुभांगी लोंढे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ३ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक - ८१८ विषय क्रमांक - ३

दिनांक - २०/०२/२०१६ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ :- १) मा.अति.आयुक्त यांचे जावक क्र.वृ.सं./४/कावि/१/२०१६ दि.१/१/२०१६

२) मा.स्थायी समिती सभा ठ.क्र.१४८६४ दि.२९/०१/२०१६

मनपाच्या वृक्षप्राधिकरणाचे सन २०१५-१६ चे सुधारीत र.रू.१५,६५,२१,०००/- व सन २०१६-१७ चे मुळ अंदाजपत्रक र.रू.१८,८१,४६,०००/- प्रस्तावासोबत जोडणेत आलेल्या वृक्ष प्राधिकरण चे अंदाजपत्रकास तपशिलाप्रमाणे मान्यता देणेत येत आहे.

**मा.सविता साळूंके -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

--------

**मा.शुभांगी लोंढे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ४ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक - ८१९ विषय क्रमांक - ४

दिनांक - २०/०२/२०१६ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ - १) मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.क्रीडा/कॅश/कावि/७७/२०१६ दि.१/२/२०१६

२) मा.स्थायी समिती सभा ठ.क्र. १५१०४ दि.११/०२/२०१६

मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती ठराव क्रमांक ४५ दि.०३/०२/२०१६ नुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिका नागरीक सार्वजनिक चॅरिटेबल ट्रस्ट, पिंपरी या ट्रस्टद्वारे हृदयरोग, कॅन्सर, किडनी, मेंदूचे आजार, दुर्धर आजार, गंभीर अपघातग्रस्त आणि दुर्धर आजारांनी ग्रासलेल्या रूग्णांना तसेच नैसर्गिक आपत्ती पिडीतांना मदत म्हणून महापालिकेकडून प्रतिवर्षी मिळणा-या र.रू.२५,००,०००/- या अनुदान रकमेतून अर्थसहाय्य केले जाते. शासन निर्णय क्र.पीसीसी ३००६/१९९७ प्र.क्र.३९७/नवि-२२ मंत्रालय, मुंबई ४०००३२ दि.१८/१२/२००७ अन्वये या ट्रस्टला दरवर्षी २५ लाख एवढे अनुदान देण्यास मान्यता दिलेली आहे. मा.महापौर तथा अध्यक्ष पिंपरी चिंचवड महानगरपालिका नागरीक सार्वजनिक चॅरिटेबल ट्रस्ट, पिंपरी, पुणे ४११०१८ यांनी दि.१२/१/२०१६ चे पत्रान्वये सन २०१५-२०१६ या आर्थिक वर्षातील र.रू.२५,००,०००/- ट्रस्टला मिळणेकामी मागणी केलेली आहे. सन २०१५-१६ या आर्थिक वर्षात पिंपरी चिंचवड महानगरपालिका नागरीक सार्वजनिक चॅरिटेबल ट्रस्ट या संस्थेस र.रू.२५ लाख अनुदान देणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा.सविता साळूंके -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

--------

**मा.सुजाता पालांडे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ५ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक - ५

दिनांक - २०/०२/२०१६ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ :- १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.पअक/२/कावि/०५/२०१६, दि.०६/०१/२०१६

२) मा.विधी समिती ठराव क्र. २८ दि.१५/०१/२०१६

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेसाठी घनकचरा व्यवस्थापन व हताळणी नियम २००० अंतर्गत उपविधी तयार करणे बाबत मा.तत्कालीन आयुक्त सो यांनी मा.अति. आयुक्त सो यांचे मार्गदर्शनाखाली करावयाच्या सुचना दिल्या होत्या त्यास अनुसरुन या क्षेत्रामधील तज्ञ तसेच विविध क्षेत्रामध्ये कार्यरत असलेल्या अनुभवी स्वंयसेवी संस्थेचे प्रतिनिधी (जनवानी परिसर, कागद काच पत्रा संघटना व संचालिका पर्यावरण प्रशिक्षण केंद्र इ.), मनपाचे अधिकारी यांचे सब ग्रुप तयार करणेत येऊन सदर सबग्रुपमार्फत तयार करणेत आलेल्या उपविधीच्या [Byelaws] च्या Pre Final Draft चे मा.अतिरिक्त आयुक्त सो यांचेकडे दिनांक ०३/०२/२०१४ रोजी सादरीकरण करणेत आले व यामध्ये मा.अतिरिक्त आयुक्त सो यांचे सुचनेनुसार आवश्यक ते बदल करणेत येऊन मा.आयुक्त सो यांचेकडे दिनांक १५/०९/२०१४ व दिनांक ०३/०२/२०१५ रोजी सादरीकरण करणेत आले. तसेच याबाबतचा उपविधी मसुदा [Draft Copy] महाराष्ट्र शासनाकडे माहितीकामी त्यांचे मागणीनुसार माहितीसाठी दिनांक १८/०२/२०१५ रोजी पाठविणेत आला आहे. घनकचरा व्यवस्थापन व हाताळणी नियम २००० अंतर्गत तयार करणेत आलेल्या उपविधी मसुदा मा.महापालिका सभेची मान्यता घेऊन अंतिम मंजुरीकामी तसेच अंमलबजावणी करणेकामी महाराष्ट्र शासनाची मंजूरी घेणे आवश्यक आहे. सद्यस्थितीमध्ये घनकचरा व्यवस्थापनासाठी तयार केलेला उपविधी मसुदा महाराष्ट्र शासनाकडील अंतिम मान्यता येईपर्यंत मा.मनपा सभेच्या मान्यतेने घनकचराव्यवस्थापन व हाताळणी नियम अंतर्गत "मनपाचे घनकचरा व्यवस्थापन धोरण" म्हणून राबविणे शक्य आहे. तसेच या धोरणांस मा.महापालिका सभेची मान्यता मिळालेनंतर हा मसुदा मान्यतेकामी महाराष्ट्र शासनाकडे पाठविणेत येईल व त्यास मंजुरी मिळालेनंतर मनपा कार्यक्षेत्रात घनकचरा व्यवस्थापनासाठी उपविधीची अंमलबजावणी करणेत येईल. सबब घनकचरा व्यवस्थापन व हाताळणी नियम २००० अंतर्गत या क्षेत्रातील अनुभवी व तज्ञ स्वंयसेवी संस्थांचे प्रतिनिधी व मनपाचे अधिकारी यांचे सबग्रुपच्या मदतीने तयार करणेत आलेल्या मनपाचे घनकचरा व्यवस्थापन उपविधीच्या मसुद्यास अंतिम मंजुरीकामी महाराष्ट्र शासनाकडे पाठविणेसाठी व महाराष्ट्र शासनाकडील मान्यता मिळेपर्यंत सदरचे घनकचरा व्यवस्थापन उपविधी मनपाचे घनकचरा व्यवस्थापन धोरण म्हणून राबविणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा.शुभांगी लोंढे -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

**मा.अजित गव्हाणे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ५ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा अशी सूचना मी मांडतो.

**मा.प्रभाकर वाघेरे -** मा.महापौर साहेब, सूचनेस अनुमोदन देतो.

यानंतर सूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक - ८२० विषय क्रमांक - ५

दिनांक - २०/०२/२०१६ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ :- १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.पअक/२/कावि/०५/२०१६, दि.०६/०१/२०१६

२) मा.विधी समिती ठराव क्र. २८ दि.१५/०१/२०१६

विषय क्रमांक ५ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

--------

**मा.शुभांगी लोंढे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ६ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक - ६

दिनांक - २०/०२/२०१६ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ :- १) मा.भारती फरांदे, मा.निलेश पांढरकर यांचा प्रस्ताव -

२) मा.विधी समिती ठराव क्र. ३९ दि.१५/०१/२०१६

सन १९८२ मध्ये ज्या गावांचा महापालिका हद्दीत समावेश झाला आहे अशा पवना नदीच्या पात्राचे दोन्ही बाजूकडील गावांकरिता व इंद्रायणी व मुळा नदीच्या पिंपरी चिंचवड हद्दीच्या भागाकरिता शासनाचे निर्देशानुसार मंजूर विकास योजनेतील नदीचे पात्रापासून ३० मी. हरित पट्टयातील नदीचे हद्दीपासून किमान (३० मी.अंतराचा हरित पट्टा सोडून) उर्वरित क्षेत्र रहिवास विभागात समाविष्ट करणेकामी फेरबदलाची कार्यवाही करणेस व तदनुषंगीक फेरबदलाची सर्व वैधानिक प्रक्रीया पुर्ण करुन फेरबदलाचा प्रस्ताव शासन मंजूरी पाठविणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा.सुजाता पालांडे -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

**मा.निलेश पांढरकर-** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ६ दप्तरी दाखल करणेत यावा अशी सूचना मी मांडतो.

**मा.राजेंद्र जगताप -** मा.महापौर साहेब, सूचनेस अनुमोदन देतो.

यानंतर सूचनेप्रमाणचा ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक - ८२१ विषय क्रमांक - ६

दिनांक - २०/०२/२०१६ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ :- १) मा.भारती फरांदे, मा.निलेश पांढरकर यांचा प्रस्ताव -
२) मा.विधी समिती ठराव क्र. ३९ दि.१५/०१/२०१६

विषय क्रमांक ६ दप्तरी दाखल करणेत येत आहे.

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

--------

**मा.सुजाता पालांडे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ७ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक - ८२२ विषय क्रमांक - ७

दिनांक - २०/०२/२०१६ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ: - १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र
क्र.नरवि/कावि/पिं.नि./९/९५२/२०१६, दि.०७/०१/२०१६
२) मा.शहर सुधारणा समिती ठराव क्र.४१ दि.१९/०१/२०१६

मौजे पिंपळे निलख भागाची विकास योजना महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, यांचेकडील अधिसुचना क्रं.टीपीएस-१८९३/१२७६/सी.आर-१७४/युडी-१३. दि.१८/०९/१९९५ अन्वये शासनाकडुन मंजुर करणेत आली आहे. सदर विकास योजनेनुसार मौजे पिंपळे निलख येथील स.नं. २७ व २८ मध्ये ४५.०० मी.रूंद रस्ता, २४.०० मी.रूंद रस्ता, आरक्षण क्र.३८८ व ३८९ शॉपिंग सेंटर व या शॉपिंग सेंटर आरक्षणा लगत १२.०० मी. रूंद रस्ता प्रस्तावित केलेला आहे.सद्यस्थितीमध्ये स.नं. २७ व २८ मधून जाणा-या नाशिक फाटा – वाकड या बीआरटीएस रस्त्याचे काम पुर्ण झालेले आहे.तसेच वाकड – वाय जंक्शन - औंध या २४.०० मी. रूंद रस्त्याचे कामही पुर्ण झाले आहे.सध्या सदर भागाचा विकास झपाट्याने होत आहे.सदर ठिकाणचे आरक्षण क्र.३८८ व ३८९ शॉपिंग सेंटर हे आरक्षण विकसित करणेकरीताही १२.०० मी.रस्त्याची अत्यंत आवश्यकता आहे.तसेच वाहतुकीच्या नियोजनाच्या दृष्टीने नाशिक फाटा – वाकड हा बीआरटीएस ४५.०० मी. रूंद रस्ता व वाकड – वाय जंक्शन - औंध या २४.०० मी. रूंद रस्ता हे दोन्ही रस्ते १२.०० मी.रूंद डी.पी. रस्त्याने जोडणे आवश्यक आहे. तसेच मा.नगरसदस्यांची वारंवार मागणी आहे की मौजे पिंपळे निलख येथील स.नं.२७ व २८ मधील १२.०० मी. रूंद रस्त्याची जागा लवकरात लवकर मनपाने ताब्यात घेऊन विकसित करावा म्हणजे ४५.०० मी. व २४.०० मी. रूंद रस्ते जोडले जाऊन वाहतुकीच्या दृष्टीने उपयुक्त

होईल.तसेच सदर रस्त्यालगत असणारे शॉपिंगसेंटरचे आरक्षणही विकसित करता येईल. तरी सदर रस्त्याचे जागेच्या भुसंपादनाचा प्रस्ताव तयार केलेला असुन सदर भुसंपादन प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी पुणे यांचेकडे पाठवावा लागणार आहे. सदर भुसंपादन प्रस्ताव पाठविणे कामी मा.शहर सुधारणा समितीमार्फत मा.महापालिका सभेची मान्यता आवश्यक आहे. केंद्र शासनाने "The Right to fair compensation and Transparency in land acquisition ,Rehabilitation Resettlement Act 2013" हा नविन भूसंपादन कायदा तयार केला असून दि.०१/०१/२०१४ पासुन सदरचा कायदा अंमलात आला आहे.तरी उपरोक्त प्रस्तावित आरक्षणाखालील जमिन महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२६ व नविन भूसंपादन कायदा अन्वये संपादन करणेकामी सदर आरक्षणाचा भूसंपादन प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी, पुणे यांचेकडे पाठविणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा.शुभांगी लोंढे -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

**मा.प्रशांत शितोळे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. मा.आयुक्त साहेबांनी हा विषय ठेवलेला आहे. पिंपळेनिलख हा आपल्या शहरातील जुन्या हद्दीचा भाग आहे. या शहरामध्ये आपण महानगरपालिकेचा डीपी रिव्हीजन करतो आहोत. अशाप्रकारचे विषय आपल्याकडे का येतात. हा विषय मा.जिल्हाधिकारी यांच्याकडे पाठवायचा आहे. नगररचना विभागाने मा.जिल्हाधिकारी यांना भूसंपादनाचे किती प्रस्ताव पाठविले आहेत आणि आज रोजी त्याची काय परिस्थिती आहे. मी स्वत: काही प्रस्ताव माझ्या हाताने तिथे सबमीट केलेले आहेत त्यातील दोन-तीन प्रस्ताव परत आले. काही दुस-यांदा परत पाठविले, काही तीन वेळा पाठविले जर अशी परिस्थिती असेलतर कशाला आपण पाठवितो. नगररचना विभागात एवढे काम आहे मग या कामाला कशाला वेळ घालविता. ते जर तुमच ऐकत नाहीत तर त्यांच त्यांना बघु दया. हे एक दिवसात करत नाहीत, हे तयार करण्यासाठी तुम्ही सहा महीने लावले असतील त्यामुळे संबंधीत विभागप्रमुखानी सांगावे की आपले मा.जिल्हाधिकारी यांच्याकडे भूसंपादनाकरीता गेलेले किती प्रस्ताव आहेत आणि ते प्रस्ताव अत्यावश्यक बाबी आहेत म्हणून आपण भूसंपादन करतो त्याची परिस्थिती काय आहे. भूसंपादनासाठी मा.जिल्हाधिकारी यांच्याकडे पाठविल्यानंतर काय प्रक्रीया आहे आणि आज रोजी किती पेन्डींग आहेत याची माहिती दयावी.

**मा.प्रशांत ठाकूर (उपसंचालक नगररचना)** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. मा.नगरसदस्यांनी विचारलेल्या प्रश्नाचा खुलासा करतो की, हा जो प्रस्ताव आम्ही सादर केलेला आहे तो महासभेची मान्यता भूसंपादन प्रस्तावाला जी कायदयानुसार लागते त्या अनुषंगाने सादर केलेला आहे. यापुर्वी महानगरपालिकेनी भूसंपादनाचे अनेक प्रस्ताव महापालिकेनी मा.जिल्हाधिकारी कार्यालयाला सादर केलेले आहेत ते प्रस्ताव किती आहेत

त्याची आकडेवारी आता उपलब्ध नाही. त्याची आकडेवारी काढून सन्मा.सदस्यांना उपलब्ध करुन देण्यात येईल.

**मा.प्रशांत शितोळे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. हे येण्या अगोदरची परिस्थिती आहे. भूसंपादनाचा जेव्हा केंद्रशासनाने आणि राज्यशासनाने मध्यंतरी जो कायदा पारीत केला त्या कायदयानुसार बदल अपेक्षीत जे होते तो गोंधळाचा निर्णय आपल्यासाठीच नाही सगळी कडेच होते पण आपल्या विभागाला नगररचनेला भूसंपादन जागा करावी लागणार आहे. त्याच्याबरोबर आपल्या महापालिकेच्या हद्दीतील डीपी रिव्हीजन आलेले आहे भूसंपादन करताना आपल्याला प्रायोरीटी ठरवता येत नाही. माझ स्वतःच उदाहरण मी सांगतो मी एका छोटयाशा रस्त्यासाठी स्वतः फाईल सबमीट केली. मी मा.जिल्हाधिकारी यांना भेटलो, आपले प्रांत जे आहेत त्यांना जाऊन भेटलो. जर अशी काम होणार नसतीलतर तुम्ही आमची मान्यता कशाला घेता. आमचे म्हणणे असे आहे की ते तुम्ही किती दिवसात आणणार आहेत. तुम्ही घाईने आमच्याकडे आणला आहे. मा.महापौर साहेब, हा महत्वाचा रस्ता वाकड-नाशिक फाटा बीआरटी रस्ता आहे. टाईमबॉण्ड सांगावे. आम्ही मंजूरी दिल्यानंतर तुम्ही मा.जिल्हाधिकारी यांच्याकडे प्रस्ताव कधी पाठविणार, आणि त्याची मान्यता कधी येणार.

**मा.प्रशांत ठाकूर (उपसंचालक नगररचना)** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. आम्ही प्रस्ताव तातडीने मा.जिल्हाधिकारी यांच्याकडे सादर करणार, मान्यता कधी येणार हे सांगता येणार नाही. केंद्रशासनाकडे कायदयात बदल झालेला आहे. भुसंपादन ऍक्ट हा शंभर वर्षापुर्वीचा असतो. त्यामध्ये २०१३ साली नवीन कायदा संमत झालेला आहे. नवीन कायदा संमत झाल्यानंतर केंद्राच्या गाईडलाईन प्रमाणे काय प्रोसीजर असावी ही कार्यप्रणाली मा.जिल्हाधिकारी कार्यालय स्तरावर किंवा शासनस्तरावर अंतीम न झालेली असल्यामुळे हा विलंब आहे. आपल्याला प्रस्ताव पाठविणे आवश्यक आहे. आमच्या हातातील ही गोष्ट नाही.

**मा.प्रशांत शितोळे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. उदया डीपी रिव्हीजन पाठवले त्याच्यामध्ये सजेशन ऑब्जेक्शन आले आणि त्याला तुम्ही मान्यता दिली आणि त्या रस्त्याला डिलेट करायचे तर मग काय करणार.

**मा.प्रशांत ठाकूर (उपसंचालक नगररचना)** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. सद्यस्थितीमध्ये हा रस्ता महत्वाचा आहे.

**मा.प्रशांत शितोळे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. जर रस्ता महत्वाचा असेलतर किती दिवसात घेवून येणार.

**मा.प्रशांत ठाकूर (उपसंचालक नगररचना)** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. मा.जिल्हाधिकारी कार्यालयाकडे गेल्यानंतर एखादयावेळेस भूसंपादनाचा प्रस्ताव सुरु झाला म्हणून जागामालक आपल्याकडे टिडीआर किंवा एफएसआय या संदर्भामध्ये आपल्याकडे

ॲप्रोच होतात असा आपला अनुभव आहे त्यामुळे कदाचित मा.जिल्हाधिकारी यांच्या कार्यवाहीची आवश्यकता आपल्याला पडणारही नाही. हे जागामालक आपल्याकडे आले असतेतर कदाचित हा प्रस्ताव आपण केला नसता. आपल्याला रिस्पॉन्स ते देत नसल्यामुळे आपण प्रस्ताव पाठवतो.

**मा.प्रशांत शितोळे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. तुमचा डीपी रिव्हीजन पब्लिश होणार आहे, हे होत असताना दरम्यानच्या काळात हा नाही आला आणि याच्यावर सजेशन ऑब्जेक्शन आले आणि ते ग्राहय झाले त्याच्यानंतर काय करणार हा तांत्रिक मुद्दा आहे.

**मा.प्रशांत ठाकूर (उपसंचालक नगररचना)** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. कनेक्टिव्हीटी विचारात घेता आपण म्हणता तस होणार नाही. हा रस्ता आवश्यक आहे. तुमचा प्रस्ताव आम्ही दोन-तीन वेळेस पाठविला आहे.

**मा.प्रशांत शितोळे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. अमलबजावणी कशी करायची याच्या गाईडलाईन्स नाहीत. या कारणास्तव थांबाव लागेल. डीपी रिव्हिजनमध्ये जे भूसंपादनाचेसाठी प्रलंबीत प्रकरण शासनाकडे किंवा मा. जिल्हाधिकारी यांच्याकडे आहेत त्यांच्या बाबतीत एखाद सजेशन ऑब्जेक्शन झालेतर काय करणार आहेत. कोर्टमॅटर झालतर काय करणार त्या शेतक-यांनी व त्या जागामालकांनी स्वतःहून जागा दिली पाहीजे त्यांना लवकरात लवकर मोबदला पाहीजे.

**मा.प्रशांत ठाकूर (उपसंचालक नगररचना)** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. दोन ते सव्वादोन पट टीडीआर आपण देतो त्यामुळे ते जागामालक आपल्याकडे ॲप्रोच होतील. भूसंपादनाची रक्कम एखादयावेळेस कमी वाटेल ते जागामालक आलेतर चांगली गोष्ट आहे. अनेकदा असंही होत एखाद प्रकरण गेल भूसंपादनाची कार्यवाही मा.जिल्हाधिका-यांकडे पुर्ण केलीतर त्यातील बरेचसे ८० टक्के लोक आपल्याला टिडीआर दया म्हणून ॲप्रोच होतात त्यातून निवाडयातून ही जागा आपण वगळतोत.

**मा.प्रशांत शितोळे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. तुम्हांला आवश्यक पाहीजे असतीलतर ब्लँकेट परमीशन घेता येत नाही का.

**मा.प्रशांत ठाकूर (उपसंचालक नगररचना)** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. मध्यंतरी एक दोन कोर्टकेस अशा झाल्या त्यावेळेस आपण स्थायी समितीची मान्यता घेवून निवाडा करत होतो. हायकोर्टाने सांगीतल की स्थायी समितीची मान्यता घेणे चुक आहे, योग्य नाही त्याच्यामुळे कोर्टात प्रॉब्लेम निर्माण झाला त्यामुळे आम्ही कायदासल्लागाराच मत घेवून ब्लँकेट परमीशनचा प्रस्ताव आपण नवीन सादर करणार आहोत.

**मा.प्रशांत शितोळे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. प्रस्तावाला विरोध नाही, आपण लेन्दी कामकाज करतो. आपणही डेव्हलप झाल पाहीजे आपला स्पिड वाढला पाहीजे.

**मा.प्रशांत ठाकूर (उपसंचालक नगररचना)** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. हायकोर्टात प्रॉब्लेम निर्माण झाल्यामुळे कायदेशीर सल्ला घेवून तो निर्णय घेतो.

**मा.प्रशांत शितोळे** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. सगळ मान्य आहे, कोर्टाच्या निर्णयानुसार तुम्ही ते जीबीलाच मान्यतेला ठेवल पाहीजे याला मान्यता दिल्यानंतर टाईमबॉण्ड ठेवावा सहा महीन्यात, वर्षभरात ते आले पाहीजे. तुमचे डीपी रिव्हीजन आलेतरी सुध्दा तुमचे प्रस्ताव धुळखात पडून असतीलतर काय उपयोग आहे. उदयाच्या काळात एखादा नागरीक कोर्टात गेला, डीपी रिव्हीजन आलं आणि माझे आता भूसंपादनाच काढले म्हणालातर त्याचा कोर्ट पण कुठेतरी विचार करेलना. वीस वर्षात डीपी विकसीत केला नाही आणि आता आलेतर त्याच्यावर ताशेरे कोणावर ओढणार.

**मा.प्रशांत ठाकूर (उपसंचालक नगररचना)** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. अर्जन्सी क्लॉजमध्ये आपल्याला तातडीने कार्यवाही करता येईल.

**मा.प्रशांत शितोळे** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. अर्जन्सी क्लॉज करा. आमच तेच म्हणणं आहे की तुम्ही ज्यावेळेस येथे मान्यता घेता तेव्हा टाईमबॉण्ड ठेवावा. तुम्ही काय करता मान्यता घेताना सहा महीने तुमच्याकडे, सातव्या महीन्यात कलेक्टरकडे त्यांच्याकडून वर्षभर एक-एका टेबलवरुन हालत नाही. कार्यालयाकडे दोन-तीन वर्षे असेच जातात. भूसंपादन अधिकारी यांचा अनुभव आलेला असेल. ते त्या जागेवर भेटत नाहीत त्यामुळे हा टाईमबाँड कार्यक्रम ठेवावा. भूसंपादन अधिका-यांना आपल्या शहरासाठी दिलेले आहे. त्यांना लिमीटेड ऐरीया आहे. गट क्रमांक १,२,३ जे काही दिलेले आहेत. त्याना प्रत्येक प्रकरणाचा चार्ट दिला पाहिजे तर त्या कामाला तुम्हांला यश येईल. तुम्हांला जर अजून स्पीड पाहीजे असेलतर टाईमबॉण्ड कार्यक्रम दिला पाहीजे. ब्लँकेट परमीशनला येत असताना भुसंपादनाचा कलेक्टरचा टाईमबॉण्ड, तुमचा टाईमबॉण्ड आणि आपल्या परिसराला जे भूसंपादन अधिकारी असतील त्यांचा टाईमबॉण्ड आमच्या समोर पाहीजे त्याला त्याला मान्यता देणार. तुम्ही आल्यानंतर दहा-दहा वर्षे ते डेव्हलप करत बसणार ते चालणार नाही. आम्हांला प्रत्येकाला आमच्या आमच्या परिसरातील विकासाची घाई आहे. मला वाटत माझ्या परिसरातील सगळी आरक्षण विकसीत झाली पाहीजेत. त्यासाठी जागामालक जर जागा देत नसेलतर भूसंपादनाचा वापर आम्ही करु. तुमच्या या स्किम जरी चांगल्या असल्यातरी एखादा मालक येईलच असे काही नाही. त्यासाठी भूसंपादनाची प्रोसेस फास्ट झाले पाहीजे. भूसंपादन टाळावे म्हणून डबल टिडीआर काढला असाच त्याचा अर्थ होतो. माझ म्हणण

एकच आहे की जी काय प्रोसेस असेल ती फास्ट करा. जी प्रलंबीत प्रकरण आहेत ती मार्गी लावण्याचा प्रयत्न करा असे या अनुषंगाने तुम्हांला सांगतो

**मा.रामदास बोकड -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. मला जे काही बोलायच होत ते आमचे सहकारी प्रशांत शितोळे बरचस काही बोलले. मा.महापौर साहेब, आपल्याला अवर्जून सांगायच आहे की आपण गेल्या पंचवार्षीकला ज्या परिसरातल नेतृत्व केले त्या प्रभागाची दोन आरक्षण क्र. ३५५, ३५६. ते १९९४ ला आरक्षण पडले. प्रशासन काय करते सभागृहाने याचा विचार करावा. हे प्रशासन शहरासाठी खरेच काम करते का. २०१२ सालामध्ये मी या सभागृहात आलो. गेल्या चार वर्षात टावूनप्लॅनींगकडे रोज या पालिकेत आल्यानंतर आरक्षणासंदर्भात मी रोज बोललो. कितीतरी अधिकारी आले, कितीतरी अधिकारी लोक बदलून गेलेतरी त्यांनी त्यांची भूमीका तशीच ठेवली. या प्रशासनाने कोर्टाचा अवमान केला. मीतर प्रशासनावर आरोप करतो एका बाजूने नागरीकांना सांगायचे की कोर्टाचा निर्णय आहे की तुमच्या गावावर बुलडोझर फिरला पाहीजे. मग जर कोर्टाचा निर्णय आरक्षण ताब्यात घेण्यासाठी असेलतर त्याठिकाणी काय झाले. अधि-यांना काही मिळाले असा प्रश्न मला निर्माण होतो. नगरसदस्य या नात्याने ते आरक्षण ताब्यात घेण्याची मागणी असताना विकसीत करण्याची मागणी असताना प्रशासनाने त्याला साथ दिलेली नाही. आरक्षणाचा एक एक टप्पा त्याठिकाणी बजेट वापरलेल आहे, एक एक टप्पा कामाचा झालेला आहे. निव्वळ फक्त नगररचना विभागामुळे ही आरक्षण ताब्यात येत नाहीत. मालक दयायला तयार आहेत पण प्रशासनाला वाटत नाही की हे आरक्षण ताब्यात घ्यावे. मग तीथ प्रशासनाची काहीतरी इमारत करा, राहू दया नागरीकांच बाजूला गार्डन बाजूला राहू दया, शहर बाजूला राहू दया आणि अधिका-यांना बसण्यासाठी करा, नसेल आरक्षण ताब्यात घ्यायचतर. आमचे घसे कोरडे झालेले आहेत चार वर्षात. टाऊनप्लॅनिंगला सांगतो डीपी येणारा डिक्लेअर होणार आहे ही दोन आरक्षणे नगररचना त्यांचा भूसंपादनाचा प्रस्ताव कधी ठेवणार आणि किती वेळेत ते आरक्षण ताब्यात घेणार. फाईल जर सबमीट केल्यातर अधिका-यांचे उत्तर तांत्रीक अडचण सांगायची आणि वेळ मारुन न्यायची. समोरचा आरक्षण देत असेलतर महापालिका आरक्षण ताब्यात का घेत नाही याचा खुलासा करावा. लोक आरक्षण देण्यासाठी तयार आहेत परंतु महापालिका आरक्षण ताब्यात घ्यायला तयार नाही याचा खुलासा करावा. पत्रव्यवहार झाला, सगळे झाले, कोर्टाचा आदेश आहे असे असताना त्याच्यावर कारवाई का होत नाही.

**मा.आरती चौंधे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. विशालनगर, पिंपळेनिलख याठिकाणी शॉपींगसेंटरचे आरक्षण आहे. आरक्षणाची प्रभागाच्या विकासासाठी आवश्यकता आहे. आताच प्रशांत शितोळे यांनी सांगीतल की, विषय आल्यानंतर बरेच दिवस लागतात तसे न करता लवकरात लवकर याच्यावर कारवाई व्हावी आणि हा विषय मंजूर करावा.

**मा.अजित गव्हाणे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. भूसंपादनाच्या विषयी प्रशांत शितोळे यांनी अपेक्षा व्यक्त केली. प्रशासनाला वाटले आणि भुसंपादनाचा विषय आणला. परंतु असे अनेक विषय असतात जे नगरसेवकांना, नागरीकांना वाटत असते हा विषय अत्यंत महत्वाचा आहे. उदा. आमच्या भोसरी आणि दिघी. त्यात भोसरीचा डीपी कधी झाला. महापालिकेमध्ये कधी आल आणि दिघी कधी आल. भोसरीचा आणि दिघीचा डीपी होत असताना हे दोन डीपी होत असताना ज्याठिकाणी रस्ता अपेक्षीत असताना त्याठिकाणी रस्ता नाही. भोसरीच्याही डीपीमध्ये रस्ता नाही आणि दिघीच्याही डीपीमध्ये रस्ता नाही. तो रस्ता करण्याची मागणी अनेक वर्षाची आहे. त्याठिकाणी तो रस्ता आपण आता २०५ खाली घोषीत केलेला आहे. आम्ही पाठपुरावा वारंवार करतो. दिघीचे नगरसेवक पण पाठपुरवा करतात. भोसरीमध्ये सगळयात जास्त ट्रॅफीक जाम होते. आमच्या येथे जास्तीत जास्त मंगलकार्यालये आहेत. हा रस्ता करणे अत्यंत गरजेचे आहे. भोसरी-दिघी रोड म्हणतात तो रोड होणे अत्यंत गरजेचे आहे. त्याचा २०५ खाली आपण घोषीत केलेले आहे. त्याची सुनावणी होणे गरजेचे आहे. जर जागा मालक ताब्यात देत नसेलतर त्याचे भूसंपादन झाले पाहीजे. परंतु इतके वर्षे होवून सुध्दा ते काम होत नाही अत्यंत महत्वाचा विषय असताना त्याच्याकडे दुर्लक्ष केले जाते प्रशांत शितोळे यांनी जी खंत व्यक्त केली तीच खंतर माझ्या सारख्या सर्व नगरसेवकांची आहे. प्रशासनाला जे वाटते तेच प्राधान्याने तुम्ही करता. परंतु नागरीकांच्या आणि आमच्या ज्या मागण्या आहेत त्या मागण्या आम्ही आयुक्त साहेबांकडे सुध्दा अनेकवेळा हा विषय मांडलेला आहे, आयुक्तांनी व्हिजीट केली, तुम्ही व्हिजीट केली, तुमच्या अगोदर भदाणे मॅडम होत्या त्यांनीही व्हिजीट केली. त्याठिकाणी जागामालकानी त्याचा मोबदल्याचा विषय होता, त्याचा टिडीआर अपेक्षीत होता. त्यावेळेस २०५ खाली जो रस्ता आहे त्याला टिडीआर देता येत नव्हता त्याला तुम्ही दुसरा काहीतरी मार्ग काढावा म्हणून आम्ही अनेकवेळा सांगीतलं की तुम्ही शेतकऱ्यांची, जागामालकांची मिटींग बोलवा त्यांची अडचण काय आहे ती समजावून घ्यावी त्याची अंमलबजावणी करावी परंतु तसे होत नाही. दरवर्षी बजेटमध्ये रस्त्याला प्रोव्हीजन करतो परंतु प्रत्यक्षात तो रस्ता होतच नाही ती तरतूद लॅप्स होते. आता सुध्दा या बजेटमध्ये आम्ही त्याला प्रोव्हीजन केलेली आहे. आमची अशी अपेक्षा आहे की किमान आतातरी तुम्ही लक्ष घालावे. ज्या चुका झाल्या त्या मान्य आहेत, तुमच्या डीपी रिव्हिजनला आम्ही मान्यता दिलेली आहे परंतु त्याला किती कालावधी लागेल हे माहिती नाही. परंतु आज त्या परिसरातील वाहतूक पाहीलीतर त्याठिकाणी लग्न असेलतर तासनंतास लोक तिथं अडकून पडतात त्यामुळे अनेक अपघात सुध्दा होत असतात. पर्यायी रस्ते जोपर्यंत होत नाही तोपर्यंत ही वाहतूकीची व्यवस्था सुरळीत होणार नाही. भोसरी आणि दिघीच्या नागरीकांच्या दृष्टिने अत्यंत महत्वाचा विषय आहे. त्याच्यामध्ये २०५ खाली काही लोकांनी ऑब्जेक्शन घेतले त्याची सुनावणी ताबडतोब

करावी. ते लांबू नका टाईमबॉण्ड दयावा. किती दिवसही काम चालू असते तसे होवू नये काही काम नागरीकांच्या दृष्टीने महत्वाचे असतात ती केली पाहीजेत. त्यादृष्टिने किमान एक महीनाभरात हा रस्ता ताब्यात येवून त्या जागामालकाला काहीतरी मोबदला मग तो टिडीआरच्या स्वरुपात असेल किंवा एफएसआयच्या स्वरुपात असेल किंवा भूसंपादनाच्या स्वरुपात असेल तो त्यांना मोबदला दयावा आणि आमचा जो रस्ता आहे तो ताबडतोब करावा, असे अनेक रस्ते आहेत. तरी हे उदाहरण सांगीतले आहे. पिंपरी चिंचवड शहरात असे अनेक रस्ते आहेत. नगरसेवक आणि नागरीक मागणी करतात की रस्ते झाले पाहीजेत. आरक्षण ताब्यात आले पाहीजे. जागामालक ताब्यात देत नाहीत. आता सुदैवाने टिडीआरचा जो कायदा आलेला आहे, तो जागामालकाच्या ब-यापैकी हिताचा आहे. त्याच्यामध्ये आपण लक्ष घातलेतर अनेक रिझर्व्हेशन, अनेक रोड आपल्या ताब्यात येतील आणि डीपी प्लॅनची ख-या अर्थाने आपल्याला अंमलबजावणी करता येईल. जो नव्याने भाग आपल्या महापालिकेत आलेला आहे त्या भागातील अनेक आरक्षण आणि रस्ते आपल्याला डेव्हलप करायचे आहेत. नगररचना विभागानी तुमच्याकडे कोणी आले की त्यांचे काम करतात. काही गोष्टी अशा कराव्यात की त्या तुम्ही स्वतःहून माग लागून त्या नागरीकांकडे बसून त्या केल्या गेल्या पाहीजेत. प्राधान्याने त्या गोष्टी केल्या पाहीजेत. तुम्ही असे ठरवा की या प्रभागातील एवढी आरक्षण ताब्यात घ्यायचे असे ठरवा आणि त्याप्रमाणे तुमच्या स्टाफला सुध्दा काम करण्यास सांगावे. नगररचनेच्या कामासंदर्भात अनेक लोकांच्या तक्रारी आहेत याची जाणीव आपल्याला पण आहे. मुळात तुमच्याकडचे नकाशे मॅच होत नाहीत त्याच्यामुळे लोक जागा ताब्यात देण्यासाठी हेलपाटे मारुन दमतात परंतु त्यांची जागा ताब्यात घेतली जात नाही. त्यांना अनेक अडचणीला सामोरे जाव लागतं. यात सुध्दा ठाकूर साहेब आपण लक्ष घालावे, दुरुस्ती करावी. आपले मोनार्चचे नकाशे वेगळे, आपल्या महापालिकेचे नकाशे वेगळे, सिटीसर्व्हेचे नकाशे वेगळे असतात त्यामुळे तो माणूस हेलपाटे मारुन मारुन दमुन जातो. याच्यामध्ये लक्ष घालावे आणि याच्यावर टाईमबॉण्ड ठेवावा आणि वेळेत काम पुर्ण व्हावे. एक महीन्यात दिघी आणि भोसरीचा सिमेवरील जो रस्ता आहे ते काम चालू व्हावे अशी अपेक्षा व्यक्त करतो.

**मा.संजय काटे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. आताच प्रशांत शितोळे आणि अजीत गव्हाणे यांनी जो भूसंपादनाचा मुद्दा उपस्थित केला तो खरोखरच रास्त आहे. शहरातील विकास पुर्णपणे थांबलेला आहे. आपल्या नगररचना विभागाकडून योग्य प्रतिसाद मिळत नाही. बोपखेल गावातील खेळाच्या मैदानाचे आरक्षण ज्याठिकाणी होतं ते आरक्षण स्थलांतरीत केले गेले. सन्मा. जमिनमालकाच्या सांगण्यावरुन सेम सर्व्हे नंबर सेम ओनर हे नियमात बसून केलं परंतु ते स्थलांतरीत केल्यानंतर स्थलांतरीत जागेचा ताबा देतो असं त्यांनी सांगीतल होतं. परंतु आज चार वर्षे झाले मी पाठपुरावा करतो तो माणूस जागेचा

ताबा दयायला तयार नाही. का तर त्यांना पुर्ण मोबदला मिळत नाही. ती जागा आता ब्ल्यू लाईनच्या आतमध्ये येते. जुलै २०१२ ला पत्र दिलेल आहे की त्यांचा मोबदला पुर्ण मिळत नसेलतर ते आरक्षण पुन्हा जिथ होत तिथ आणून ठेवा त्यांच्या सोईसाठी आपण आरक्षण बदलायच आणि नंतर त्यांनी म्हणायच की त्या जागेचा मोबदला मिळणार नाही, आम्ही ताबा देवू शकत नाही, ते टाळाटाळ करतात. आज चार वर्षे झाले बोपखेल गाव प्लेग्राऊंड पासून वंचीत आहे. अशा पध्दतीने चुकीचे आपण काम करणार असालतर आणि नगररचना विभागाची मोठी चूक अशी आहे मी त्यावेळेला पत्रव्यवहार केला की आरक्षण पुन्हा स्थलांतरीत करुन ज्याठिकाणी आहे त्याठिकाणी आणा त्यावेळेस त्यांनी मला लेखी उत्तर दिले की आम्ही त्या जागेची संपादनाची कार्यवाही सुरु केलेली आहे आणि तसा प्रस्ताव भूसंपादन ऑफीसला पाठविलेला आहे. पण जे आरक्षण डीपीमध्येच नाही ते आपण स्थलांतरीत केलेले आहे अशा ठिकाणच भूसंपादन करता येते का हा माझा प्रश्न आहे आणि याच उत्तर मला दयाव. की स्थलांतरीत जागेच तुम्ही भूसंपादन करु शकता का. त्याचप्रमाणे बोपखेल याठिकाणी एसटीपी प्लॅन्ट नाही त्याच्या जागेची सुध्दा अडचण तीच आहे. आपण एकीकडे बेस्ट सिटीच ऍवॉर्ड घेतो आणि शंभर टक्के बोपखेल गावातील मैलापाणी, सांडपाणी शंभर टक्के नदीला सोडतो. आपले पर्यावरणाचे लोक काय करतात हे माहीत नाही. त्याच्यातही उदासीनता आपल्या नगररचना विभागाने दाखवलेली आहे. ज्या जागेचे आरक्षण स्थलांतरीत केलेले आहे त्याचे भुसंपादन करता येते का, करता येत असेलतर मान्य आहे परंतु नसेल करता येत तर मला तसं लेखी उत्तर का दिले. तसे असेलतर महापालिकेच्या विरोधात कोर्टात मी का जाऊ नये याचा खुलासा व्हावा एवढीच विनंती करतो, धन्यवाद.

**मा.सुरेश म्हेत्रे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. टाऊन प्लॅनींग विभागासाठी टाईमबॉण्ड आवश्यक आहे. स्पाईन रस्त्यातील १८ घर पाडलेली आहेत तीन वर्षे झाले, सहा महीन्यात त्यांना भरपाई देऊ, भूसंपादनातील प्रस्ताव त्यांच्याकड पाठवला असं मी तीन वर्षे झाले ऐकतो. ज्यांचे घर पाडली ते आठ ते दहा हजार भाडे भरुन तीन वर्षे झाले भाडयाने राहतात. तीन-तीन लाख त्या लोकांचे भाडयापोटी गेले आहेत. त्यांना भूखंड दयायचा विषय झालातरी भूसंपादनाचे पैसे येणे गरजेचे आहे, त्याबद्दल काय केले म्हणून टाईमबॉण्ड हा अत्यंत महत्वाचा आहे, धन्यवाद.

**मा.प्रशांत ठाकूर (उपसंचालक नगररचना)** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. मा.रामदास बोकड व मा. संजय काटे यांनी प्रश्न उपस्थित केला त्याबद्दल खुलासा करतो. बोकड साहेबांच्या वॉर्डतले दोन आरक्षण आहेत. सीपीजी आणि स्कुल रिझर्व्हेशन. या दोन्ही आरक्षणाच्या जागेवर मी त्यांच्यासोबत जाऊन साईड इन्स्पेक्शन केलेले आहे. भूसंपादनाची प्रक्रीया जी आहे त्यावर त्यांच्याशी सविस्तर चर्चाही केलेली आहे त्यासंदर्भात जागामालक, सन्मा. सदस्य यांची बैठक आपण लवकरच पुढच्या आठवडयात आयोजीत करु. लवकरात

लवकर आपल्याला काय कारवाई करता येईल त्यादृष्टिने प्रयत्न करण्यात येतील. सन्मा.काटे यांनी प्रश्न उपस्थित केला. प्लेग्राऊंडचे आरक्षण मा.आयुक्त साहेब यांच्या अधिकारामध्ये आपण त्याच स्थान बदल केलेले आहे. स्थानबदल मा.आयुक्तांच्या अधिकारात केलेल आहे त्यामुळे ते डीपीचच रिझर्व्हेशन असल्यामुळे त्याचे भूसंपादन करण्यास आपल्याकडे अडचण नाही, भूसंपादन होवू शकेल.

**मा.रामदास बोकड -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. टाईमबॉण्ड सांगावा.

**मा.प्रशांत ठाकूर (उपसंचालक नगररचना)** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. आपण याबाबतीत बैठक घेवून त्यात आपण सविस्तर चर्चा करु.

**मा.रामदास बोकड -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. चार वर्षात बैठक झालेली नाही, भूसंपादन झालेले नाही. शहर सुधारणा समितीकडे एका आरक्षणाचा ठराव केलेला आहे, दोन आरक्षणाचा ठराव का केलेला नाही. दोन्ही आरक्षण सेम १९९४ चे आहेत आणि त्यांचा कालावधी सेम आहे. दोन्ही भूसंपादन का ठेवलेले नाही.

**मा.प्रशांत ठाकूर (उपसंचालक नगररचना)** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. दुसरे आरक्षण ब्ल्यू लाईनमध्ये टीडीआर बद्दल अडचण होती आता शासनाचा नवीन जीआर आलेला आहे, ब्ल्यू लाईनचा प्रश्नही मिटलेला आहे.

**मा.रामदास बोकड -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. भोसरीच्या बाबतीत टावूनप्लॅनींगला आम्ही मदत केली. पन्नास लोकांच खाजगी वाटाघाटीने मोबदला देवून, ताबा घेवून तो रस्ता केला आणि मा.पवार साहेबांच्या वाढदिवसाला आपण उद्घाटन केल. तुम्ही तेवढच काम करता बाकीच का करत नाहीत. याच्यावर कारवाई का केलेली नाही. तुम्ही फक्त तेवढेच आरक्षण का गृहीत धरले, बाकीचे आरक्षण तुम्ही का गृहीत धरले नाही. याच्यावर कारवाई केली असतीतर ती आता ताब्यात आली असती.

**मा.प्रशांत ठाकूर (उपसंचालक नगररचना)** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. येथून पुढे तातडीने कारवाई करण्याची दक्षता घेऊ.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता–

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

--------

**मा.निलेश पांढरकर -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ८ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडतो.

विषय क्रमांक - ८

दिनांक - २०/०२/२०१६ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ : - १) विषय क्र.२ अन्वये मा.आरती चोंधे, मा.अमिना पानसरे यांचा प्रस्ताव

२) प्रशासन अधिकारी तथा सचिव अ क्षेत्रीय कार्यालय यांचे जा.क्र.अक्षेका/११/कावि/२०/२०१६, दि.१६/०१/२०१६

३) विषय क्र.३ अन्वये अ प्रभाग समिती सभा ठराव क्रमांक ५० दिनांक १३/०१/२०१६

४) मा.शहर सुधारणा समिती ठराव क्र.४४ दि.०४/०२/२०१६

पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील मौजे आकुर्डी मंजूर विकास योजना आराखडयात स.नं.१७९ पैकी मध्ये आरक्षण क्र.२७३ हे प्राथमिक शाळा आरक्षण असून आरक्षणातील क्षेत्रामध्ये सुमारे ४०० कुटुंबे राहतात. या आरक्षणामधील जागेत आरक्षण मंजूर होण्याअगोदर पासून घरे आहेत. तसेच या आरक्षणाचे आजूबाजूला म्हणजेच अर्धा ते एक किलोमीटरचे अंतरावर १३ ते १४ शाळा आहेत व महानगरपालिकेची श्री.वसंतदादा पाटील माध्यमिक विद्यालय हे या प्रभागात आहे. त्यामुळे मंजूर विकास योजनेतील सनं.१७९ पैकी मधील आरक्षण क्र. २७३ ची आवश्यकता नाही. म्हणून मंजूर विकास योजनेतील सनं.१७९ पैकी मधील आरक्षण क्रमांक २७३ महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये रद्द करुन सदर आरक्षणातील क्षेत्र रहिवासी विभागात समाविष्ट करणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा.राजेंद्र जगताप -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

**मा.शुभांगी लोंढे -** मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडते पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील मौजे पिंपरी मंजूर विकास योजना आराखडयात सनं. ३११ पैकी मध्ये आरक्षण क्र. १७४ हे प्राथमिक शाळा आरक्षण असून आरक्षणातील क्षेत्रामध्ये सुमारे ४०० कुटूंबे राहतात. या आरक्षणामधील जागेत आरक्षण मंजूर होण्या आगोदर पासून घरे आहेत. तसेच या आरक्षणाचे आजूबाजूला म्हणजेच अर्धा ते एक किलोमीटरचे अंतरावर १३ ते १४ शाळा आहेत व मनपाच्याही शाळा हया प्रभागात आहेत. त्यामुळे मंजूर विकास योजनेतील स.नं.३११ पैकी मधील आरक्षण क्र. १७४ ची आवश्यकता नाही. म्हणून मंजूर विकास योजनेतील स.नं. ३११ पैकी मधील आरक्षण क्र. १७४ महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये रद्द करुन सदर आरक्षणातील क्षेत्र रहिवासी विभागात समाविष्ट करणेस मान्यता देणेत यावी.

**मा.सविता साळुंके -** मा.महापौर साहेब, उपसूचनेस मी अनुमोदन देते.

**मा.धनंजय आल्हाट -** मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो- मौजे-मोशी येथील मंजूर विकास आराखडयात ९० मी. रस्त्यालगत १०० मी.अंतरावर दक्षिण बाजूचे अस्तित्वातील रस्त्याला ४५ मी. रस्तारुंदी (भोसरी हद्दीलगत) दर्शविणेत आलेली आहे. दोन्ही रस्ते लगत असल्यामुळे विकसित करणेस अडचणी व नियोजन करता येणार नाही. नवनगर विकास प्राधिकरण हद्दीत स्पाईन रस्त्याची रुंदी ७५ मी. आहे. नवनगर विकास प्राधिकरण हद्दीतून येणारा (स्पाईन रस्ता) ७५ मी. रस्ता व मोशी हद्दीतील ९० मी.रस्ता हे देखील समोरासमोर येत नाहीत. तसेच ते नियोजनाच्या दृष्टिकोनातून देखील योग्य होणार नाही. त्यामुळे मंजूर विकास आराखडयातील ९० मी. रस्त्यातील उत्तर दिशेकडून कमी करुन ४५.०० मी.दक्षिण दिशेस कायम करणेत यावा. प्रस्तावित करावयाच्या ४५.०० मी. रस्त्याची रुंदी नाशिक महामार्ग रस्त्यापासून मौजे- चोविसावाडी हद्दीपर्यंत ४५.०० मी. रस्त्याची रुंदी निश्चित करावी. तरी प्रस्तावित करावयाच्या रस्त्याची आखणी म.प्रा.न.र. अधिनियम १९६६ चेकलम ३७ अन्वये फेर बदलाची कार्यवाही करणेस मान्यता देणेत यावी.

**मा.सुलभा उबाळे -** मा.महापौर साहेब, उपसूचनेस मी अनुमोदन देते.

**मा.निता पाडाळे-** मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडते- प्रभाग क्र. ४७ काळेवाडी येथील मंजूर विकास योजना आराखडयातील १) सं.नं.७५ आरक्षण क्र. ६४४ (प्राथमिक शाळेचे आरक्षण) हे आरक्षण असून त्या क्षेत्रामध्ये २०० कुटूंबे राहतात व ही कुटूंबे आरक्षण पडण्याच्या अगोदर पासून आहे. ही कुटूंबे गेली ३२ ते ३३ वर्षापासून राहतात. तसेच आरक्षणाच्या अर्धा किलो मीटरमध्ये ८ ते ९ शाळा आहेत. तरी सदरचा (क्षेत्र) भाग रहीवासी झोन करण्यास मान्यता देणेत यावी. २) सं.नं. ११४ आरक्षण क्र.६४२ (लहान मुलाचे खेळाचे मैदान) (CPO) हे आरक्षण मंजूर योजना आराखडयातील असुन हे आरक्षण ज्यावेळेस टाकण्यात आले त्या अगोदर पासून म्हणजेच गेली ३२ ते ३३ वर्षापासून तेथे सुमारे ६०० कुटूंबे राहतात ही कुटूंबे अत्यंत गरीब आहे तरी सदरचा भाग (क्षेत्र) रहीवासी विभागात करण्यास मान्यता देणेत यावी.

**मा.नंदा ताकवणे -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

**मा.निलेश पांढरकर-** मा.महापौर साहेब, सर्व उपसूचना स्विकारल्या आहेत.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा दुरुस्त ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक - ८२३ विषय क्रमांक - ८

दिनांक - २०/०२/२०१६ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ : - १) विषय क्र.२ अन्वये मा.आरती चोंधे, मा.अमिना पानसरे यांचा प्रस्ताव

२) प्रशासन अधिकारी तथा सचिव अ क्षेत्रीय कार्यालय यांचे जा.क्र.अक्षेका/११/कावि/२०/२०१६, दि.१६/०१/२०१६

३) विषय क्र.३ अन्वये अ प्रभाग समिती सभा ठराव क्रमांक ५० दिनांक १३/०१/२०१६

४) मा.शहर सुधारणा समिती ठराव क्र.४४ दि.०४/०२/२०१६

पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील मौजे आकुर्डी मंजूर विकास योजना आराखडयात स.नं.१७९ पैकी मध्ये आरक्षण क्र.२७३ हे प्राथमिक शाळा आरक्षण असून आरक्षणातील क्षेत्रामध्ये सुमारे ४०० कुटुंबे राहतात. या आरक्षणामधील जागेत आरक्षण मंजूर होण्याअगोदर पासून घरे आहेत. तसेच या आरक्षणाचे आजूबाजूला म्हणजेच अर्धा ते एक किलोमीटरचे अंतरावर १३ ते १४ शाळा आहेत व महानगरपालिकेची श्री.वसंतदादा पाटील माध्यमिक विद्यालय हे या प्रभागात आहे. त्यामुळे मंजूर विकास योजनेतील स.नं.१७९ पैकी मधील आरक्षण क्र.२७३ ची आवश्यकता नाही. म्हणून मंजूर विकास योजनेतील सनं.१७९ पैकी मधील आरक्षण क्रमांक २७३ महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये रद्द करुन सदर आरक्षणातील क्षेत्र रहिवासी विभागात समाविष्ट करणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील मौजे पिंपरी मंजूर विकास योजना आराखडयात स.नं. ३११ पैकी मध्ये आरक्षण क्र. १७४ हे प्राथमिक शाळा आरक्षण असून आरक्षणातील क्षेत्रामध्ये सुमारे ४०० कुटूंबे राहतात. या आरक्षणामधील जागेत आरक्षण मंजूर होण्या आगोदर पासून घरे आहेत. तसेच या आरक्षणाचे आजूबाजूला म्हणजेच अर्धा ते एक किलोमीटरचे अंतरावर १३ ते १४ शाळा आहेत व मनपाच्याही शाळा हया प्रभागात आहेत. त्यामुळे मंजूर विकास योजनेतील स.नं.३११ पैकी मधील आरक्षण क्र. १७४ ची आवश्यकता नाही. म्हणून मंजूर विकास योजनेतील सनं. ३११ पैकी मधील आरक्षण क्र. १७४ महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये रद्द करुन सदर आरक्षणातील क्षेत्र रहिवासी विभागात समाविष्ट करणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच मौजे-मोशी येथील मंजूर विकास आराखडयात ९० मी. रस्त्यालगत १०० मी.अंतरावर दक्षिण बाजूचे अस्तित्वातील रस्त्याला ४५ मी. रस्तारुंदी (भोसरी हद्दीलगत) दर्शविणेत आलेली आहे. दोन्ही रस्ते लगत असल्यामुळे विकसित करणेस अडचणी व नियोजन करता येणार नाही. नवनगर विकास प्राधिकरण हद्दीत स्पाईन रस्त्याची रुंदी ७५ मी. आहे. नवनगर

विकास प्राधिकरण हद्दीतून येणारा (स्पाईन रस्ता) ७५ मी. रस्ता व मोशी हद्दीतील ९० मी.रस्ता हे देखील समोरासमोर येत नाहीत. तसेच ते नियोजनाच्या दृष्टिकोनातून देखील योग्य होणार नाही. त्यामुळे मंजूर विकास आराखडयातील ९० मी. रस्त्यातील उत्तर दिशेकडून कमी करुन ४५.०० मी.दक्षिण दिशेस कायम करणेत यावा. प्रस्तावित करावयाच्या ४५.०० मी. रस्त्याची रुंदी नाशिक महामार्ग रस्त्यापासून मौजे- चोविसावाडी हद्दीपर्यंत ४५.०० मी. रस्त्याची रुंदी निश्चित करावी. तरी प्रस्तावित करावयाच्या रस्त्याची आखणी म.प्रा.न.र. अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेर बदलाची कार्यवाही करणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच प्रभाग क्र. ४७ काळेवाडी येथील मंजूर विकास योजना आराखडयातील १) सं.नं.७५ आरक्षण क्र. ६४४ (प्राथमिक शाळेचे आरक्षण) हे आरक्षण असून त्या क्षेत्रामध्ये २०० कुटूंबे राहतात व ही कुटूंबे आरक्षण पडण्याच्या अगोदर पासून आहे. ही कुटूंबे गेली ३२ ते ३३ वर्षापासून राहतात. तसेच आरक्षणाच्या अर्धा किलो मीटरमध्ये ८ ते ९ शाळा आहेत. तरी सदरचा (क्षेत्र) भाग रहीवासी झोन करण्यास मान्यता देणेत येत आहे. २) सं.नं. ११४ आरक्षण क्र.६४२ (लहान मुलाचे खेळाचे मैदान)(CPO) हे आरक्षण मंजूर योजना आराखडयातील असुन हे आरक्षण ज्यावेळेस टाकण्यात आले त्या अगोदर पासून म्हणजेच गेली ३२ ते ३३ वर्षापासून तेथे सुमारे ६०० कुटूंबे राहतात ही कुटूंबे अत्यंत गरीब आहे तरी सदरचा भाग (क्षेत्र) रहीवासी विभागात करण्यास मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------

**मा.शुभांगी लोंढे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ९ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक - ९

दिनांक - २०/०२/२०१६ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ:- १) मा. महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.नरवि/कावि/१८/किवळे१५/२०१६ दिनांक ०१/०२/२०१६

२) मा.विशेष महापालिका सभा ठ.क्र.८१५ दि.१०/२/२०१६ अन्वये.

विषय:- पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतील वाढीव क्षेत्राच्या हद्दीतील नदीकाठच्या महत्तम पूर रेषेबाहेरील ना-विकास जमीन वापर विभागामध्ये दर्शविलेले क्षेत्र रहिवास विभागात समाविष्ट करण्याबाबत मंजूर विकास योजनेत महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६, कलम ३७ अन्वये फेरबदल करण्याबाबत.

संदर्भः- महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई ४०००३२ शासन निर्णय क्र.टिपीएस--१८१५/४२८/प्र.क्र.१३८/१५/नवि-१३ दि.१५/०७/२०१५

उपरोक्त संदर्भिय शासन निर्णयाव्दारे शासनाने पिंपरी चिंचवड महानगरपालिकेस वाढीव हद्दीचे विकास योजनेच्या अनुषंगाने महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७ (१) अन्वये खालीलप्रमाणे निदेश दिले आहेत.

**निदेशः-** "पिंपरी - चिंचवड वाढीव हद्दीच्या मंजूर विकास आराखड्यामधील लाल पूररेषेच्या बाहेरील ना-विकास वापर विभागात दर्शविलेले क्षेत्र सलग रहिवास क्षेत्राची उपलब्धता होण्याच्या दृष्टीने व सुनियोजित विकास होण्याच्या दृष्टीने रहिवास विभागात समाविष्ट करण्यासाठी पिंपरी - चिंचवड महानगरपालिकेने कलम ३७ चा प्रस्ताव त्यांच्या स्तरावरून कार्यान्वित करून शासनास सादर करण्याचे अधिनियमाचे कलम ३७ (१) अन्वये निर्देश देण्यात येत आहेत".

उपरोक्त संदर्भिय शासन निदेशाची छायाप्रत मा. महापालिका सभेच्या अवलोकनार्थ व निर्णयार्थ सोबत जोडली आहे.

सदर शासन निदेशानुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वाढीव हद्दीच्या मंजूर विकास आराखड्यातील लाल पूररेषेच्या बाहेरील असलेले ना-विकास वापर विभागात दर्शविलेले क्षेत्र सलग रहिवास क्षेत्राची उपलब्धता होण्याच्या दृष्टीने व सुनियोजित विकास होण्याच्या दृष्टीने रहिवास क्षेत्रामध्ये समाविष्ट करण्यासाठी महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदलाची कार्यवाही करण्यास, तदनंतर फेरबदलाची सूचना प्रसिद्ध करून हरकती व सूचना मागविणे, संबंधितांना सुनावणी देऊन हरकत व सूचना अर्जांवर अंतिम निर्णय घेऊन फेरबदलाचा प्रस्ताव शासनास मंजुरीस्तव सादर करण्यास आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांना प्राधिकृत करण्यास मान्यता देणेत येत आहे.

**मा.सविता साळुंके -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

**मा.अजित गव्हाणे-** मा.महापौर साहेब, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतील वाढीव क्षेत्राच्या हद्दीतील नदीकाठच्या महत्तम पुर रेषेबाहेरील (म्हणजेच लाल पूररेषेबाहेरील) ना-विकास जमीन वापर विभागामध्ये दर्शविलेले क्षेत्र रहिवास विभागात समाविष्ट करण्याबाबत मंजूर विकास योजनेमध्ये फेरबदल करण्याबाबतचा प्रस्ताव आहे. सदरचा विषयाबाबत धोरण ठरविणेकामी महानगरपालिकेतर्फे सदरचा विषय सादर करणेकामी कळविलेबाबत मा.शासनाचे, मा.नगरसदस्य व नागरिकांतर्फे विशेष आभार.

मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो- मा.शासनाने निर्गमित केलेले निर्णय/निदेश हे पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वाढीव क्षेत्राच्या विकास योजनेशी संलग्न दिलेले आहेत. तथापि पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतील मंजूर विकास योजनेतील वाढीव क्षेत्राच्या हद्दीतील

निळी पूररेषा ते लालपूररेषेचे दरम्यानच्या निवासी विभागातील क्षेत्रासाठी पाटबंधारे विभागाने दिलेल्या मार्गदर्शक तत्वानुसार, काही अटी व शर्तीस अधिन राहून बांधकाम परवानगी दिली जात आहे.

सबब वाढीव क्षेत्राच्या हद्दीतील नदीकाठच्या महत्तम पूररेषेबाहेरील (लाल रेषा) ना-विकास जमीन ऐवजी निळी पूररेषाबाहेरील ना विकास जमीन वापर विभागामध्ये दर्शविलेले क्षेत्र रहिवास विभागात समाविष्ट करण्याबाबतचा अंतर्भाव सदर विषयाच्या प्रस्तावात अंतर्भूत करणेत यावा.

वाढीव हद्दीची विकास योजनेस मंजूरी देणेकामी शासनाने विकास योजना नकाशावर पाटबंधारे विभागाकडून पूररेषा निश्चित करुन दर्शविण्याचे निदेश दिलेले होते वाढीव हद्दीची विकास योजना नकाशे पाटबंधारे विभागाने दर्शविलेल्या पूररेषेसह शासनास मंजूरीस्तव सादर केलेले होते व तदअनुषंगिक सदर पूररेषेसह दर्शविणेत आलेल्या वाढीव हद्दीचे विकास योजनेस शासनाने सन २००९ मध्ये भागश: मंजूरी प्रदान केलेली होती, तथापि सदरची मंजूरी वाढीव हद्दीसाठी असल्याने, सदर प्रस्तावात महानगरपालिकेच्या जुन्या हद्दीचा समावेश करणेत आलेला नव्हता, सबब पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या जून्या हद्दीचे सुधारित मंजूर विकास योजना नकाशावर पूररेषा दर्शविणे व विकास नियंत्रण नियमावलीतील पूररेषाचे अनुषंगिक तरतूद समाविष्ट करण्याकामी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदलाचा प्रस्ताव शासनास मंजूरीकामी पाठविणेत आलेला आहे. तथापि सदर फेरबदल प्रस्तावाअंतर्गत पाटबंधारे विभागाने आखून दिलेल्या निळी पूररेषा व लालपूररेषेमधील मार्गदर्शक तत्वांनुसार महापालिका क्षेत्रासाठी वाढीव हद्द व जुनी हद्द यासाठी एकसमान धोरण व तरतूद असणे आवश्यक आहे. तदअनुषंगाने जुन्या हद्दीच्या गावातीलही पवना व मुळा नदीच्या निळी पूररेषेबाहेरील ना विकास जमीन वापर विभागामध्ये दर्शविलेले क्षेत्र, सलग रहिवास क्षेत्राची उपलब्धता होणेचे दृष्टीकोनातून, व सुनियोजित विकास होणेचे दृष्टीकोनातून रहिवास विभागात समाविष्ट करणेबाबतच्या आशयाचा समावेश सदर ठरावाअंतर्भूत करणेस मान्यता देणेत यावी.

**मा.राजेंद्र जगताप -** मा.महापौर साहेब, उपसूचनेस मी अनुमोदन देतो.

**मा.शुभांगी लोंढे -** मा.महापौर साहेब, उपसूचना स्विकारली आहे.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा दुरुस्त ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक - ८२४ विषय क्रमांक - ९

दिनांक - २०/०२/२०१६ विभाग - मा.आयुक्त

संदर्भः- १) मा. महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र

क्र.नरवि/कावि/१८/किवळे१५/२०१६ दिनांक ०१/०२/२०१६

२) मा.विशेष महापालिका सभा ठ.क्र.८१५ दि.१०/२/२०१६ अन्वये.

विषयः- पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतील वाढीव क्षेत्राच्या हद्दीतील नदीकाठच्या महत्तम पूर रेषेबाहेरील ना-विकास जमीन वापर विभागामध्ये दर्शविलेले क्षेत्र रहिवास विभागात समाविष्ट करण्याबाबत मंजूर विकास योजनेत महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६, कलम ३७ अन्वये फेरबदल करण्याबाबत.

संदर्भः- महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई ४०००३२ शासन निर्णय क्र.टिपीएस--१८१५/४२८/प्र.क्र.१३८/१५/नवि-१३ दि.१५/०७/२०१५

उपरोक्त संदर्भिय शासन निर्णयाव्दारे शासनाने पिंपरी चिंचवड महानगरपालिकेस वाढीव हद्दीचे विकास योजनेच्या अनुषंगाने महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७ (१) अन्वये खालीलप्रमाणे निदेश दिले आहेत.

**निदेशः-** "पिंपरी - चिंचवड वाढीव हद्दीच्या मंजूर विकास आराखड्यामधील लाल पूररेषेच्या बाहेरील ना-विकास वापर विभागात दर्शविलेले क्षेत्र सलग रहिवास क्षेत्राची उपलब्धता होण्याच्या दृष्टीने व सुनियोजित विकास होण्याच्या दृष्टीने रहिवास विभागात समाविष्ट करण्यासाठी पिंपरी - चिंचवड महानगरपालिकेने कलम ३७ चा प्रस्ताव त्यांच्या स्तरावरून कार्यान्वित करून शासनास सादर करण्याचे अधिनियमाचे कलम ३७ (१) अन्वये निर्देश देण्यात येत आहेत".

उपरोक्त संदर्भिय शासन निदेशाची छायाप्रत मा. महापालिका सभेच्या अवलोकनार्थ व निर्णयार्थ सोबत जोडली आहे.

सदर शासन निदेशानुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वाढीव हद्दीच्या मंजूर विकास आराखड्यातील लाल पूररेषेच्या बाहेरील असलेले ना-विकास वापर विभागात दर्शविलेले क्षेत्र सलग रहिवास क्षेत्राची उपलब्धता होण्याच्या दृष्टीने व सुनियोजित विकास होण्याच्या दृष्टीने रहिवास क्षेत्रामध्ये समाविष्ट करण्यासाठी महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदलाची कार्यवाही करण्यास, तदनंतर फेरबदलाची

सूचना प्रसिद्ध करुन हरकती व सूचना मागविणे, संबंधितांना सुनावणी देऊन हरकत व सूचना अर्जांवर अंतिम निर्णय घेऊन फेरबदलाचा प्रस्ताव शासनास मंजुरीस्तव सादर करण्यास आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांना प्राधिकृत करण्यास मान्यता देणेत येत आहे. तसेच मा.शासनाने निर्गमित केलेले निर्णय/निदेश हे पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वाढीव क्षेत्राच्या विकास योजनेशी संलग्न दिलेले आहेत. तथापि पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतील मंजूर विकास योजनेतील वाढीव क्षेत्राच्या हद्दीतील निळी पूररेषा ते लालपूररेषेचे दरम्यानच्या निवासी विभागातील क्षेत्रासाठी पाटबंधारे विभागाने दिलेल्या मार्गदर्शक तत्वानुसार, काही अटी व शर्तीस अधिन राहून बांधकाम परवानगी दिली जात आहे.

सबब वाढीव क्षेत्राच्या हद्दीतील नदीकाठच्या महत्तम पूररेषेबाहेरील (लाल रेषा) ना-विकास जमीन ऐवजी निळी पूररेषाबाहेरील ना विकास जमीन वापर विभागामध्ये दर्शविलेले क्षेत्र रहिवास विभागात समाविष्ट करण्याबाबतचा अंतर्भाव सदर विषयाच्या प्रस्तावात अंतर्भूत करणेस मान्यता देणेत येत आहे.

वाढीव हद्दीची विकास योजनेस मंजूरी देणेकामी शासनाने विकास योजना नकाशावर पाटबंधारे विभागाकडून पूररेषा निश्चित करुन दर्शविण्याचे निदेश दिलेले होते वाढीव हद्दीची विकास योजना नकाशे पाटबंधारे विभागाने दर्शविलेल्या पूररेषेसह शासनास मंजूरीस्तव सादर केलेले होते व तदअनुषंगिक सदर पूररेषेसह दर्शविणेत आलेल्या वाढीव हद्दीचे विकास योजनेस शासनाने सन २००९ मध्ये भागश: मंजूरी प्रदान केलेली होती, तथापि सदरची मंजूरी वाढीव हद्दीसाठी असल्याने, सदर प्रस्तावात महानगरपालिकेच्या जुन्या हद्दीचा समावेश करणेत आलेला नव्हता, सबब पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या जून्या हद्दीचे सुधारित मंजूर विकास योजना नकाशावर पूररेषा दर्शविणे व विकास नियंत्रण नियमावलीतील पूररेषाचे अनुषंगिक तरतूद समाविष्ट करण्याकामी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदलाचा प्रस्ताव शासनास मंजूरीकामी पाठविणत आलेला आहे. तथापि सदर फेरबदल प्रस्तावाअंतर्गत पाटबंधारे विभागाने आखून दिलेल्या निळी पूररेषा व लालपूररेषेमधील मार्गदर्शक तत्वांनुसार महापालिका क्षेत्रासाठी वाढीव हद्द व जुनी हद्द यासाठी एकसमान धोरण व तरतूद असणे आवश्यक आहे. तदअनुषंगाने जुन्या हद्दीच्या गावातीलही पवना व मुळा नदीच्या निळी पूररेषेबाहेरील ना विकास जमीन वापर विभागामध्ये दर्शविलेले क्षेत्र, सलग रहिवास क्षेत्राची उपलब्धता होणेचे दृष्टीकोनातून, व सुनियोजित विकास होणेचे दृष्टीकोनातून रहिवास विभागात समाविष्ट करणेबाबतच्या आशयाचा समावेश सदर ठरावाअंतर्भूत करणेस मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल- ८१ प्रतिकूल - ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------

**मा.शुभांगी लोंढे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १० वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक - १०

दिनांक - २०/०२/२०१६

विभाग - मा.आयुक्त

संदर्भ - १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र. क्र.आरोग्य/२/कावि/०८/२०१६ दि.९/०२/२०१६

देशातील सर्व शहरां मधील नागरिकांना स्वच्छ पर्यावरण व चांगले आरोग्य मिळावे या करीता शहरांना स्वच्छतेची आणि या शहरातील व सर्व नागरिकांना शौचालयाची सुविधा उपलब्ध करून देण्याचे ध्येय गाठण्यासाठी केंद्रशासनाने स्वच्छ भारत अभियान संपूर्ण देशामध्ये राबविण्याची घोषणा दि.२/१०/२०१४ पासून केलेली आहे. महाराष्ट्र शासनाने देखील केंद्र शासनाच्या “स्वच्छ भारत अभियान” च्या धर्तीवर राज्यामध्ये “स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी)” राबविणेबाबत नगर विकास विभाग, महाराष्ट्र शासन, शासन निर्णय क्र. स्वभाअ/२०१५/ प्र.क्र.२३/नवि/३४, दि.१५/५/२०१५ अन्वये कळविणेत आलेले आहे. तसेच या अभियानाचे अनुषंगाने केंद्र व राज्य शासनाचे हिस्स्याची रक्कम (अनुदान) क्र.स्वमअ-२०१५/प्र.क्र.४०/नवि-३४ दि.१४/८/२०१ अन्वये निर्गत करणेत आलेली आहे.

सदर अभियानाचे अनुषंगाने शहरातील ज्या कुटुंबाकडे स्वतःचे स्वतंत्र शौचालय नाही त्यांचेकरिता शौचालय उभारणेसाठी निधी उपलब्ध करून शहर हागंदारी मुक्त करणे (Open Defecation Free) हा या अभियानाचा मुळ उद्देश आहे. राष्ट्रीय जनगणना २०११ नुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील एकूण ११,६८४ कुटुंबे अभियानांतर्गत वैयक्तीक शौचालय उभारणी करीता निधी उपलब्ध करणे आवश्यक आहे. नगर विकास विभाग मंत्रालय, मुंबई -३२ यांचे कडील प्राप्त पत्र क्र.स्वमअ-२०१५/प्र.क्र.४०/नवि-३४, नगर विकास विभाग दि.१७/८/२०१५ अन्वये सदर अभियानाचे अनुषंगाने केंद्र शासन व राज्य शासन यांचेकडून खालील प्रमाणे अनुदान प्राप्त झाले आहे.

**स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) केंद्रशासन व राज्य शासन हिस्सा वाटप तक्ता**

| क्र | तपशील | केंद्र शासन अनुदान | राज्य शासन अनुदान |
|---|---|---|---|
| १ | वैयक्तिक घरगुती शौचालय | ८४,९६,०००/- | १,१७,५७,०००/- |
| २ | सामुदायिक शौचालय | ३४,६७,०००/- | ८,०९,०००/- |
| ३ | स्वच्छ महाराष्ट्र अभियानाचे ब्रँडिंग (माहिती, शिक्षण व प्रसार आणि जन जागृती) | ५,९०,०००/- | १,३७,०००/- |
| ४ | क्षमताबांधणी | १,५०,०००/- | ३४,०००/- |
| ५ | **एकूण** | **१,२७,०३,०००/-** | **२७,३७,००० /-** |
| | | **केंद्रशासन व राज्य शासन एकूण अनुदान** | **२,५४,४०,०००/-** |

वरील प्रमाणे प्राप्त अनुदान व मनपा हिस्सा यामधून प्रत्येक लाभार्थीस केंद्र शासनाचे र.रु ८०००/- , राज्य शासनाचे र.रु. ४०००/- व मनपा हिस्सा र.रु. ४०००/- याप्रमाणे वैयक्तिक घरगुती शौचालय बांधणेसाठी अनुदानाची रक्कम अदा करणेत येईल.

त्यानुसार सदर अभियान सुरु झालेपासून दिनांक ३१/१/२०१६ अखेर सोबत सादर केलेले प्रपत्र "अ" प्रमाणे कामकाज झालेले आहे. शासन निर्णय क्र. स्वभाअ/२०१५/प्र.क्र.२४९/नवि-३४, दिनांक १९/११/२०१५ अन्वये "नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांमधील स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) च्या अंमलबजावणीचा आढावा घेण्याची बाब संबंधित नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या प्रत्येक महिन्याच्या सर्वसाधारण सभेच्या विषय सूचीवर कायम स्वरूपी समावेश करून या विषयाचा सविस्तर आढावा सर्वसाधारण सभेमध्ये घेण्यात यावा" असे कळविलेले आहे. तसेच स्वच्छ भारत अभियानासाठी मा. पंतप्रधान यांनी महाराष्ट्र राज्याकरिता नामनिर्देशित केलेल्या खेलरत्न व अर्जुन पुरस्कार विजेत्या नेमबाज अंजली भागवत यांची पिंपरी चिंचवड महानगरपालिकेसाठी ब्रॅन्ड अम्बॅसिडर म्हणून नियुक्ती केलेली आहे.

स्वच्छ महाराष्ट्र अभियान ( नागरी ) अंतर्गत महापालिकेने दिनांक ३१/१/२०१६ अखेर केलेल्या कार्यवाहीची माहिती खालील प्रमाणे

**प्रपत्र “अ”**

| **महानगरपालिकेचे नाव** | | **पिंपरी चिंचवड महानगरपालिका** | **शेरा** |
|---|---|---|---|
| जिल्हा | | पुणे | |
| वैयक्तिक शौचालय बांधकामासाठी अर्ज केलेल्या कुटुंबांची संख्या | | ३४१७ | |
| केंद्र शासनाचे “स्वच्छ भारत अभियान” च्या संकेत स्थळावर अपलोड करणेत आलेल्या एकूण अर्जांची संख्या | | २९०७ | |
| मंजूर अर्जांची एकूण संख्या | | १३५३ | |
| बांधकाम सुरु झालेल्या शौचालयांची संख्या | वैयक्तिक घरगुती शौचालय | ९१४ | |
| बांधकाम पूर्ण झालेल्या शौचालयांची संख्या | वैयक्तिक घरगुती शौचालय | ४१७ | |
| बांधकाम सुरु झालेल्या शौचालयांची संख्या | सामुदायिक शौचालय | ६२ सीटस | |

| | | | |
|---|---|---|---|
| निर्गत करणेत आलेला पहिला हप्ता | १३२० लाभार्थी | GOI+ GOM= ७९.०२ लाख | GOI = २०००/- व GOM = ४०००/- हिस्सा |
| | | ULB = २६.०४ लाख | ULB=२०००/- हिस्सा |
| | **एकुण** | **१०५.६ लाख** | |
| निर्गत करणेत आलेला दुसरा हप्ता | १०२ लाभार्थी | GOI+ GOM = ६.१२ लाख | GOI = २०००/- व GOM = ४०००/- हिस्सा |
| | | ULB = २.०४ लाख | ULB=२०००/- हिस्सा |
| | **एकुण** | **८.१४ लाख** | |

सबब, महापालिकेकडून राबविणेत येत असलेल्या स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) अंमलबजावणीचा आढावा अवलोकन करणेत आला.

**मा.सविता साळूंके -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

**मा.धनंजय आल्हाट -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह आरोग्य हा अतिशय महत्वाचा विषय आपल्या सरकारने घेतलेला आहे. परंतु गेल्या दोन दिवसामध्ये वर्तमानपत्रामध्ये सर्वानी बातमी वाचली असेल पुण्यातील कचरा हा मोशी खाणीमध्ये टाकण्याकरिता शासन अनुकूल आहे. २०१३ मध्ये तत्कालीन मा.मुख्यमंत्री यांच्या बरोबर कच-यासाठी बैठक होवून ज्या काही खाणीच्या जागा आहेत त्या उपलब्ध करुन देण्यासंदर्भातला विषय होता त्या अनुसरून २०१४ मध्ये पुणे महानगरपालिकेनी कचरा विघटनाकरिता खाणीच्या जागा सन्मा.जिल्हाधिकारी यांच्याकडे आयुक्तांमार्फत मागणी केली होती. त्यावेळेला जिल्हाधिका-यांनी अनुमती दिली. तद्नंतर हा प्रस्ताव शासनाकडे पाठविणेत आला. मोशीमध्ये गट क्र.३२७, २५ एक्कर जागा याच्यामध्ये तो कचरा टाकण्याचा शासनाने पुढे प्रयत्न चालू केलेला दिसून येतो, आपल्याला सर्वाना माहिती आहे की मोशीत जो कचरा डेपो आहे तो ८० हेक्टर मध्ये आहे. संपुर्ण शहराचा जवळ जवळ एक हजार टन कचरा त्यठिकाणी जमा होतो. दिवसेंदिवस कचरा हा वाढणार आहे. आपल्याला माहिती आहे कचरा हा कोणालाच नको असतो. प्रत्येकाला आपल्या भागामध्ये चांगल्या चांगल्या सुविधा याव्यात असे वाटते आणि ते स्वाभावीक आहे परंतु गेल्या कित्येक वर्षापासून मोशी परिसरातील संपुर्ण जनता, फक्त आता मोशीपुरत मर्यादीत राहीलेल नाही या कच-याची दुर्गंधी येते. या कच-या डेपोची दुर्गंधी जवळ जवळ भोसरीचा काही भाग, च-होली असेल, दिघी असेल, डुडूळगांव असेल, संपुर्ण मोशी, मोशी-प्राधिकरण असेल, इंद्रायणीनगर असेल, जाधववाडी, चिखली याठिकाणी मोठयाप्रमाणावर म्हणजे जवळ जवळ तीन कि.मी. च्या परिसरामध्ये ही प्रचंड दुर्धंधी या कचरा डेपोची पसरते

हे काही नव्याने सांगायची गरज नाही. सन्मा.महापौर साहेब, मला सभागृहाच्या निदर्शनास आणून दयायच आहे की या प्रस्तावाची शासनाने त्याठिकाणी प्रक्रीया चालू केलेली आहे. महापालिकेकडे या संदर्भात परवानगी त्याठिकाणी मागीतली जाणार आहे त्यामुळे आपल्याला माहिती आहे की, या परिसरातील जनतेचे आरोग्य तसंतर धोक्यातच आहे इतकी प्रचंड दुर्गंधी कोटयावधी रुपये खर्च करुन सुध्दा त्याठिकाणच्या कच-याच विघटन होत असताना जी दुर्गंधी येते ती थांबली जात नाही. मी अनेकवेळा मागणी केलेली आहे. कचरा हा कोणालाही नको असतो, कुठल्याही भागात गेलेतर त्यास विरोध हा होणारच आहे कारण त्याठिकाणच्या नागरीकांना त्याचा त्रास होतो परंतु अनेकवेळा या कच-याच्या संदर्भात मी सन्मा.आयुक्त, आपल्या सगळयांना सांगीतल की काहीतरी धोरण अवलंबवाव. भविष्यात सगळयात मोठी समस्या ही कच-याची असणार आहे. स्वच्छतेच पारितोषीक आपल्याला मिळालेल आहे. तसे पाहीलेतर आपण आरोग्याच्या बाबतीत चांगले आहोत परंतु भविष्यामध्ये हा नंबर आपल्याला कायम टिकवायचा असेल किंवा आरोग्य चांगल ठेवायच असेलतर काहीतरी पॉलीसी राबविली पाहीजे. त्याठिकाणची जागा आता कमी पडत चाललेली आहे त्यामुळे इतर ठिकाणी नागरीकांचा विरोध होतो. मग प्रत्येक प्रभागात क्षेत्रीय कार्यालयामध्ये, जर अशाप्रकारचे युनीट तयार केलेतर कच-याचे विघटन होणार आहे. पुण्याने किंवा शासनाने म्हणलेतरी याठिकाणी महापालिकेची परवानगी नाही.  उदया या निर्णयासंदर्भात शासनाने निर्णय घेण्याचे ठरविले आहे तरी संपुर्ण मोशी ग्रामस्थ परिसरातील सर्व मंडळी त्याठिकाणी उदया सकाळी ९/- वाजता कचरा डेपोच्या चौकामध्ये आम्ही सर्व याचा तीव्र निषेध आणि विरोध करणार आहोत. मला सभागृहाला सांगायच आहे की आपण या अंदोलनाला पाठींबा दयावा व सर्व नगरसेवकांनी उपस्थित रहावे अशी विनंती करतो. मा.महापौर साहेब आपण सुध्दा उपस्थित राहावे आणि अंदोलनाला पाठींबा दयावा व तो प्रस्ताव फेटाळला जाईल असं आपण दोन मिनीट सर्व सभागृहाला सांगाव.

**मा.अरुण बो-हाडे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. खरंतर दोन वर्षा पुर्वी हा विषय आलेला होता. स्थानिक नागरीकांच्या आणि आपल्या महानगरपालिकेतील सन्मा.नगरसेवकांच्या भुमिकेमुळे त्यावेळेला हा विषय थांबलेला होता. आता पुन्हा दोन वर्षापुर्वी वर्तमानपत्रामध्ये बातमी आली त्यावेळेलाही प्रश्न विचारला होता की महानगरपालिकेच्या प्रशासनाची या बाबतीमधील नेमकी काय भूमीका आहे. आताही प्रश्न आहे की प्रशासनाची या बाबतीमधील नेमकी भूमीका काय आहे. ज्या त्या शहरातील कचरा ज्या त्या शहरातच रिजवण्याची किंबहूना आता धनंजय आल्हाट यांनी सूचना केली त्याप्रमाणे क्षेत्रीय विभागातच एका शहराचा कचरा एका ठिकाणी आणण्यापेक्षा तो अलग ठिकाणी व्हायला पाहिजे. पुण्याचा कचरा याठिकाणी येत असेलतर त्याला विरोध हा निश्चितच आहे. धनंजय आल्हाट यांनी सांगीतले त्याप्रमाणे आमचा सर्वांचा या भुमिकेला विरोध करण्यासाठी उदयाच्या अंदोलनामध्ये

आम्ही सर्वजण आपल्या बरोबर आहोत. सर्वपक्षीय आंदोलन व्हाव, सभागृहाला मी आवाहन करेल, सर्व राजकीय नेत्यांना मी आवाहन करेल या भूमिकेसाठी आपण सर्वांनी एकत्र आले पाहीजे. उदया सकाळी नऊ वाजता मोशीमध्ये होणा-या आंदोलनाला आमचा जाहीर पाठिंबा आहे.

**मा.सुलभा उबाळे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह आपण सर्वानी वर्तमानपत्रामध्ये वाचले असेल की पुण्याचा कचरा मोशीमध्ये आपल्या शहरात येतो ही बातमी वाचल्यानंतर सगळयांना याचा धक्का बसलेला आहे. मा.महापौर, पुण्यामध्ये या कचरा डेपोमुळे रान उठलेले आहे. त्यांचा कचरा त्यांना नकोसा झालेला आहे. स्मार्ट सिटीमध्ये जात असताना त्यांनी त्यांचा कचरा सांभाळावा अशी सूचना आम्ही याठिकाणी करतो. म्हणजे त्यांनी स्मार्ट व्हायच आणि त्यांचा कचरा आमच्याकडे पाठवायचा हे अन्यायकारक आहे. यामध्ये आपण कुठेही पक्ष ही भूमिका न ठेवता पिंपरी चिंचवड शहरातील नागरीक म्हणून आपण सगळयानी एकत्र आले पाहीजे. याठिकाणी मंगलाताईना विनंती करेल, मा.महापौरांना विनंती करेल, सर्व पक्षाच्या पदाधिका-याना विनंती करेल की आपल्याकडे देहू-आळंदी जवळ आहे, एक्झिबिशन सेंटर मोठ येत आहे आणि का म्हणून हा अन्याय आपण सहन करायचा. प्रत्येक अधिका-यांनी त्याच समर्थन केल पाहीजे आणि आपणही मा.महापौर अशी घोषण करावी की कुठल्याही परिस्थितीत, शासन कोणाचही असो अन्याय झालातर आम्ही रस्त्यावरती येणारच आणि नागरीकां बरोबर राहणारच ही भूमिका आमची सगळयांची आहे त्यामुळे आपले सहकार्य आम्हांला अपेक्षीत आहे, धन्यवाद.

**मा.मंगलाताई कदम -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, माझे सर्व सहकारी. २००६ च्या वेळेला सुध्दा ही परिस्थिती निर्माण झालेली होती. काही डंपर तीकडून भरुन आले आणि मोशी कचरा डेपोच्या तेथे कचरा टाकण्यासाठी सुरवात न विचारता केली त्यावेळेला मी महापौर होते. सर्व गावकरी बरोबर घेवून आपण त्यांना स्पष्ट सांगीतले होते की तुमचा कचरा शेजारधर्म म्हणून आम्ही स्विकारणार नाहीत, म्हणजे त्यावेळेस स्विकारणार नाही आणि आजही स्विकारणार नाहीत हे सभागृहाच्या वतीने सांगते प्रशासनाने सुध्दा असा ठराव आमच्याकडे आणू नये. आजच आम्ही प्रशासनाला सांगू इच्छितो की, पुणे महापालिकेनी त्यांच्या कच-याचे काय करायचे हा त्यांचा प्रश्न आहे. तो पिंपरी चिंचवडकडे आणुन आम्हांला शेजारधर्म, कोणत्याही गोष्टीची त्यांनी विचारणा करु नये. महाराष्ट्र शासनाने सुध्दा विचारणा करु नये व तसा कोणीही आमच्याकडे प्रस्ताव पाठवू नये. आमचाच कचरा आता खूप झालेला आहे. त्यामुळे आम्हीच आमचा कचरा टाकण्यासाठी तीकडे यावेत का आशी आमची त्यांना विनंती आहे. त्यांनीच आमचा कचरा टाकण्यासाठी आम्हांला जागा दयावी. मोशीच्या आजुबाजूला खूप सुधारणा झालेली आहे तसेच एक्झिबिशन सेंटर येणार आहे, आंतरराष्ट्रीय विमानतळ सुध्दा

करणार आहोत त्यामुळे त्यांनी त्यांचा कचरा इकडे न आणता आम्हांलाच शेजारधर्म म्हणून थोडीश जागा दयावी, अशी आमची त्यांन विनंती आहे.

मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडते - मोशी येथील कचरा डेपोची कचरा टाकण्याची कमाल मर्यादा संपलेली आहे. त्याचप्रमाणे मोशीच्या आजूबाजूला खूप सुधारणा झालेली आहे. तिथे एक्झिबिशन सेंटर तसेच आंतरराष्ट्रीय विमानतळ सुध्दा होणार आहे. त्यामुळे पुण्याचा कचरा मोशी येथे न आणता पिंपरी चिंचवड शहरातील कच-यासाठी पुणे मनपा हद्दीत जागा देणेकामी राज्यशासनास कळविण्यास मान्यता देणेत यावी.

**मा.अरुणा भालेकर -** मा.महापौर साहेब, उपसूचनेस मी अनुमोदन देते.

**मा.शमीम पठाण -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. आताच्या विषयाला आमच्या सर्वांचा पाठिंबा आहे. पक्षनेत्यांनी दिलेल्या ठरावाला आम्ही सर्व एकजुटीने पाठींबा देत आहोत. मला या निमीत्ताने एकच सांगायच आहे की, कोणी कितीही सुंदर दिसावे मग ते वशीला लावून दिसो किंवा कसंही, त्यांचा स्मार्ट सिटीचा ठराव पाठवला. शासनाने आमच्यावर अन्याय केला प्रस्तावच केंद्रशासनाला पाठविलेला नाही. हा एक अन्याय आम्ही सहन करतोय आणि त्याच्यावर आमच्या जखमेवर मीठ चोळतात. पुणेकरांना एवढेच सांगायचे आहे की कचरा कमी करावा व दुसरे नियोजन करावे. आमच्या शहरात त्यांचा कणभरही कचरा येऊ देणार नाहीत. याठिकाणी जो विषय अवलोकनासाठी आलेला आहे त्याबाबत किती लोकांना अनुदान दिलेले आहे. किती अनुदान आलेले आहे. माझ्या प्रभागामध्ये एक हजार झोपडया आहेत आणि त्या प्रत्येकाचे ठराव आम्ही पाठवितो. जवळ जवळ ६०० ठराव मी पाठविलेले आहेत. मी स्वत: अर्ज भरुन घेतलेले आहेत आणि आरोग्य विभागाकड पाठवलेले आहेत. मला मा.सहा.आयुक्त दंडवते साहेबांना हे विचारायचे आहे की आपण किती अनुदान दिलेले आहे. किती हजार झोपडया आपल्याकडे आहेत, एवढया झोपडया असून आपण अनुदान कमी का दिलेले आहे. माझ्याकडे फक्त खूप कमी लोकांना अनुदान दिलेले आहे. १ हजार झोपडया पैकी ४७ लोकांना अनुदान दिलेले आहे आणि बाकी सगळयाना अजून दयायचे आहे. आम्ही इतक्या भराभर त्याठिकाणी अर्ज देतो, फॉर्म देतो, यांच्याकडून दिरंगाई का होते. आज अर्ज आले की तुमच्याकडे अनुदान तयार आहे पण ते लोकांना का देत नाहीत दळवीनगर झोपडपट्टीमध्ये एक हजार कुटूंब आहेत. प्रत्येक घरासमोर आम्ही ती लाईन नेतो म्हणजे काम जवळ जवळ पुर्ण होत आलेल आहे. असे असताना तुमच्याकडून अनुदान दयायला दिरंगाई का होते आणि हा विषय अवलोकनासाठी आणलेला आहे याचा अर्थ काय आहे. तुम्ही अनुदानास लेट का करता. अर्धवट अवस्थेमध्ये तुम्ही आकडे दिलेले आहेत हे दिलेले आकडे चुकीचे आकडे आहेत. १ हजार झोपडया पैकी १०० जणांना आनूदान देताय आणि लगेचच तुम्ही अवलोकनासाठी विषय आणता. म्हणजे सांगताय की आमच प्रशासन किती फिट काम करतयं. गावडे साहेब तुम्ही आता आयुक्त आहात व तुम्ही या विभागाचे प्रमुख म्हणून काम करतात मग अनुदान

एवढे लेट का होतय. ज्याठिकाणी मलनिस्सारणाची व्यवस्था आहे, होणार आहे, आपल टेंडर मंजूर आहे, काम होत आलेल आहे अशा ठिकाणी तुमच्या आरोग्याचे किती अधिकारी गेलेले आहेत. त्यांचे मंजूर का केलेल नाही. कारण त्यांनी काम केल्याशिवाय, त्यांनी शौचालय बांधल्याशिवाय आणि रस्त्यावरच्या ड्रेनेजला जोडल्याशिवाय संपुर्ण झोपडपट्टीमध्ये खनुन ठेवलेले आहे. मला त्याठिकाणी सगळीकडे काँक्रीट करायचे, दोन तीन महीने आम्ही तुमच्या मागे लागलेलो होतो. फॉर्म दिलेले आहेत, तुम्ही घेतलेले आहेत कॉम्प्युटरमध्ये फिट केलेले आहेत. मग उशिर का लावता याच उत्तर दयाव. तुम्हांला विषय अवलोकनासाठी आणायची एवढी गडबड का? याचे उत्तर दयायला पाहीजे.

**मा.शारदा बाबर -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. आपल्या पिंपरी चिंचवडला स्वच्छ शहर म्हणून नववा क्रमांक मिळालेला आहे. ब्रॅण्ड अम्बॅसीटर अंजली भागवत आहेत. पिंपरी चिंचवड शहरात जनजागृती करावी. स्लम ऐरीयात उघडया गटारातून प्लॅस्टीक टाकतात अजून आपला क्रमांक वर कसा येईल याकडे आपण जातीने लक्ष दयावे. आताच आल्हाट साहेबांनी सांगीतले कचरा पुण्यातून येणार. फुरसूंगी सारख्या साध्या खेडयातून प्रतिकार करुन त्यांनी आपल्याकडे पाठविलेले आहे. मोशी कचराडेपोचा वास मोहननगर पर्यंत येतो. एकवेळा जेवणासाठी आमच्याकडे या परंतु खरकट नको. सर्वपक्षीय प्रतीकार करुन हा कचरा आपल्याकडे येऊ देवू नका. जास्तीत जास्त आरोग्याबद्दल जनजागृती करावी एवढी विनंती करते आणि थांबते.

**मा.गावडे (सह आयुक्त)** - मा.महापौर साहेब, सन्मा.सभागृह. मा.पठाणताईनी मुद्दा उपस्थित केलेला आहे त्याच्याबद्दल मी सांगतो की, ही केंद्रशासनाने योजना जाहीर केलेली आहे. स्वच्छ भारत अभियाना अंतर्गत केंद्रशासन यासाठी चार हजार अनुदान देते, राज्यशासन आठ हजार अनुदान देते, महापालिकेनी आपला हिस्सा चार हजार असे मिळून १६ हजार अनुदान वैयक्तिक शौचालयासाठी आपण देत आहोत. आपले आरोग्य निरीक्षक आहेत त्यांना आपण स्वच्छ भारत अभियानासाठी नियुक्त केलेले आहे. त्यांनी अर्ज व्हेरीफाय केल्यानंतर ते मंजूरीसाठी पुढे येते ते मंजूर झाल्यानंतर जो पहीला टप्पा आहे अर्धा भाग आपण आठ हजार अनुदान ॲडव्हान्स म्हणून देतो परत बांधकाम पुर्ण झाल्यानंतर त्यांनी ड्रेनेजला जोडणी केल्यानंतर परत आपण आठ हजार अनुदान देतो. आपल्याकडे दर महीन्याला हा विषय येणार आहे, शासनाचे तसे निर्देष आहेत. दर महीन्याला हा विषय अवलोकनार्थ महापालिका सभेपुढे ठेवावा. आपल्याकडे एकूण ३४१७ कुटूंबाचे अर्ज प्राप्त झालेले आहेत आणि अपलोड केलेले २९०७ आहेत काही अर्ज रिजेक्ट पण होतात. त्याच्यामध्ये मंजूर अर्जाची संख्या १३०१ हे कन्टिन्यू प्रोसेस सुरु आहे. अजूनही आपली योजना खुली आहे १२ हजार पर्यंत आपल्याला उदिष्ट गाठायचे आहे. कोणीही अर्ज करु शकतात. ज्याठिकाणी वैयक्तिक शौचालय उपलब्ध नाही ते कोणीही अर्ज करु शकतात. झोपडपट्टीत सुध्दा अधिकृत असो किंवा अनधिकृत असो, शासकीय जागेवर असो

किंवा अशासकीय जागेवर असो कुठल्याही जागेवरती अनुदान देय होते. त्यामुळे कोणी अर्ज केला आणि आपला आरोग्य निरीक्षक त्याठिकाणी जाऊन तपासणी करणार, त्याठिकाणी ड्रेनेजलाईन उपलब्ध आहे किंवा नाही आणि ड्रेनेज विभागाने आता झोपडपट्टयामधुन मोठया प्रमाणावर ड्रेनेजलाईनच काम सुरु केलेल आहे. हे आपल्याला दिलेल उदिष्ट आपण पुर्ण करणार आहोत. अपलोड करण्यासाठी उशिर लागतो. क्षेत्रीय अधिका-यांना अनुदान देण्यासाठी अधिकार दिलेले आहेत त्यामुळे ब प्रभागात नेमकी काय अडचण आहे ते कळू शकेल.

**मा.शुभांगी लोंढे -** मा.महापौर साहेब, उपसूचना स्विकारली आहे.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा दुरुस्त ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक - ८२५ विषय क्रमांक - १०

दिनांक - २०/०२/२०१६ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ - १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.क्र.आरोग्य/२/कावि/०८/२०१६ दि.९/०२/२०१६

देशातील सर्व शहरां मधील नागरिकांना स्वच्छ पर्यावरण व चांगले आरोग्य मिळावे या करीता शहरांना स्वच्छतेची आणि या शहरातील व सर्व नागरिकांना शौचालयाची सुविधा उपलब्ध करून देण्याचे ध्येय गाठण्यासाठी केंद्रशासनाने स्वच्छ भारत अभियान संपूर्ण देशामध्ये राबविण्याची घोषणा दि.२/१०/२०१४ पासून केलेली आहे. महाराष्ट्र शासनाने देखील केंद्र शासनाच्या "स्वच्छ भारत अभियान" च्या धर्तीवर राज्यामध्ये "स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी)" राबविणेबाबत नगर विकास विभाग, महाराष्ट्र शासन, शासन निर्णय क्र. स्वभाअ/२०१५/ प्र.क्र.२३/नवि/३४, दि.१५/५/२०१५ अन्वये कळविणेत आलेले आहे. तसेच या अभियानाचे अनुषंगाने केंद्र व राज्य शासनाचे हिस्स्याची रक्कम (अनुदान) क्र.स्वमअ-२०१५/प्र.क्र.४०/नवि-३४ दि.१४/८/२०१ अन्वये निर्गत करणेत आलेली आहे.

सदर अभियानाचे अनुषंगाने शहरातील ज्या कुटुंबाकडे स्वतःचे स्वतंत्र शौचालय नाही त्यांचेकरिता शौचालय उभारणेसाठी निधी उपलब्ध करून शहर हागंदारी मुक्त करणे (Open Defecation Free) हा या अभियानाचा मुळ उद्देश आहे. राष्ट्रीय जनगणना २०११ नुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील एकूण ११,६८४ कुटुंबे अभियानांतर्गत वैयक्तीक शौचालय उभारणी करीता निधी उपलब्ध करणे आवश्यक आहे. नगर विकास विभाग मंत्रालय, मुंबई -३२ यांचे कडील प्राप्त पत्र क्र.स्वमअ-२०१५/प्र.क्र.४०/नवि-३४, नगर विकास विभाग दि.१७/८/२०१५ अन्वये सदर अभियानाचे अनुषंगाने केंद्र शासन व राज्य शासन यांचेकडून खालील प्रमाणे अनुदान प्राप्त झाले आहे.

**स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) केंद्रशासन व राज्य शासन हिस्सा वाटप तक्ता**

| क्र | तपशील | केंद्र शासन अनुदान | राज्य शासन अनुदान |
|---|---|---|---|
| १ | वैयक्तिक घरगुती शौचालय | ८४,९६,०००/- | १,१७,५७,०००/- |
| २ | सामुदायिक शौचालय | ३४,६७,०००/- | ८,०९,०००/- |
| ३ | स्वच्छ महाराष्ट्र अभियानाचे ब्रँडिंग (माहिती, शिक्षण व प्रसार आणि जन जागृती) | ५,९०,०००/- | १,३७,०००/- |
| ४ | क्षमताबांधणी | १,५०,०००/- | ३४,०००/- |
| ५ | **एकूण** | **१,२७,०३,०००/-** | **२७,३७,००० /-** |
| | | **केंद्रशासन व राज्य शासन एकूण अनुदान** | **२,५४,४०,०००/-** |

वरील प्रमाणे प्राप्त अनुदान व मनपा हिस्सा यामधून प्रत्येक लाभार्थीस केंद्र शासनाचे र.रु ८०००/- , राज्य शासनाचे र.रु. ४०००/- व मनपा हिस्सा र.रु. ४०००/- याप्रमाणे वैयक्तिक घरगुती शौचालय बांधणेसाठी अनुदानाची रक्कम अदा करणेत येईल.

त्यानुसार सदर अभियान सुरु झालेपासून दिनांक ३१/१/२०१६ अखेर सोबत सादर केलेले प्रपत्र "अ" प्रमाणे कामकाज झालेले आहे. शासन निर्णय क्र. स्वभाअ/२०१५/प्र.क्र.२४९/नवि-३४, दिनांक १९/११/२०१५ अन्वये "नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांमधील स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) च्या अंमलबजावणीचा आढावा घेण्याची बाब संबंधित नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या प्रत्येक महिन्याच्या सर्वसाधारण सभेच्या विषय सूचीवर कायम स्वरूपी समावेश करून या विषयाचा सविस्तर आढावा सर्वसाधारण सभेमध्ये घेण्यात यावा" असे कळविलेले आहे. तसेच स्वच्छ भारत अभियानासाठी मा. पंतप्रधान यांनी महाराष्ट्र राज्याकरिता नामनिर्देशित केलेल्या खेलरत्न व अर्जुन पुरस्कार विजेत्या नेमबाज अंजली भागवत यांची पिंपरी चिंचवड महानगरपालिकेसाठी ब्रॅन्ड अम्बॅसिडर म्हणून नियुक्ती केलेली आहे.

स्वच्छ महाराष्ट्र अभियान ( नागरी ) अंतर्गत महापालिकेने दिनांक ३१/१/२०१६ अखेर केलेल्या कार्यवाहीची माहिती खालील प्रमाणे

**प्रपत्र “अ”**

| **महानगरपालिकेचे नाव** | **पिंपरी चिंचवड महानगरपालिका** | **शेरा** |
|---|---|---|
| जिल्हा | पुणे | |
| वैयक्तिक शौचालय बांधकामासाठी अर्ज केलेल्या | ३४१७ | |

| | | | |
|---|---|---|---|
| कुटुंबांची संख्या | | | |
| केंद्र शासनाचे “स्वच्छ भारत अभियान” च्या संकेत स्थळावर अपलोड करणेत आलेल्या एकूण अर्जांची संख्या | | २९०७ | |
| मंजूर अर्जांची एकूण संख्या | | १३५३ | |
| बांधकाम सुरु झालेल्या शौचालयांची संख्या | वैयक्तिक घरगुती शौचालय | ९१४ | |
| बांधकाम पूर्ण झालेल्या शौचालयांची संख्या | वैयक्तिक घरगुती शौचालय | ४१७ | |
| बांधकाम सुरु झालेल्या शौचालयांची संख्या | सामुदायिक शौचालय | ६२ सीटस | |
| निर्गत करणेत आलेला पहिला हप्ता | १३२० लाभार्थी | GOI+ GOM= ७९.०२ लाख | GOI = २०००/- व GOM = ४०००/- हिस्सा |
| | | ULB = २६.०४ लाख | ULB=२०००/- हिस्सा |
| | **एकुण** | **१०५.६ लाख** | |
| निर्गत करणेत आलेला दुसरा हप्ता | १०२ लाभार्थी | GOI+ GOM = ६.१२ लाख | GOI = २०००/- व GOM = ४०००/- हिस्सा |
| | | ULB = २.०४ लाख | ULB=२०००/- हिस्सा |
| | **एकुण** | **८.१४ लाख** | |

सबब, महापालिकेकडून राबविणेत येत असलेल्या स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) अंमलबजावणीचा आढावा अवलोकन करणेत आला. तसेच मोशी येथील कचरा डेपोची कचरा टाकण्याची कमाल मर्यादा संपलेली आहे. त्याचप्रमाणे मोशीच्या आजूबाजूला खूप सुधारणा झालेली आहे. तिथे एक्झिबिशन सेंटर तसेच आंतरराष्ट्रीय विमानतळ सुध्दा होणार आहे. त्यामुळे पुण्याचा कचरा मोशी येथे न आणता पिंपरी चिंचवड शहरातील कच-यासाठी पुणे मनपा हद्दीत जागा देणेकामी राज्यशासनास कळविण्यास मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

----

**मा.अरुणा भालेकर -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ११ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक - ८२६ विषय क्रमांक - ११

दिनांक - २०/०२/२०१६ विभाग - मा.नगरसचिव

**मा. विधी समिती**

अ) दि.१/१/२०१६ व दि.७/१/२०१६ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

ब) दि.१५/१/२०१६ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

**मा.निलेश पांढरकर-** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

**मा.अरुणा भालेकर -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १२ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक - ८२७ विषय क्रमांक - १२

दिनांक - २०/०२/२०१६ विभाग - मा.नगरसचिव

**मा.महिला व बालकल्याण समिती**

अ) दि.९/१२/२०१५ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

ब) दि.२३/१२/२०१५ व दि.१३/१/२०१६ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

**मा.निलेश पांढरकर-** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

**मा.अरुणा भालेकर -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १३ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक - ८२८ विषय क्रमांक - १३

दिनांक - २०/०२/२०१६ विभाग - मा.नगरसचिव

**मा.शहर सुधारणा समिती**

अ) दि.५/१/२०१६ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.
ब) दि.१९/१/२०१६ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

**मा.निलेश पांढरकर-** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

**मा.अरुणा भालेकर -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १४ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक - ८२९ विषय क्रमांक - १४

दिनांक - २०/०२/२०१६ विभाग - मा.नगरसचिव

**मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती**

**अ)** दि. १६/१२/२०१५, दि.२१/१२/२०१५ व दि.६/१/२०१६ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.
**ब)** दि. ६/१/२०१६ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.
**क)** दि. २०/१/२०१६ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

**मा.निलेश पांढरकर-** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

**मा.महापौर -** सर्वांचे आभार मानुन आजची सभा संपली असे जाहीर करणेत येत आहे.

(धराडे शकुंतला भाऊसाहेब)
**महापौर**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
नगरसचिव कार्यालय
क्रमांक - नस/९/कावि/१४७/१६
दिनांक - ०२/०४/२०१६



**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

प्रत - सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांजकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.

**मा.महापालिका सभा ठराव क्रमांक ८१७ दिनांक २०/०२/२०१६ चे लगत**

**(क्रमांक-कर/मुख्या/५/कावि/१५/२०१६ दिनांक ११/१/२०१६ चे लगत)**

**(सन 2016 - 2017 या सरकारी वर्षाकरिता कराचे व करेत्तर बाबींचे दर निश्चितीबाबत)**

| अ.क्र. | कराचे नाव | करआकारणी पध्दत करयोग्यमूल्यावर | सन 2015-2016 चे प्रचलित दर (सध्याचे) | | सन 2016-2017 करिता प्रस्तावित दर | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | निवासी | निवासेत्तर | निवासी | निवासेत्तर |
| 1 | सामान्य कर | रक्कम रुपये 1/- ते 12000/- | **13%** | **14%** | **15%** | **18%** |
| | | रक्कम रुपये 12001/- ते 30000/- | **16%** | **17%** | **18%** | **21%** |
| | | रक्कम रुपये 30001/- व त्यापुढील | **24%** | **24%** | **26%** | **28%** |
| 1ब | साफसफाई कर | करयोग्यमूल्यावर | **5%** | **6%** | **5%** | **6%** |
| | अग्निशामक कर | करयोग्यमूल्यावर | **2%** | **2%** | **2%** | **2%** |
| | मनपा शिक्षणकर | करयोग्यमूल्यावर | **4%** | **5%** | **4%** | **5%** |

| अ.क्र. | कराचे नाव | करआकारणी पध्दत करयोग्यमूल्यावर | सन 2015-2016 चे प्रचलित दर (सध्याचे) | | सन 2016-2017 करिता प्रस्तावित दर | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | निवासी | निवासेत्तर | निवासी | निवासेत्तर |
| 2 | मलप्रवाह सुविधा लाभ कर | करयोग्यमूल्यावर | **5%** | **5%** | **6%** | **6%** |
| 3 | पाणीपुरवठा लाभ कर | करयोग्यमूल्यावर | **4%** | **5%** | **5%** | **6%** |
| 4 | रस्ता कर | करयोग्यमूल्यावर | **2%** | **3%** | **3%** | **4%** |
| 5 | विशेष साफसफाईकर<br><br>( फक्त मॉल्स,लॉजिंग बोर्डिंग,मंगल कार्यालय,सभागृह,रुग्णालय,हॉटेल्स,कॅन्टीन्स,रेस्टॉरंट या स्वरुपाच्या मिळकतींस) | करयोग्यमूल्यावर | **--** | **2%** | **--** | **5%** |
| 6 | वृक्षकर | करयोग्यमूल्यावर | **1%** | **1%** | **1%** | **1%** |

| अ. क्र. | कराचे नाव | करआकारणी पध्दत | सन 2015-2016 चे प्रचलित दर (सध्याचे) | सन 2016-2017 करिता प्रस्तावित दर |
|---|---|---|---|---|
| 7 | नाटयगृहा | 1. सिनेमा | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | वरील कर (करमणूक कर) | अ) 500 पर्यंत किंवा त्यापेक्षा जास्त बैठक व्यवस्था (सिट्स) असणा-या थिएटरला | प्रती दिवस **रु.250/-** | प्रती दिवस **रु.500/-** |
| | | ब) मराठी सिनेमा | करमाफी | करमाफी |
| | | क) वातानुकुलित थिएटर | प्रती दिवस **रु.350/-** | प्रती दिवस **रु.500/-** |
| | | 2. नाटक | प्रती प्रयोगास **रु.100/-** | प्रती प्रयोगास **रु.200/-** |
| | | 3. सर्कस (कॉन्व्हिल पेट्स) | प्रती प्रयोगास**रु.100/-** | प्रती प्रयोगास**रु.200/-** |
| | | 4. तमाशा | प्रती प्रयोगास **रु.100/-** | प्रती प्रयोगास **रु.200/-** |
| | | 5. संगीत जलसे/शास्त्रीय संगीत जलसे **(**थियटरमधील किंवा थियटर व्यतिरिक्त प्रत्येक प्रयोगास) | प्रती प्रयोगास **रु.100/-** | प्रती प्रयोगास **रु.200/-** |
| | | 6. वरील खेरीज इतर प्रत्येक प्रयोगास (जर वेगवेगळे खेळ नसतील तर अशा प्रत्येक दिवसास | प्रती दिवस **रु.100/-** | प्रती दिवस **रु.200/-** |

**ब . सामान्यकरातील सवलत योजना : सामान्य कर (सामान्य करामध्ये सामान्य कर + साफसफाई कर + अग्निशामक + मनपा शिक्षण उपकर हे कर समाविष्ट आहेत)**

| | योजना | सन 2015-2016 चे प्रचलित दर (सध्याचे) | सन 2016-2017 करिता प्रस्तावित दर |
|---|---|---|---|
| 1 | माजी सैनिक व स्वातंत्र्य सैनिक किंवा त्यांचेपत्नी यांचे स्वत: रहात असलेल्या फक्त एका निवासी घरास सामान्य करात सूट | चालू सरकारी वर्षाचे चालू मागणीतील देय सामान्य कर रक्कमेच्या 50% रक्कम सूट | चालू सरकारी वर्षाचे चालू मागणीतील देय सामान्य कर रक्कमेच्या 50% रक्कम सूट |

**ब . सामान्यकरातील सवलत योजना : सामान्य कर (सामान्य करामध्ये सामान्य कर + साफसफाई कर + अग्निशामक + मनपा शिक्षण उपकर हे कर समाविष्ट आहेत)**

| | योजना | सन 2015-2016 चे प्रचलित दर (सध्याचे) | सन 2016-2017 करिता प्रस्तावित दर |
|---|---|---|---|
| 2 | फक्त महिलांचे नावे असलेल्या, स्वत: रहात असलेल्या फक्त एका निवासी घरास सामान्य करात सुट | चालू सरकारी वर्षाचे चालू मागणीतील देय सामान्य कर रक्कमेच्या **50% रक्कम सूट** | चालू सरकारी वर्षाचे चालू मागणीतील देय सामान्य कर रक्कमेच्या **50% रक्कम सूट** |

| | | | |
|---|---|---|---|
| 3 | 40**%** किंवा त्यापेक्षा जास्त अपंगत्व<br><br>असणा-या अंध, अपंग, मतिमंद, कर्णबधिर व मूकबधिर यांच्या नावावर असणा-या मिळकतीस | चालू सरकारी वर्षाचे चालू मागणीतील देय सामान्य कर रक्कमेच्या **50% रक्कम सूट** | चालू सरकारी वर्षाचे चालू मागणीतील देय सामान्य कर रक्कमेच्या **50% रक्कम सूट** |
| 4 | संपूर्ण मिळकतकराची रक्कम आगाऊ भरणा-यां करीता सामान्य करात सुट देणे | चालू सरकारी वर्षाचे चालू मागणीतील देय सामान्यकर रक्कमेच्या<br><br>1. स्वतंत्र नोंद असलेल्या निवासी वापराच्या मिळकतीस- 10% रक्कम सूट<br><br>2. बिगरनिवासी / मिश्र / औद्योगिक /मोकळया जमिनी इ. मिळकतीस -5% रक्कम सूट | चालू सरकारी वर्षाचे चालू मागणीतील देय सामान्यकर रक्कमेच्या<br><br>1. स्वतंत्र नोंद असलेल्या निवासी वापराच्या मिळकतीस- 10% रक्कम सूट<br><br>2. बिगरनिवासी / मिश्र / औद्योगिक /मोकळया जमिनी इ. मिळकतीस -5% रक्कम सूट |
| 5 | **ग्रीन बिल्डींग रेटींग सिस्टिम मिळकती**<br><br>**ग्रीहा :** ग्रीन बिल्डींग रेटींग सिस्टिममध्ये 2500 चौ.मी. पेक्षा जास्त भूखंडावरील प्रकल्पांना बांधकाम परवानगी विभागामार्फत अंतिम भोगवटापत्रक व अंतिम ग्रीन बिल्डींग Certificate प्राप्त झालेल्या मिळकतींना सामान्य करात सूट | चालू सरकारी वर्षाचे चालू मागणी तील देय सामान्यकर रक्कमेच्या<br><br>• 3Star Rating - 05% रक्कम सूट<br>• 4Star Rating - 08% रक्कम सूट<br>• 5Star Rating- 10% रक्कम सूट | चालू सरकारी वर्षाचे चालू मागणी तील देय सामान्यकर रक्कमेच्या<br><br>• 3Star Rating - 05% रक्कम सूट<br>• 4Star Rating - 08% रक्कम सूट<br>• 5Star Rating- 10% रक्कम सूट |
| | **स्वग्रीहा :** ग्रीन बिल्डींग रेटींग सिस्टिममध्ये 2500 चौ.मी. पेक्षा कमी भूखंडावरील प्रकल्पांना बांधकाम परवानगी विभागामार्फत अंतिम भोगवटापत्रक व अंतिम ग्रीन बिल्डींग Certificate प्राप्त झालेल्या मिळकतींना सामान्य करात सूट | चालू सरकारी वर्षाचे चालू मागणी तील देय सामान्यकर रक्कमेच्या<br><br>• **1Star Rating - 05% रक्कम सूट**<br>• **2Star Rating - 08% रक्कम सूट** | चालू सरकारी वर्षाचे चालू मागणी तील देय सामान्यकर रक्कमेच्या<br><br>• **1Star Rating - 05% रक्कम सूट**<br>• **2 Star Rating - 08% रक्कम सूट** |

| | | | |
|---|---|---|---|
| | | • **3Star Rating- 10% रक्कम सूट**<br>• **4Star Rating- 12% रक्कम सूट**<br>• **5Star Rating- 15% रक्कम सूट** | • **3Star Rating- 10% रक्कम सूट**<br>• **4Star Rating- 12% रक्कम सूट**<br>• **5Star Rating- 15% रक्कम सूट** |

| | योजना | सन 2015-2016 चे प्रचलित दर (सध्याचे) | सन 2016-2017 करिता प्रस्तावित दर |
|---|---|---|---|
| 6 | सामान्यकर सवलत योजनेचा लाभ घेणेकामी दोन्ही सहामाहीची थकबाकीसह संपूर्ण बिलाची रक्कम एक रक्कमी आगाऊ भरणेची मुदत (बिल मिळो अथवा न मिळो) | दिनांक 30 जून अखेर | दिनांक 30 जून अखेर |

| क. | करेत्तर बाबींचे फी / शुल्कांचे दर | | |
|---|---|---|---|
| अ. क्र. | नाव | सन 2015-2016 चे प्रचलित दर (सध्याचे) | सन 2016-2017 करिता प्रस्तावित दर |
| 1 | मिळकत हस्तांतरण नोंद नोटीस फी | करयोग्य मूल्यावर 5% | करयोग्य मूल्यावर 5% |
| 2 | थकबाकी नसलेचा दाखला फी | प्रती दाखला 10/- रूपये | प्रती दाखला 10/- रूपये |
| 3 | मिळकत उतारा | प्रती उतारा 20/- रूपये | प्रती उतारा 20/- रूपये |
| 4 | प्रशासकीय सेवा शुल्क | प्रति बीलास 10/- रूपये | प्रति बीलास 10/- रूपये |

सही/-

**आयुक्त**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका

पिंपरी-१८.

**( विषय क्रमांक ९ चे लगत)**

पिंपरी - चिंचवड महानगरपालिका
नगर रचना व विकास विभाग
आवक क्र. ३८९३ दि.:२२/७
लिपीक
कार्या. अधिक्षक
नगर रचनाकार
उपसंचालक
नगर रचना

आयुक्त कार्यालय
आवक क्र.- ६५०१
दिनांक- २०/७/१५
विभाग- नगर रचना
स्वीय सहा.-
मा. आयुक्त-

विकास योजना पिंपरी चिंचवड (वा.क्षे.).
नदीकाठच्या महत्तम पूर रेषेबाहेरील ना-विकास जमीन वापर विभागामध्ये दर्शविलेले क्षेत्र रहिवास विभागात समाविष्ट करण्याबाबत मंजूर विकास योजनेमध्ये फेरबदल करण्यासाठी महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६.कलम ३७(१) अन्वये निदेश.

महाराष्ट्र शासन
नगर विकास विभाग
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
शासन निर्णय क्र.टिपीएस-१८१५/४२८/प्र.क्र.१३८/१५/नवि-१३
दिनांक : १५/०७/२०१५

महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम,

**प्रस्तावना:-** पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या वाढीव हद्दीची विकास योजना शासनाने दि.१८/०८/२००९ रोजी मंजूर केली असून मंजूरी देताना सारभूत स्वरुपाचे बदल ई.पी.क्र.१ ते ११८ हे दि.१८/०८/२००९ च्या सूचनेद्वारे व त्यानंतर दि.२७/१०/२००९ च्या शुध्दीपत्रकाद्वारे प्रसिध्द केलेले आहेत. सदर फेरबदलांबाबत नियुक्त अधिकारी तसेच संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडून अहवाल प्राप्त झाल्यानंतर सदर ई.पी.क्र.१ ते ११८ च्या प्रस्तावास शासनाने मंजूरी दिलेली असून याबाबतची अधिसूचना दि.०६/०२/२०१५ रोजी निर्गमित केलेली आहे.

०२. महानगरपालिकेच्या विकास आराखड्यामध्ये नदीलगत दर्शविलेल्या उच्चतम पूररेषा (लाल पूररेषा) च्या बाहेरील भागश: ना-विकास विभागातील क्षेत्र हे पूररेषेमध्ये समाविष्ट नसल्याने ते ना-विकास क्षेत्रामधून वगळून निवासी क्षेत्रामध्ये समाविष्ट करण्याचा निर्णय नियोजन प्राधिकरणाने घेऊन त्याप्रमाणे अधिनियमाचे कलम ३० अन्वये विकास योजना सादर करण्यात आली होती. सदर प्रस्तावास तत्वत: मान्यता देऊन त्याप्रमाणे शासनाने सारभूत स्वरुपाचा फेरबदल प्रसिध्द केला होता. तथापि यास दि.०६/०२/२००५ रोजीच्या अधिसूचनेद्वारे मंजूरी देताना कलम २६ अन्वये ना-विकास क्षेत्र कायम ठेवले आहे.

०३. उक्त विकास योजनेमधील लाल पूररेषेच्या बाहेर असलेले ना-विकास वापर विभागातील पूर रेषेने बाधित होत नसलेले क्षेत्र आणि रहिवास क्षेत्राची उपलब्धता होण्याच्या दृष्टीने व सुनियोजित विकास होण्याच्या दृष्टीने रहिवास क्षेत्रामध्ये समाविष्ट करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे. याकरिता मंजूर विकास योजनेमध्ये फेरबदल करण्यासाठी अधिनियमाचे कलम ३७(१) अन्वये खालीलप्रमाणे निदेश महानगरपालिकेस देण्यात येत आहेत:-

## निदेश

पिंपरी-चिंचवड वाढीव हद्दीच्या मंजूर विकास आराखड्यामधील लाल पूररेषेच्या बाहेरील ना-विकास वापर विभागात दर्शविलेले क्षेत्र सलग रहिवास क्षेत्राची उपलब्धता होण्याच्या दृष्टीने व सुनियोजित विकास होण्याच्या दृष्टीने रहिवास विभागात समाविष्ट करण्यासाठी पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेने कलम ३७ चा प्रस्ताव त्यांच्या स्तरावरुन कार्यान्वित करुन शासनास सादर करण्याचे अधिनियमाचे कलम ३७(१) अन्वये निर्देश देण्यात येत आहेत.

प्रस्तुत निदेशाच्या दिनांकापासून ९० दिवसांच्या आत सदर फेरबदल प्रस्तावासंदर्भातील कलम ३७(१) खालील सूचना शासन राजपत्रात प्रसिध्द करण्याची दक्षता नियोजन प्राधिकरणाने घ्यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या नांवाने व आदेशानुसार,

(संजय सावजी)
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रति:- आयुक्त, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका, पिंपरी, पुणे.

प्रत माहितीसाठी :-
१) संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य पुणे,
२) सह संचालक, नगर रचना, पुणे विभाग, पुणे.
३) सहायक संचालक, नगर रचना, पुणे शाखा, पुणे.

D:\Pune Desk\Pune Dist\PCMC\EP १ To ११८\Nidesh_Section_३७(१).Docx

URBAN DEVELOPMENT DEPTT. MANTRALAYA, MUMBAI-32 सत्यमेव जयते

DDTP
T.P./ATP
Related with All D.E.